म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का०बं.
दा. क्र. १५९८३.
IPBK-0115983
IRBK-0115983

३०।३।५५

# उत्तर ध्रुव

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ९५९८३ नों. दि. ३०।३।५५
वि. ...

लेखक

श्री. ज. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
२५६९८
...
१५५०
नों. दि.
२-८-५५
वाचनालय शाखा

IRBK-0115983

मनोरंजन प्रकाशन, मुंबई ७

किर्लोस्कर मासिकास—

‘ जिथें मी जन्मलों....वाढलों....’

—श्री. ज.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | उत्तर ध्रुव | १ |
| २ | मन | १९ |
| ३ | मुलगा | ३० |
| ४ | प्रकृति | ४३ |
| ५ | थट्टा | ६० |
| ६ | वाटणी | ७२ |
| ७ | वासना | ८१ |
| ८ | सरता उन्माद | ९२ |
| ९ | मोटार | १०१ |
| १० | निळें पत्र | १११ |
| ११ | घाटपांडे | १२० |
| १२ | खोटा रुपया | १२९ |



ह्या पुस्तकांतील कथा :
केसरी, अंजली, वसंत, सुगंध, सत्यकथा, आशा,
किर्लोस्कर या मासिकांतून प्रथम प्रसिद्ध झाल्या

म ग्रं सं ठाणे. वाचनालय ठाणे
क्र. ९४५८३ नों दि.
विभाग

## : १ : उत्तर ध्रुव

बऱ्याच पायपिटीनंतर शहराच्या दुसऱ्या भागांत एका जुनाट चाळींत दोन मोकळ्या खोल्यांची जागा आढळली, आणि मग कांहींहि विचार न करतां मी ती लगेच ठरवूनहि टाकली.

दुसऱ्याच दिवशीं मी जागेची साफसफाई करून घेतली, संसाराची जुजबी मांडामांड केली, आणि कॉलेजांतून आठ दिवसांची रजा घेऊन शांताला आणण्यासाठीं कऱ्हाडला गेलों. नवा संसार मांडण्याची माझ्या-प्रमाणें तिलाहि उत्सुकता असणें अगदीं साहजिक होतें.

आमची दोघांची भेट झाल्यावर तिनें विचारलें, " कशी आहे जागा ?"

मी सांगितलें, " चांगली आहे."

" चांगली म्हणजे कशी ? "

" चांगली म्हणजे चांगली " मीं हसत उत्तर दिलें.

तीहि हंसली, आणि म्हणाली, " तें कळलं हो ! पण आणखी कांहीं सांगाना." पण मग तिचें तिलाच उमगलें, कीं प्रत्येक गोष्टीविषयीं निर-निराळे उपप्रश्न विचारायला पाहिजेत, आणि आपली आपणच माहिती जमवायला पाहिजे.

तिनें सुरुवात केली, " किती खोल्या आहेत ? "

" दोन ! आंतलें स्वयंपाकघर, व बाहेरची निजायबसायची खोली ! "

" स्वयंपाकघरांत नळ आहे ? "

" हो ! "

" नळाला पाणी येतं ? "

हा प्रश्न नवीन होता, आणि घोटाळ्यांत पाडणारा होता. मीं सांगितलें, " नळ आहे एवढं खरं ! पाणी येतं का नाहीं, तें माहीत नाहीं." इतकें बोलून मी थांबलों, व तिची समजूत करण्यासाठीं पुढें म्हणालों, " नळाला पाणी आलं नाहीं, तरी हरकत नाहीं. मागच्या दारीं सार्वजनिक मोठा नळ आहे. त्याला सारखं पाणी असतं."

" मोरी मोठी आहे ? "

" बरी आहे ! "

" आंघोळ करण्याइतकी ? "

मी पुन्हा गोंधळलों, आणि गप्प बसलों.

तिनें पुढें विचारलें, " धुणीं वाळत घालण्यासाठीं दांड्या आहेत का ? "

मग मात्र मी रागानें म्हटलें, " हें बघ ! तूं हे प्रश्न कशाला विचारत आहेस ! मला यांपैकीं कांहींहि माहीत नाहीं असं समज ! एकदा तूंच तिथं आलीस, म्हणजे तुला या साऱ्या गोष्टी कळतीलच कीं ! "

" मला कळतील हो ! पण तुमच्या या गोष्टी लक्षांत यायला पाहिजे होत्या."

" बरं बुवा ! मी मूर्ख आहें. कबूल करतों. पण आतां ते प्रश्न पुरे कर." मीं रागानें म्हटलें, व तिला गप्प केलें. बाह्यतः ती गप्प राहिली खरी, पण नव्या जागेचा विषय तिच्या मनांत डचमळतच राहिला.

कऱ्हाडला बाबांकडे असेच तीन-चार दिवस गेले, आणि मग सामानाची बांधाबांध करून आम्हीं परत येण्याची सिद्धता केली. नंतर दुसऱ्याच दिवशीं सकाळीं आम्हीं तेथून निघालों, आणि दिवेलागणीच्या सुमारास येथें आलों. स्टेशनवर उतरल्यानंतर ऑटोरिक्शांतून नव्या बिऱ्हाडाकडे जातांना प्रथम तिची सारखी चर्पटपंजरी चालली होती. आणि मीहि तिला हंसून साथ देत होतों. पण जसजसें घर जवळ आलें, तसतशी ती एकदम गप्प झाली, व स्तब्धपणानें माझ्या शेजारीं बसून राहिली.

रिक्शा चाललीच होती आणि आम्हीं दोघेंहि एकदम गप्प झालों होतों. गांवांतल्या त्या वस्तीकडे जातांना सुरुवातीस एक सिनेमा थिएटर लागलें. 'मध्यंतरा'मुळें थिएटरच्या मधल्या मोकळ्या पटांगणांत सिगरेटी

ओढणाऱ्या, आणि पानाच्या पिचकाऱ्या मारणाऱ्या लोकांचे थवेच्या थवे उभे असलेले दिसत होते. थिएटरच्या आजूबाजूस अगदीं गलिच्छ दिसणारीं मांसाशनाचीं दुकानें होतीं, आणि त्यांच्या पुढच्या बाजूस रस्त्याच्या कडेला बाजांवर किंवा मोठमोठ्या वेतांच्या खुर्च्यांवर बसलेले उघडेवागडे कमरेला नुसतीच लुंगी गुंडाळलेले, चेहऱ्यावरून अतिशय क्रूर व भीतिदायक दिसणारे पांच-सात लोक येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे—विशेषतः स्त्रियांकडे—टक लावून बघत होते.

ह्या सर्व देखाव्याकडे पाहून तिनें हलक्या आवाजांत विचारलें, "हें काय? इकडे कुठें?"

कांहींच न वाटल्यासारखें दाखवून मीं म्हटलें, "आपल्या जागेकडे."

आश्चर्यानें तिनें विचारलें, "इकडे?"

मी कांहींच बोललों नाहीं. माझ्याकडून उत्तराची तिलाहि अपेक्षा नसावी. रिक्शा चाललीच होती आणि आम्ही उजव्या डाव्या बाजूंकडे पाहतच होतों.

एवढ्यांत रिक्शानें सिनेमा थिएटरला डावी घालून, एका बोळकंडीवजा रस्त्याकडे कूच केलें होतें. रात्र झाली होती, आणि तरीहि त्या रस्त्यावरच्या चमत्कारिक प्रकारच्या रहदारीकडे लक्ष जात होतें. त्या रस्त्यावर कांहीं घरांच्या खालच्या बाजूला हॉटेलें होतीं, आणि तिथें मनस्वी वर्दळ होती. हॉटेलांतल्या दिव्यांनीं त्या घरासमोर भगभगीत प्रकाश पाडलेला होता. ज्या घरांच्या खालीं हॉटेलें नव्हतीं, तेथें उजेड नव्हता! एक प्रकारचा किळसवाणा व गूढ वाटणारा अंधार तिथें पसरलेला होता. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या अंधाऱ्या घरांच्या दुसऱ्या मजल्यावरच्या खोल्यांत भगभगीत दिवे लावलेले होते, आणि निरनिराळ्या तऱ्हेची वेषभूषा केलेल्या, आणि लांबूनच किळसवाण्या दिसणाऱ्या स्त्रिया त्या घरांच्या खिडक्यांतून व सज्ज्यांतून उभ्या होत्या.

रिक्शा कोणत्या वस्तींतून जात आहे, तें एकदम माझ्या लक्षांत आलें, आणि भीतीची एक लकेर आमचीं दोघांचींहि अंतरंगें छेदून गेलीं.

पण रिक्शा पुढेंच चालली होती. हळूहळू ती वस्तीहि मागें पडली, आणि आम्हीं आमच्या जागेच्या गल्लींत आलों. थोड्याच वेळांत चाळीपाशीं येऊन रिक्शा एकदम थांबली.

खालीं उतरल्यानंतर मीं रिक्शावाल्याला म्हटलें, " हा कोणता रस्ता काढलास रे बाबा ? "

कांहींच न कळल्यामुळें तो म्हणाला, " कां, काय झालं ? "

" किती वाईट वस्तींतून गाडी आणलीस ? "

" हं हं ! त्याचं काय मोठंसं ? तोच रस्ता जवळचा आहे," तो हंसून म्हणाला व सामान उतरून झाल्यावर रिक्शा पुढें घेऊन निघून गेला.

मी मग सामान वर नेलें आणि खोलीचें दार लावून आम्हीं थोडा वेळ स्वस्थ बसलों.

पांच-दहा मिनिटें गेल्यावर थोडी तरतरी आली आणि मी अंगांतले कपडे काढून ठेवले आणि मोकळेपणाचा आविर्भाव आणीत म्हटलें, " कशी काय आहे जागा ? "

ती कांहींच बोलली नाहीं. नुसतीच स्थिर नजरेनें त्या दोन खोल्यांकडे बघत राहिली.

थोडा वेळ तसाच जाऊं देऊन मी म्हटलें, " चहा पिऊं या ? "

ती म्हणाली, " पिऊं या ! "

—आणि आंतल्या खोलींत जाऊन स्टोव्ह पेटवायला लागली.

पण मींच पुढें म्हटलें, " स्टोव्ह पेटवून काय उपयोग ? दूध कुठें आहे ?"

त्रासिक आवाजांत तीहि म्हणाली, " होय खरंच कीं ! दूध कुठें आहे ?"

मग मी उठलों आणि अंगांत शर्ट घातला, व हातांत भांडें घेऊन म्हटलें, " नाहीं तर मीच दूध घेऊन येतों ! "

" कुठून ? "

" तें समोर हॉटेल दिसत आहे तिथून ! आतां येतोंच ! " आणि मी बाहेर पडलों पण तिनें मला बाहेर पडूंच दिलें नाहीं. माझा हात धरून ती म्हणाली, " तुम्हीं नका जाऊं । "

" कां ? " मीं आश्चर्यानें विचारलें.

" तें हॉटेल चांगलं दिसत नाहीं. सगळे वाईट मवाली लोक दिसतात नि शिवाय तुम्हीं तिथं जाणं शोभणारहि नाहीं."

" न शोभायला काय झालं ? " मीं हंसून म्हटलें, " माझी प्रोफेसरकी इथल्या लोकांना अजून माहीत नाहीं. आणि माहीत झाली, तरीहि त्यांना

त्यांत कांहीं वाटणार नाहीं." आणि मी समोरच्या हॉटेलांत दूध आणावयास गेलों.

हॉटेल खूपच मोठें होतें आणि गल्ल्यावर रेशमी नेहरू शर्ट घातलेला, स्थूल, बळकट बांध्याचा आणि ओठावर कोडाचा पांढरा ठिपका असलेला माणूस बसला होता. आंतहि कोपऱ्याकोपऱ्यांवर आरशासमोर तुरळक तुरळक माणसें चहा पीत नि भर्जी खात बसलीं होतीं.

मीं गल्ल्यावरच्या माणसाला विचारलें, " दूध आहे का हो ? "

माझ्या प्रश्नाला उत्तर न देतांच तो आंतल्या मालवाल्याकडे पाहून मोठ्यानें ओरडला " दूध दे मास्तरला ! "

आंतून गेंगाण्या स्वरांत उत्तर आलें, " दूध संपलें आहे."

मग मीं पुन्हा विचारलें, " चहा पाठवूं शकाल का दोन कप ? त्या समोरच्या चाळींत ? "

त्यानें पुन्हा पुकारा केला, " दोन कप चहा जाऊं दे समोरच्या चाळींत ! " आणि तो स्तब्ध बसला.

चहा येईपर्यंत मी तिथेंच उभा राहिलों. तेवढ्यांत गल्ल्यावरच्या माणसाच्या शेजारीं दुसरा मलमलचा शर्ट घातलेला माणूस उभा होता त्यानें विचारलें, " नव्यानेंच राह्यला आलांत काय ? "

मी म्हणालों, " होय ! " त्यावर तो कांहींच बोलला नाहीं. नुसता हंसला.

इतक्यांत आंतल्या बाजूनें कळकट घाणेरडे कपडे घातलेलें, केसांचीं झुलपें ठेवलेलें, एक सतरा-अठरा वर्षांचें पोरगें चहाच्या कपाची उतरंड हातांत घेऊन बाहेर आलें व म्हणालें, " चला ! "

चहावाल्याला घेऊन मीं खोलींत आलों, तेव्हां ती बाहेरच्या खोलींत नुसतीच बसली होती कांहींहि न करतां ! नुसतीच आढ्याकडे बघत !

मीं आश्चर्यानें विचारलें, " हें काय ? नुसतीच बसली आहेस ? "

ती थंडपणानें म्हणाली, " मग काय करायचं ? "

" काय करायचं म्हणजे काय ? खोली साफ करतां आली असती ! " मीं म्हटलें व पोऱ्याला सांगितलें, " दे रे, चहा दे."

यावर पोऱ्यानें एक कप तिच्या हातांत दिला व दुसरा माझ्या हातांत दिला आणि तो तिथेंच कोपऱ्यांत उभा राहिला. मी एकदम चहा प्यायला सुरुवात केली. चहाचा कप घाणेरडा होता आणि त्याला शुळचट वास येत होता, तरीहि मी चहा पीत होतों.

दोन-तीन घोट घेतल्यानंतर मीं सहज तिच्याकडे पाहिलें, तर ती तशीच स्वस्थ बसली होती.

मी आश्चर्यानें म्हणालों, " हें काय ? चहा घे ना ? "

" मला नको बाई हा चहा ! घ्यावासाच वाटत नाहीं."

" वा ! चांगला तर आहे ! " तिच्यासमोर घोट घेत मीं म्हटलें.

" आहे ना ! मग तुम्हींच घ्या ! मला मात्र नको ! पाहिजे तर माझाहि तुम्हीच घ्या ! "

" चमत्कारिकच आहेस बुवा ! "

" आहे ना ! कबूल ! पण आतां काय करायचं ? "

यावर मी कांहीं तरी गंमतीदार थट्टेखोर वाक्य बोलून तिला हंसवणार होतों. पण कां कुणास ठाऊक, एकदम माझी दृष्टि कोपऱ्यांत उभ्या राहिलेल्या हॉटेलच्या पोऱ्याकडे गेली आणि मी एकदम गप्प बसलों. खुर्चीवर अस्ताव्यस्त बसलेल्या तिच्याकडे तो पोऱ्या टक लावून बघत आहे, असें माझ्या मनांत आलें व तें कसेसेंच वाटलें. मग मी लवकर चहा संपविला आणि पोऱ्याला घालवून दिलें.

तो गेल्यानंतर तिनें बाहेरचें दार घट्ट लावून घेतलें व तक्रारीच्या आवाजांत मला म्हटलें, " चहा पिववला तरी कसा ? "

" कां ? त्यांत काय झालं ?

" काय झालं काय ? कोण कोण कसलीं कसलीं माणसं तिथं येतात आणि चहा पितात, त्यांचे कप आपण तोंडाला लावायचे ? किळस कशी येत नाहीं तुम्हांला ? "

जांभई देऊन आळोखेपिळोखे देत मीं म्हटलें, " हॉटेल म्हटलं कीं, हें सारं चालायचंच ! "

" तें चालायचंच हो ! पण हें समोरचं हॉटेल फारच वाईट आहे. मी चहा कां प्यायलें नाहीं, सांगूं ? "

" सांग कीं !"

" मघाशीं रिक्षांतून आपण येतें होतों, तेव्हां सिनेमा थिएटरच्या पुढच्या बोळांत त्या वाईट चालीच्या बायका दिसल्या ना?... त्या खिडक्यांतून उभ्या होत्या आणि त्यांचीं तोंडें रंगलीं होतीं..."

" मग त्यांचं काय ? "

" अहो त्यांच काय काय? मला सारखी त्यांची आठवण होत होती. मनांत आलं, कीं त्या बायकांचे ओठ या कपांना लागले असतील. या बशांतूनच त्यांनीं चहा प्यायला असेल आणि मग त्या कपांना तोंड लावायची देखील किळस वाटायला लागली ! "

तिच्या म्हणण्यांत थोडा अर्थ होता. पण तिला मोडून काढीत मीं म्हटलें " छे बुवा ! कांहीं तरीच तुझं बोलणं ? त्यांचे ओठ समजा त्या कपांना लागलेहि असतील. म्हणून का तिथं ते कायम चिकटून बसले असतील ? "

पण मग पुढें कांहीं बोलणें झालेंच नाहीं. घरून येतांना आम्हीं डबे आणले होते, तेच खाल्ले व झोपून गेलों.

दुसऱ्या दिवशीं कॉलेज सकाळीं असल्यामुळें आम्ही लवकर उठलों आणि चहा वगैरे घेऊन मी कॉजेजांत गेलों. कॉलिजचे तीन तास संपवून घरीं परत येईपर्यंत मला चांगले साडेदहा अकरा वाजले. घरांत आलें आणि दार उघडलें, तर शांता नुसतीच बसली होती. अजून चूलहि पेटली नव्हती, आंघोळीचें पाणी तापायला तर पत्ताच नव्हता ! "

आश्चर्यानें मीं विचारलें, " हें काय ? "

ती म्हणाली, " आपल्या नळाला पाणीच येत नाहीं."

" पण सकाळीं चहा केला होता, तेंव्हां तर आलं होतं ! "

" तेव्हां आलं होतं, पण तें लगेच गेलं. खालच्या बिऱ्हाडांतून नळ सोडले असतील."

" आणि म्हणून तूं अशी स्वस्थ बसून राहिलीस? खालच्या बिऱ्हाडांना सांगायचं नळ बंद करायला ! "

यावर ती कांहींच बोलली नाहीं.

" नाहीं तर बाहेर चौकांत नळ आहे तिथून पाणी घेऊन यायचं."

" तिथून काय घेऊन यायचं? सकाळपासून समोरच्या लोकांचीं तिथं सारखी तोंडधुणीं चाललीं आहेत; आणि मघांपासून जवळ जवळ तासभर तरी एक माणूस नुसताच तिथं आंघोळ करीत आहे."

मग त्याला म्हणायचं कीं मला पाणी घेऊं दे!"

" म्हणायचं काय कपाळ? तुम्हींच म्हणा! मला भीति वाटते!"

" भीति वाटते?" मीं आश्चर्यानें विचारलें, " कुणाची भीति वाटते?"

यावर तिनें कांहीं उत्तरच दिलें नाहीं.

मग मीच रागारागानें बादली नि कळशी घेतली आणि खालीं जात म्हटलें, " चल! मीच तुला पाणी भरून देतों! बादली वर घेऊन ये. कसली आणि कुणाची भीति वाटते आहे, हेंच मला बघायचं आहे."

मी तरातरा खालीं गेलों आणि नळापाशीं जाऊन उभा राहिलों. एक गोटीबंद आडव्या अंगाचा माणूस नुसताच लंगोट नेसून तिथें नळाखालीं बसला होता आणि उग्र वास मारणाऱ्या एका तांबड्या साबणवडीनें अंग घाशीत होता. जास्त निरखून बघितल्यावर, काल हॉटेलच्या गल्ल्यापाशीं मलमलचा शर्ट घालून जो माणूस उभा होता, तोच हा आहे, हें मीं ओळखलें.

खरें सांगायचें म्हणजे मी खूप रागावलों होतों आणि त्या माणसाला कांही तरी ताडताड बोलण्याची माझी इच्छा होती; पण त्याच्या दृष्टीला दृष्टी भिडतांच मीं एकमद गप्प झालों आणि चष्मा सावरीत उभा राहिलों.

पांच-सहा मिनिटें गेल्यानंतर नळाच्या पाण्यानें चुळा थुंकीत त्यानेंच म्हटलें, " काय मास्तर, काय पाहिजे?"

मीं नरमाईनें म्हटलें, " जरा पाणी घ्यायचें होतें."

" मग घ्या कीं हो! नुसतंच काय उभं राहिलांत?" असें म्हणून तो नळाच्या धारेखालून बाजूला झाला आणि तिथेंच कट्ट्यावर ओलें अंग दगडानें घासत बसला.

मी बादली नळाखालीं लावली आणि शांताला ओरडून बोलावलें. पहिल्या हांकेला ती आली नाहीं; पण दुसऱ्या हांकेला तिला यावेंच लागलें. गोल पातळ नेसलेली आणि स्वच्छ वेषभूषा केलेली शांता मग अनिच्छेनें खालीं आली आणि बादल्या भरून न्यायला लागली.

पाणी भरून झाल्यानंतर मी वर आलों तेव्हां नापसंतीच्या आवाजांत ती म्हणाली, " झाल समाधान ? "

" कां ? काय झालं ? "

" काय झालं काय ? मला खालीं बोलावलंत, आणि आसपासचे सगळे पुरुष मेले गिधाडासारखे टक लावून बघत होते."

तिचें म्हणणें पटलें होतें तरीहि मीं मुद्दामच म्हटलें, " तुझी कांहीं तरीच कल्पना आहे झालं."

" तुम्ही म्हणा कांहींहि ! पण मी सांगतें पुन्हां कांहीं मी खालच्या चौकांत जाऊन पाणी आणणार नाहीं."

" नको आणूस. नाहीं तरी रात्रीं नळ येतोच. तेव्हां पाणी भरून टाकलं म्हणजे झालं ! खालीं जायची वेळच कशाला येणार आहे ? "

त्या दिवसानंतरचे चार-पांच दिवस मग सुरळीत पार पडले. मी स्वत: कॉलेजांत रमलों होतों. संस्कृतचा उत्तम अध्यापक म्हणून माझें नांव प्रस्थापित करणें मला भाग होतें. शिवाय माझ्या प्रबंधाचीहि तयारी करायची होती. पण अभ्यास सुरू करणें जमलेंच नाहीं. त्या दिवशीं शनिवार होता, आणि मी कॉलेजांतून लवकर घरीं परत आलों होतों. दुपारचीं जेवणें झाल्यानंतर बाहेरच्या कॉटवर मी जरासा आडवा झालों होतों. थोडा वेळ झोप काढून ' थीसिस 'चा—अभ्यासाचा—मुहूर्त करण्याची माझी इच्छा होती.

माझी वीस पंचवीस मिनिटें झोंप झाली असेल, इतक्यांत कुणाच्या तरी रागानें बोलण्याचे आवाज ऐकूं आले, नि मीं धाडकन् जागा झालों. इकडे तिकडे बघितलें तर घरांत शांता नव्हती, ती बाहेर व्हरांड्यांत होती, आणि कोणाशीं तरी बोलत होती.

मी झपाट्यानें उठून बाहेर आलों व तिला विचारलें, " काय झालं ? "

तिचा चेहरा रागानें लाल झाला होता. ती म्हणाली, " झालं काय ? या पातळांकडे पाहा ना ! इथं तारेवर दुपारीं वाळत टाकलीं होतीं, तर वरच्या लोकांनीं सरळ घाणेरडं पाणी ओतलं, आणि सारे कपडे घाण करून टाकले."

" कुणीं पाणी ओतलं ? " मीं रागानें थरथर कांपत म्हटलें.

" वरच्या लोकांनीं ! "

मीं मग वर ऐकूं जाईल असा मोठा स्वर काढून म्हटलें, " इतकें दिसत नाहीं कीं काय त्या लोकांना ! चांगल्या धुतलेल्या कपड्यांवर पाणी ओतायचं म्हणजे काय ? "

" होय ना ? चांगले स्वच्छ धुतलेले कपडे ! सारे खराब झाले. " ती म्हणाली व आम्हीं घरांत आलों.

घरांत येऊन बसलों, पण वातावरण सारें एकदम नासून गेलें. मला झोंपहि येईना आणि अभ्यासहि करवेना. संध्याकाळ होईपर्यंत तसेच एकमेकांकडे बघत बसलों. आंतल्या आंत विचार करीत होतों.

संध्याकाळीं कांहींच करमेना, म्हणून आम्हीं कपडे केले, आणि बाहेर पडलों. घराला कुलूप लावलें, आणि सहज जातांना वर पाहिलें, तर कोणी तरी लठ्ठ, काळी कुळकुळीत बाई गॅलरींत उभी राहून जळजळीत नजरेनें आमच्याकडे बघत होती.

तिच्याकडे लक्ष न देतांच आम्हीं जिना उतरायला लागलों, तर वरून हंसण्याचा आवाज ऐकूं आला. वर बघावेसें वाटलें, पण बघितलें नाहीं; तसेच पुढें चाललों.

इतक्यांत वरून कुणी तरी, सुशिक्षित स्त्रीच्या ठसक्यांत बोलण्याच्या आवाजाची नक्कल करीत म्हटलें, " इतके चांगले स्वच्छ कपडे. आतां साऽरे खराब झाले ! " आणि नंतर फिदीफिदी हंसण्याचा आवाज ऐकूं आला.

त्याकडे लक्ष न देतांच आम्हीं पुढें चाललों, आणि रस्त्याला लागलों. बोळकंडी ओलांडली आणि मोठा रस्ता लागला; व मग एकदम बरें वाटलें.

थोडा वेळ जाऊं देऊन मीं तिला विचारलें, " वरून कोण चिडवीत होतं ? "

" अहो तोच ! त्या दिवशीं नळावर उघडाबंब आंघोळ करीत होता ना तोच तो ! "

" पण तिथें तर ती लठ्ठ बाई उभी होती. "

ती त्याची आई असावी ! कारण तो तिथेंच रहातो. "

" तूं त्या बाईशीं बोलली आहेस कधीं ? "

" नाहीं बाई. "

" कां ? "

" बोलावसं वाटतच नाहीं. चाळींतल्या कोणत्याच बिऱ्हाडांतल्या बायकांशीं मी बोलत नाहीं. "

" पण तो माणूस फार हलकट दिसतो. "

" हलकट तर आहेच ! मला बाई त्याची फार भीति वाटते. "

" कां भीति वाटते ? "

" सारखा बघत असतो. नळावर गेलं किंवा कपडे वाळत घालायला बाहेर आलं तरी हा तिथं असतोच ! "

" मग मला सांगितलं नाहींस ? "

" काय सांगायचं ? आपण काय करणार ? "

" तेंहि खरंच आहे. " मीं विषादानें म्हटलें व गप्प झालों.

माझ्या मनांतील विषाद तिलाहि कळला असावा; कारण तिनें मग प्रयत्नपूर्वक दुसरे विषय काढले व संभाषण खेळतें ठेवलें.

पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या माणसाबद्दलचा विषय माझ्या मनांत तसाच सलत राहिला.

थोडे पुढें गेलों, पण हिंडण्यांत मौज येईना. गप्पांत रंग उतरेना ! तेव्हां ती म्हणाली, " मला वाटतं, आतां मागं फिरावं. "

" इतक्यांतच ? घरीं जाऊन तरी काय करायचं आहे ? "

" कांहीं करायचं नाहीं. पण आपलं दिवसाउजेडीं घरीं गेलेलं बरं. "

तिचें म्हणणें मला पटलें. आम्हीं परत फिरलों.

चालतां चालतां ती म्हणाली, " आपल्या रस्त्यानं, रात्रीं तर फारच भीति वाटते ! "

" कसली भीति वाटते ? कोण काय करणार आहे ? "

" तें सांगतां येत नाहीं, पण वाटते खरी. तुम्हांला नाहीं भीति वाटत ? "

मीं कांहींच बोललों नाहीं, तेव्हां थोड्या वेळानें तिनें पुन्हां तोच प्रश्न विचारला.

मीं म्हटलें, " भीति नाहीं वाटत, पण चमत्कारिक वाटतं हें मात्र खरं! या वस्तींतील माणसं आपल्यासारखीं नाहींत. त्यामुळें थोडं चमत्कारिक वाटणं साहजिक आहे. "

" या चमत्कारिक वाटण्यालाच भीति वाटणं म्हणतात. " ती हंसत म्हणाली.

" असेल ! तसंहि असेल ! " मीं हंसत उत्तर दिलें, व चालूं लागलों.

घरीं आलों, आणि जेवणें केलीं; पण मन स्वस्थ नव्हतेंच. बाहेरच्या कॉटवर मी बराच वेळ नुसताच स्वस्थ निपचीत पडून राहिलों.

दुसऱ्या दिवशीं रविवार होता, आणि गांवांतली माझी एक लांबची बहीण जेवायला नि रहायला यायची होती. आम्हीं लवकर उठलों, व आंघोळी वगैरे उरकून कपडे बाहेरच्या व्हरांड्यांत तारेवर वाळत घातले. नंतर दोघेंहि मंडईत गेलों. परत येतांना माझ्या बहिणीला आम्हीं घेऊन येणार होतों.

मंडई केली आणि गप्पा मारीत मारीत बहिणीकडे गेलों आणि दोन दिवस रहाण्याच्या तयारीनें तिला बरोबर घेतलें. माझी बहीण बोलकी होती आणि स्वभावानें खेळकर होती. तिच्या सहवासांत वेळ मजेंत जाणार याबद्दल आमची खात्री होती.

आम्हीं तिघेंहि गप्पा मारीत चाळीपर्यंत आलों आणि मी सहज समोरच्या हॉटेलकडे बघितलें; तर तिथें तो वरचा माणूस उभा होता! मलमलचा शर्ट घालून तो रगेलपणानें उभा होता, आणि त्याच्याबरोबर त्याच्यासारखेच इतरहि तालीमबाज लोक उभे होते.

त्यांच्याकडे लक्ष नाहीं असें दाखवून आम्हीं वर गेलों, नि बिऱ्हडांत शिरलों.

आंत शिरल्यानंतर दार लावून घेऊन तिनें विचारलें, " बघितलंत ना त्याला ! "

ती कोणाबद्दल बोलत होती, हें लक्षांत येऊनसुद्धां मीं मुद्दामच बेफिकिरी दाखवीत म्हटलें, " कुणाला ? "

" अहो, तो हो ! आतां नाहीं का पानपट्टीच्या दुकानासमोर उभा होता. "

माझ्या बहिणीनें मग मध्येंच विचारलें, "कोण ग ?"

"अग तो एक मवाली आहे. वरच रहातो वाटतं. सारखा जातां येतांना बघतो, आणि फिदीफिदी हंसतो."

माझी बहीण एक-दोन दिवसांकरितां पाहुणी आली होती. तिच्या देखत हा विषय निघून आमच्या आनंदाचा विरस व्हायला मला नको होतें. म्हणून मीं मुद्दामच शौर्य दाखवीत म्हटलें, "अग, तो उगीच बघत असेल! तुझ्या आपल्या कांहीं तरीच कल्पना!" आणि नंतर हेतूपूर्वक मीं विषय बदलला.

पुढें आमची हंसत-खेळत मजेंत जेवणें झालीं; आणि थोडी वामकुक्षी झाल्यावर सिनेमाचा बेत ठरला. गांवाबाहेरच्या चांगल्या वस्तींत सिनेमाला जायचें होतें, म्हणून लवकर निघणें भाग होतें.

मग आम्हीं तिघांनींहि कपडे केले व निघायची तयारी केली. निघण्यापूर्वीं दाराला कुलूप लावायच्या अगोदर तारेवरचे कपडे आणण्यासाठीं म्हणून ती बाहेर व्हरांड्यांत गेली, आणि हतबुद्ध होऊन व खेटर मारल्यासारखा चेहरा करून एका मिनिटांत परत आली.

मी आरशासमोर उभा राहून बुशकोटची कॉलर साफ करीत होतों. तिचा उतरलेला चेहरा बघून मी विचारलें, "काय ग ?"

जवळ येऊन हलक्या आवाजांत ती म्हणाली, "अहो काय काय ? तारेवरच्या कपड्यावर पुन्हां वरून पाणी ओतलं आहे. घाणेरडं पाणी."

आतां मात्र मला संताप आला, आणि कांहीं तिरीमिरींतच बाहेर आलों, खरंच, वरून ओतलेल्या पाण्यानें सारे कपडे भिजून गेले होते.

त्यांच्याकडे पाहून रागानें मीं म्हटलें, "या लोकांना लाज कशी वाटत नाहीं कुणास ठाऊक ? खालचे कपडे दिसत नाहींत ? डोळे फुटले कीं काय ?"

मी इतकें सारें रागानें बोललों खरा, पण त्याच वेळीं कसली तरी अदृश्य भीति, माझ्या मनांत घोंगावतच होती.

तिलाहि त्याच भीतीनें पछाडलें असावें! कारण तिनें माझा बुशकोट धरून मला आंत ओढलें, व अगदीं हलक्या आवाजांत ती म्हणाली, "अहो मोठ्यानं ओरडूं नका! तो ऐकेल."

" ऐकूं दे ऐकलं तर. वाऽरे वा! म्हणजे इतकं सगळं होऊन त्याचीच मला भीति! असं वाटतं कीं वर जावं नि चांगल्या दोन भडकवाव्यात त्याच्या!" मीं हलक्या आवाजांत म्हटलें.

" तुम्हीं गप्प राहा बरं? सिनेमाला जायचं आहे ना, आपल्याला." ती म्हणाली व तिनें आम्हांला बाहेर काढावयास सुरुवात केली.

माझी बहीण इतका वेळ हतबुद्ध होऊन स्तब्ध उभी होती, गांवाबाहेर चांगल्या सुशिक्षित आणि सुरक्षित वस्तींतल्या ब्लॉकमध्यें तिचा संसार थाटलेला होता. त्यामुळें तिला हा साराच प्रकार नवीन होता.

तिच्याकडे बघत शांता म्हणाली, " नुसत्या उभ्या कां तुम्हीं! सिनेमाला जायचं आहे ना?"

ती खालच्या मानेनें म्हणाली, " जायचं आहे ना! पण-पण मी दुसराच विचार करीत होतें."

" तो काय?" तिनें विचारलें.

बोलावें न बोलावें असा विचार करून बहीण एकदम म्हणाली " सिनेमाला जाऊं आपण; पण नंतर मी आपली घरीं जाईन."

" कां ग?" दोन दिवस राह्यला आली होतीस ना तूं" मीं विचारलें?

" आलें होतें. पण...आतां वाटतं घरींच जावं. घरीं काम आहे त्याची आठवण झाली."

तिचें म्हणणें मला पटलें. तिला इथें राहणें शक्यच नव्हतें, हें उघड होतें. मग मींच म्हटलें, " बरं तर? सिनेमा सुटल्यानंतर तुला घरीं पोंचवून देऊं. पुन्हां केव्हां तरी तूं राहायला ये."

आणि नंतर आम्हीं बाहेर पडलों. जिन्यापाशीं येतों, तर वरून तोच माणूस खालीं उतरत होता. आम्हांला तिघांनाहि बघून त्यानें किंचित् चावट हास्य केलें व माझ्याजवळ येऊन तो म्हणाला, " काय मास्तर? कसली गडबड आहे?"

" गडबड कसली?" मीं घाबरलेल्या हळुवार आवाजांत म्हटलें.

" नाहीं! तुम्हीं मघा खूप आरडत व्हता म्हणून इचारलं."

" हं, हं ! त्याचं कांहीं नाहीं हो ! वरून पाणी आमच्या कपड्यांवर पडलं म्हणून म्हटलं ! दुसरं कांहीं नाहीं." मीं हंसत म्हटलें.

" त्याचं कांहीं नाहीं ना ! मग झालं तर." तो हंसला व जिना उतरायला लागला.

मी मनस्वी घाबरलों होतों, आणि माझी छाती धडधडत होती. हलक्या आवाजांत मीं शांताला म्हटलें, " चला ! "

त्या दोघीहि गप्पच उभ्या होत्या. माझ्या बोलण्यानें त्या जणूं एकदम जाग्या झाल्या, आणि शांता म्हणाली, " चला हो वन्स ! "

मग आम्हीं बाहेर पडलों. बाहेर पडतांना, गल्लीच्या कोपऱ्यावरच्या दुकानांतून कुणी तरी 'चला हो वन्स !' अशी सुशिक्षित स्त्रीच्या ठसकेबाज आवाजाची नक्कल करीत ओरडलेंच; पण आम्हीं तिकडे लक्षच दिलें नाहीं.

आम्हीं जेथें गेलों तें सिनेमाचें थिएटर गांवाबाहेरच्या सुशिक्षित वस्तींत होतें, आणि इंग्रजी सिनेमा असल्यामुळें कॉलेजच्या मुलांमुलींची, व तरुण विवाहितांची तिथें गर्दी उडालेली होती. त्यांच्या सान्निध्यामुळें वातवरणाहि मोठें प्रसन्न वाटत होतें.

आसपासचीं मुलें व मुलीं नर्म विनोद करीत होतीं, आणि स्मितहास्यांचीं कारंजीं उडत होतीं, पण आम्हीं तिघेहि स्तब्धच होतों. आसपासच्या आनंदांत भाग घेणें आम्हांला शक्यच नव्हतें.

सिनेमा सुटला. बहिणीला तिच्या घरीं पोंचविलें आणि वेळ घालविण्यासाठीं त्या सुरक्षित वस्तींतील पटांगणांत गप्पा मारीत बसलों. संध्याकाळच्या धूसर प्रकाशांत तिथें बसणें मोठें आल्हाददायक वाटत होतें. आसपासच्या बंगल्यांत दिवे लागले होते आणि रेडिओ वाजत होते. त्या बंगल्याकडे आशाळभूतपणानें मग आम्ही नुसतेंच बघत बसलों.

थोडा वेळ तसाच गेला. नंतर ती म्हणाली, " इथं किती बरं वाटतं नाहीं ! "

" होय ना ? "

" तुमच्या कॉलेजांतले इतर प्राध्यापक इथंच रहात असतील ! नाहीं का ? "

" ते दुसरीकडे कुठं रहाणार ? "

माझीं तुटक उत्तरें बघून संभाषणाची गाडी बदलण्याच्या इराद्यानें ती म्हणाली, " तुमच्या थीसिसचं काय झालं ? "

" काय व्हायचंय् ? "

" म्हणजे काय ? तुम्हांला अभ्यास करायला नको का ? "

मी कांहींच बोललों नाहीं. नुसताच गप्प बसलों.

थोडा वेळ गेल्यावर मीं म्हटलें, " निघायला पाहिजे आतां."

" होय ना ? पण खरं म्हणजे निघावंसं वाटत नाहीं. त्या वस्तीची भीति वाटते."

" भीति वाटून कसं चालेल ? "

" अहो, कसं म्हणजे काय ? आज तो माणूस नुसताच बघतो आहे, नि लांबून बोलतो आहे. उद्यां त्यानं रस्त्यानं जातांना धक्का मारला, किंवा आणखी कांहीं केलं तर कसं करायचं ? "

" असं कसं होईल ? "

" नाहीं. झालं तर काय करायचं ? आपण काय करणार ? "

" चला उठावं ! ! " मीं उठत म्हटलें, व चालूं लागलों.

चालतां चालतां ती म्हणाली, " तुम्हीं दुपारीं म्हणाला होतांत, कीं वर जावं, नि त्या माणसाला चांगला झोडपून काढावं. पण तें शक्य होईल काय ? "

मीं विषादपूर्ण आवाजांत म्हटलें, " खरं सांगूं का खोटं सांगूं ? "

" खरं सांगा ? "

" तें शक्य होणार नाहीं. मी आजपर्यंत कधीं मारामारी केलीच नाहीं. करावी लागलीच नाहीं. तें रक्तच माझ्या अंगांत नाहीं असं वाटतं."

इतकें बोलून मी एकदम थांबलों व म्हटलें, " आपण रिक्षा करूनच घरीं जाऊं. "

ती म्हणाली, " चला ! " आणि आम्हीं रिक्षा ठरविली.

रिक्षा चाळीशीं उभी राहिली, आणि खालीं मान घालून आम्हीं चढायला लागलों. समोर पानपट्टीच्या दुकानांत चारपांच पोरांचें टोळकें होतेंच, आमच्या पाठीमागें कोणी तरी सुशिक्षित स्त्रीच्या आवाजाची नक्कल

करीत ओरडलेंच, " वन्स गेल्या वाटतं ! " पण त्याची आम्हीं दखल घेतली नाहीं.

वर जाऊन दार उघडलें; आणि खोलींत येऊन स्वस्थ पडलों. तिनें विचारलें, " जेवायचं आहे ना ? "

मी म्हणालों, " खरं सांगायचं म्हणजे माझा 'मूड'च गेला आहे."

" बरं तर ! मलाहि कसंतरीच वाटतं आहे." असें ती म्हणाली व झोपण्याच्या तयारीनें पडून राहिली.

मी मात्र जागा होतों. मला झोंप येणें शक्य नव्हतें. शेवटीं कांहीं विचार मनांत पक्का करून मीं तिला हलवलें व म्हटलें, " झोपलीस वाटतं ? "

ती लगेच उठून बसली, व म्हणाली " झोप कुठली येतीय ! नुसतीच पडली होतें झालं."

मग कांहीं वेळ तसाच गेला.

थोड्या वेळानें मीं म्हटलें, " मी एक बेत पक्का केला आहे."

" तो काय ? "

" उद्यां ही जागा सोडून जायचं. इथं आतां राहायचं नाहीं."

तिच्या मनांतलेंच बोललों होतों, तरीहि ती म्हणाली, " पण दुसरी जागा मिळेल का ?...आणि चांगल्या वस्तींत एखादा चांगला ब्लॉक मिळवायचा म्हणजे फार महाग मिळेल."

" मिळूं दे महाग ? तिथं अर्धपोटीं राह्यलेलं परवडलं. पण इथं नको." मीं दिवा लावत म्हटलें.

नंतर थोड्या वेळानें मी पुन्हां म्हणालों, " आज दुपारपासून माझ्या मनाला फार त्रास झाला."

" होय ना ! "

" खरं सांगायचं म्हणजे त्या माणसाच्या तोंडांत मारायला मी पाहिजे होती. पण..."

" तुम्ही उगीचच फार लावून घेतां."

" लावून घेतो असं नाहीं, पण वाईट वाटतं ! यांत एक प्रकारचा अपमान वाटतो, पण खरं सांगायचं म्हणजे मारामारीची ही रग

आपल्यांतल्या कोणाच्याच अंगांत नाहीं. शारीरिक दृष्टीनं आपण दुबळे आहोंत. या दुबळेपणाची जाणीव मला काल भयंकर रीतीनं झाली."

मग थोडा वेळ पुन्हां स्तब्धता पसरली.

मीं पुढें म्हटलें, " इथले सगळे लोक कदाचित् वाईट नसतील ! पण काय असेल तें असो ! आपण त्यांच्यांत मिसळूं शकत नाहीं. आपला रंग, भाषा, आचार आणि विचार सारें वेगळें आहे. पूर्वीं साहेब लोकांच्या मडमा आपल्या समाजांत उठून दिसत, आणि त्या रस्त्यानें चालल्या कीं लोक टकटका पाह्यला लागत. आमच्या बायकाहि या भागांत तशाच उठून दिसतात."

" होय ना ? " कांहीं तरी बोलायचें म्हणून ती म्हणाली.

" आपली वस्ती इथून फार तर मैल दीड मैल अंतरावर असेल ! पण हा जणूं उत्तर ध्रुव नि तो दक्षिण ध्रुव ? "

" तुम्ही कशाला फार विचार करतां ! उद्यां ही जागा सोडायची आहे ना ? मला तुम्ही माहेरीं पोचवून द्या ! चांगला ब्लॉक मिळेपर्यंत तुम्ही कॉलेजच्या क्लबवर रहा, तिथें तुमचें थीसिसचें काम तरी होईल."

" चालेल ! " मीं म्हटलें व अंथरुणावर पडलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हांला दोघांनाहि एकदम हलकें हलकें वाटलें. आम्ही मग फार वेळ घालवला नाहीं. लगेच बांधाबांध केली, आणि समोरच्या हॉटेलकडे लक्षहि न देतां उत्तर ध्रुवावरून निघालों.

◎ ◎ ◎

## : २ : मन

मला बरें वाटत नव्हतें, म्हणून मी एके दिवशीं आमच्या नेहमींच्या डॉक्टरांकडे गेलों. त्यांनीं चार-पांच दिवस औषध दिलें व कांहीं इंजेक्शनें ठोकलीं, तरीहि बरें वाटेना–अस्वस्थता कमी होईनाच, तेव्हां मग आम्ही एका स्पेशलिस्ट डॉक्टरकडे गेलों.

स्पेशॅलिस्टानें मला स्क्रीनिंग मशीनपुढें उभें करून शरीरांतील सारा अंतर्भाग तपासून काढला, रक्तदाब बघितला. रक्त, थुंकी आदि गोष्टींहि तपासल्या, आणि मग माझ्याकडे बघत तो मला म्हणाला, " तुम्हांला कांहीं झालेलं नाहीं."

हताशपणानें मीं म्हटलें, " पण मला तर कित्येक दिवस बेचैन, अस्वस्थ वाटत आहे. कशांतच राम वाटत नाहीं. खावंसं वाटत नाहीं. हिंडावंसं वाटत नाहीं. किंवा काम करावंसंहि वाटत नाहीं. एखाद्या लांकडाच्या ओंडक्यासारखा मी निर्जीव आहें– चेतनाहीन आहें, असें मला सारखें वाटत आहे."

माझें रडगाणें स्पेशॅलिस्ट डॉक्टर शांतपणें ऐकून घेत होता. बोलणें थांबल्यावर त्यानें कांहीं वेळ विचार केल्यासारखें केलें आणि नंतर किंचित् हंसत हंसत त्यानें माझ्याकडे बघितलें, व तो म्हणाला, " तुमचं शरीर मीं तपासलं आहे. आय ॲम् कॉन्फिडन्ट, तुम्हांला कांहीं झालेलं नाहीं."

"...पण..." मी कांहींशा वैतागानें पुढें बोलायला लागलों. पण त्यांनीं मला पुढें बोलून दिलेंच नाहीं. तेच पुढें म्हणाले, " तुम्हांला म्हणजे तुमच्या शरीराला कांहीं झालं नाहीं. कदाचित् तुमच्या मनाला कांहींतरी झालेलं असेल— तुमचं मन बिघडलेलं असावं.

—दॅट मस्ट बी एक्झॅमिन्ड."

' मन तपासायला पाहिजे.' हे त्याचे उद्गार मला कसे तरीच वाटले, व मी चमत्कारिक नजरेनें त्याच्याकडे बघायला लागलों. तेव्हां तोच पुढें म्हणाला, "प्लीज डोन्ट मिस्अंडरस्टॅंड. मन फक्त वेड्यांचच तपासतात, ही आतां फार जुनी थियरी झाली. प्रत्येकाचं मन तपासलं पाहिजे, तें मधूनमधून साफहि करून घेतलं पाहिजे, असं हल्लीं नवीन मत आहे."

"मन तपासतां येईल एक वेळ, पण तें साफ कसं करतां येईल?"

"तेंच मी तुम्हांला सांगतों आहें. आपल्या घशाच्या थोडं खालीं आणि हृदयाच्या थोडं वर मन बसलेलं असतं. नवीन शोध असे आहेत कीं एक इंजेक्शन दिलं, कीं आंतली मनाची पट्टी बाहेर काढतां येते, आणि ती साफही करतां येते." स्पेशॅलिस्ट डॉक्टरनें माझ्याकडे बघत सांगितलें आणि माझी अविश्वासदर्शक मुद्रा बघून ते पुढें म्हणाले, "या नवीन डॉक्टरी प्रयोगांची तुम्हांला कांहीं माहिती नाहीं असं दिसत. पण इथं चर्चगेटजवळ असं एक क्लिनिक निघालं आहे. तिथं तुमचं मन बाहेर काढून साफ करून सहज देऊं शकतील."

त्यांचें बोलणें संपलें, आणि मग चार-पांच मिनिटें नुसतीच शांतता पसरली होती. डॉक्टर माझा अंदाज घेत होते, आणि मी विचार करीत होतों. शेवटी एकदांची ती शांतता संपली, आणि ते म्हणाले, "...तर मला वाटतें कीं, तुम्ही आपलं मन एकदां साफ करून घ्यावं." आणि नंतर एकदम ते उठले, आणि दरवाजाकडे जात म्हणाले, "कम् ऑन्. आपण आतांच त्या क्लिनिकमध्यें जाऊं. चार-आठ दिवसांत तुमचं मन साफ होऊन जाईल."

पण बोलण्याला अवसरच नव्हता. आणि नकार देणेंहि शक्यच नव्हतें; तेव्हां मी मुकाट्यानें त्यांच्या मागोमाग गेलों व मोटरमध्यें बसलों.

पांच-सात मिनिटांतच आम्ही चर्चगेटजवळ आलों, आणि सचिवालयाच्या बाजूनें थोडे पुढें गेल्यानंतर एका मोठ्या भव्य इमारतीपाशीं डॉक्टरांनीं मोटार थांबवली व ते खालीं उतरले. मींहि त्यांच्या मागोमाग उतरलों, आणि इमारतीकडे बघत चालूं लागलों.

आम्ही इमारतींत शिरलों, आणि शेवटच्या मजल्यावर जाऊन एका

मोठ्या हॉलमध्यें शिरलों. हॉलमध्यें मोटमोठीं कोचेस होतीं. आणि माझ्या-सारखे अनेक पेशंट्स डॉक्टरांच्या बोलावण्याची वाट पहात होते. भिंतीवर मानवी मनाचे कित्येक आलेख दाखविले होते. आणि एका कांचेच्या कपाटांत एक अगदीं किडलेलें, पार विघडून गेलेलें मनच मधमाशांच्या पोव्याप्रमाणें उलटें टांगून ठेवलेलें होतें.

त्या साऱ्या वातावरणाकडे चकित मुद्रेनें पहात, आणि आमच्या नंबरची वाट पहात मी बसलोंच होतों. रोग्यांचीं नांवें पुकारलीं जात होतीं. आणि ते आंत जात होते. त्यांपैकीं कुणाचीं मनें लगोलग तिथल्या तिथेंच धुऊन पुसून देण्यांत येत होतीं. कुणाला आठ-दहा दिवसांची मुदत सांगण्यांत येत होती. त्या साऱ्या रोग्यांकडे नुसतें बघत बसण्याशिवाय मला आणि माझ्या बरोबर आलेल्या डॉक्टरांना दुसरा उद्योगच नव्हता.

असाच आणखी बराच वेळ गेला आणि मग आम्हांला आंत बोलावणें आलें, व आम्ही धडधडत्या छातीनें व अस्वस्थ मनानें आंत गेलों. आंतील खोली तर आणखीच मोठी होती. पण तिच्यांत नानाविध उपकरणें, आणि यंत्रसामुग्री ठेवली असल्यामुळें ती लहान भासत होती. मध्यभागीं टेबलासमोर एक पोरसवदा गंभीर मुद्रेचा डॉक्टर बसला होता. सिनेमाच्या निगेटिव्ह प्लेटप्रमाणें त्याच्या पुढ्यांत अनेकविध भेंडोळीं पडलेलीं होतीं. मागच्या बाजूला कदाचित् लॅबोरेटरी असावी; कारण चमत्कारिक आवाज ऐकूं येत होता; आणि औषधांचा यावा, तसा गोड वास साऱ्या खोलीभर पसरलेला होता.

भ्यालेल्या कोंकराप्रमाणें मी त्या डॉक्टरच्या समोर बसलों, आणि माझ्या डॉक्टरांनीं माझी केस समजावून सांगण्यास सुरुवात केली. दहा-पंधरा मिनिटें ते दोघेच बोलत होते, आणि चर्चा करीत होते. मीं मात्र बलिदान करण्याला नियुक्त केलेल्या प्राण्याप्रमाणें त्यांच्यापुढें सुन्न बसलों होतों.

शेवटीं एकदांची चर्चा संपली आणि डॉक्टरांनीं माझ्याकडे बघितलें व किंचित् हंसून विचारलें, " काय होतंय ? "

" बरं वाटत नाहीं, सारखें अस्वस्थ वाटतं. कशातच रस वाटत नाहीं. " मी रडण्याच्या स्वरांत सांगत होतों. आणि ते बाह्यतः तरी ऐकल्यासारखें करीत होते. माझें सांगणें संपल्यानंतर ते दंतवैद्याच्या दवा-

खान्यांत असतात तशा एका खुर्चीजवळ गेले, आणि मला म्हणाले, " बसा तिच्यावर ! "

मी तिच्यावर बसलों आणि एका सेवकानें माझें डोकें घट्ट दाबून धरलें, आणि नंतर डॉक्टरनीं दुर्बिणीसारखें एक यंत्र डोळ्याला लावलें व कोठून तरी एकदम करंट सुरू झाल्यावर म्हटलें, " आ करा ! "

मी तोंड उघडलें; आणि खोल विहिरींत डोकावून बघावें तसे ते दुर्बिणीच्या सहाय्यानें माझ्या तोंडांत बघायला लागले. बराच वेळ ते बघत होते, आणि त्यांचा ' असिस्टंट ' ते सांगतील तो मजकूर टिपून घेत होता.

दहा-पंधरा मिनिटें ही कसरत चालली असावी. आणि नंतर ते बाजूला झाले. करंट बंद केला गेला, व ते मला म्हणाले, " उठा ! "

मी उठलों, आणि दुसऱ्या खुर्चीवर बसलों. डॉक्टरांनीं मग कसल्या तरी लोशननें हात धुतले व रुमालाला पुसत ते म्हणाले, " मला आश्चर्य वाटतं...फार आश्चर्य वाटतं..."

" कसलं आश्चर्य वाटतं ? " मी आणि माझ्या डॉक्टरांनीं एकदमच विचारलें.

आमचें विचारणें जणूं त्या डॉक्टरनें ऐकलेंच नाहीं. स्वतःशींच बोलल्या-सारखे ते पुटपुटले. " मला आश्चर्य वाटतं ! हाऊ यू आर पुलिंग ऑन् ! "

बोलण्यांत कांहींच अर्थ नव्हता. म्हणून आम्हीं दोघे उगाच बसलों, तेव्हां तेच माझ्याकडे तीव्र नजरेनें बघत म्हणाले, " युवर माइंड हॅज् बिकम् व्हेरी डर्टी ! प्लेटवर फारच घाण साठली आहे.—सगळं मन खराब झालं आहे. " इतकें बोलून ते स्वतःशींच हंसले, व आमच्या डॉक्टरांकडे बघून पुटपुटले. " नुसतं क्षुल्लक पोट साफ नसलं तरी माणसाला किती बेचैन वाटतं ! मग हें तर मन आहे. आज जवळ जवळ तीसपस्तीस वर्षांचीं जळमटं मनावर सांचलीं आहेत—जिकडे तिकडे डाग पडले आहेत ! अशा अवस्थेंत तुम्हीं ' पुल् ऑन् ' कसं करतां याचंच मला आश्चर्य वाटतं ! "

आश्चर्य वाटण्याजोगा हा प्रश्न होता. पण मी कांहीं बोललों नाहीं. पांच-सात मिनिटें तशींच शांततेंत नि स्तब्धतेंत गेलीं. शेवटीं कांहींतरी बोलायचें म्हणून माझ्या डॉक्टरांनीं विचारलें,

" आतां पुढें काय ट्रीटमेंट घ्यायची ? "

" पुढें ट्रीटमेंट....? " ते विचार करीत म्हणाले, " वरून औषधं देऊन साफ करून घेण्याच्या लायकीचं तुमच मन राहिलं नाहीं ! I am sorry. तें बाहेर काढलं पाहिजे आणि लोशनमध्यें टाकून साफ करून घेतलं पाहिजे. "

यावर मीं अगतिक मुद्रेनें डॉक्टरांकडे बघितलें. त्यांनीं कांहीं विचार केल्यासारखें करून संमतिदर्शक मान डोलावली तोंच ते दुसरे डॉक्टर पुढें म्हणाले, " लोशनमध्यें चारपांच दिवस मन ठेवलं कीं तें अगदीं स्वच्छ होऊन जाईल. त्याच्यावरचीं सगळीं जुनीं Impressions पार पुसून जातील आणि मग यू विल फील हॅपी. "

आम्हांला मान्यता देण्याखेरीज उपायच नव्हता ! आमचा रुकार बघितल्यावर त्यांनीं टेबलांतून एक नोटपेपर काढला, आणि त्यावर माझ्या-बद्दलची कांहीं माहिती लिहिली. नंतर घंटा वाजवून गड्याला बोलाविलें, आणि इन्जेक्शनची तयारी करण्यास सांगितलें व आम्हांस थोडा वेळ बाहेर बसण्यास सांगून ते इतर रोग्यांकडे वळले.

अर्धा पाऊण तास बाहेर बसल्यानंतर इतर रोग्यांची गर्दी संपली, आणि मग त्यांनीं आम्हांला पुन्हां आंत बोलावलें. आंत सारी तयारी पूर्ण झाली होती. असिस्टंटच्या हातांत इंजेक्शनची सुई होती. आणि तोंडावर पांढरें फडकें बांधून एक चुणचुणींत नर्स कामासाठीं सज्ज होती.

नंतर त्यांनीं मला त्या दंतवैद्याच्या खुर्चीसारख्या खुर्चीवर बसवलें, व एका पट्ट्यानें माझें सर्वांग बांधून टाकलें. आतां ते इंजेक्शन देणार इतक्यांत मला शंका आली, व मी त्यांना थांबवून म्हटलें,

" एक विचारूं का ? "

नाराजीनें म्हणावें तसा आवाज काढून ते म्हणाले, ' विचारा ना ! ',

" विचारायचं म्हणजे असं कीं तुम्ही माझं मन आतां काढून घेणार पण मला दुसरें मन कसं घालणार ? माझं मन साफ करून तें परत जागच्या जागीं बसवितांना मीं निर्मन अवस्थेंत रहाणार किंवा काय ? मनाशिवाय थोडा वेळ राहणं हें देखील कसं शक्य आहे ? "

माझे बोलणें ऐकून ते हंसले, व म्हणाले, " मनाशिवाय रहाणंहि इतकी अशक्य गोष्ट नाहीं. जिवंत रहायला हृदयाची आवश्यकता आहे ! मनाची नाहीं. तुमचं मन काढून घेतलं, म्हणून तुम्हांला हा प्रश्न विचारावासा वाटतो. पण काढून न घेतांहि कित्येकांची मनें काम करीत नाहींत—ते निर्मन अवस्थेंत रहातात, त्यांचें काय करायचं ? " इतकें बोलून ते थांबले, व मिस्किलपणें हंसत पुढें म्हणाले, " बहुतेक सगळ्या राजकारणी मुत्सद्यांचीं व मोठमोठ्या व्यापाऱ्यांचीं व कारखानदारांचीं मनें आम्हीं काढून घेतलेलीं नाहींत, पण तीं कुठें ' वर्क ' करतात ? ते सारा जन्म निर्मन अवस्थेंत घालवून आयुष्यभर सारे व्यवहार करतातच कीं नाहीं ? "

यावर मी कांहीं बोलणार होतों, पण त्यांनीं बोलण्याचा अवसर मला दिलाच नाहीं. ' असिस्टंट 'ला खूण करून त्यांनीं त्याच्या हातांतील इंजेक्शनची मोठी ' सिरिंज ' स्वतःच्या हातांत घेतली आणि माझ्या गळ्याच्या खालच्या भागाला टोंचली.

कांहीं वेळ तसाच बधिरावस्थेंत गेला, आणि नंतर माझ्या छातीच्या मध्यभागांतून यंत्राच्या घरघरीसारखे आवाज यायला लागले. थोड्याच वेळांत तोंड आपोआप उघडलें गेलें. आणि पडजिभेच्या खालून सिनेमाच्या निगेटिव्ह सारखी मनाची प्लेट अलगद बाहेर यायला लागली व डॉक्टरचा असिस्टंट ती ओढून घेऊन एका बेसिनमध्यें ठेवायला लागला.

मला हालचाल करतां येत नव्हती, पण मला सारें दिसत होतें. कळत होतें. खुर्चीवर पडल्या पडल्या मी माझ्या शरीरांतून बाहेर पडणाऱ्या मनाकडे बघत होतों आणि मला गंमत वाटत होती माझ्या शरीराचा तसू नि तसू मला माहीत होता—शरीराच्या चामडीवर तीळ कुठें आहेत, डाग कुठें आहेत, तिचा रंग कसा आहे, हें मला माहीत होतें. परंतु त्या चामडीच्या आंतल्या भागांत बंदिस्त असलेलें मन कसें आहे, हें मला माहीत नव्हतें. जें मी आजतागायत बघूं शकत नव्हतों, तें आतां माझ्या पुढ्यांत दिसत होतें, माझीच मला मोठी गंमत वाटत होती.

मी बघत होतों—आणि मनाची प्लेट बाहेर पडतच होती. प्रथम ती अगदीं स्वच्छ अभ्रकासारखी दिसत होतीं. पण पुढें ती गढूळ होत गेली.

आणि तिच्यावर नाना रंगांचे डाग दिसायला लागले व कसले तरी वास व दुर्गंधी यायला लागली. कधीं कधीं ती दुर्गंधी इतकी भयंकर होती कीं, ती सहन करणें तेथल्या लोकांनाहि अशक्य होतें. प्लेटवर बरेचसे काळे डाग होते, मधून मधून लाल रंगाचे, व इतर रंगाचेहि डाग होते. आम्ही बघत होतों आणि प्लेट बाहेर येतच होती.

असाच आणखी कांहीं वेळ गेला आणि मग एकदांची सर्व प्लेट बाहेर आली. मला एकदम हलकें वाटलें. डॉक्टरांनीं ती नुकतीच बाहेर निघालेली, निरनिराळे डाग असलेली, नाना तऱ्हेचें काम करणारी ती प्लेट मग एका बेसिनमध्यें ठेवली आणि माझ्या गळ्याभोंवतालचा पट्टा सोडला व मला तसेंच बसायला सांगितलें.

त्यांनीं मग ती प्लेट एका कसल्या तरी द्रव पदार्थानें धुतली आणि एका मोठ्या बिजलीच्या दिव्याच्या प्रकाशांत धरून ते तिचें निरीक्षण करायला लागले. प्लेट खरोखरच खराब झाली होती. आणि तिच्यावर नाना तऱ्हेचे डाग पडले होते. डॉक्टरांनीं एकदां प्लेटकडे बघितलें, व मग ते माझ्याकडे वळून म्हणाले, "यावर काळे डाग फार दिसतात."

मी कांहींच बोललों नाहीं. विचार करून ते म्हणाले,

"काळा रंग निराशेचा, डिस्अपॉइंटमेंटचा रंग आहे. चाळीस-बेचाळीस वर्षांच्या तुमच्या आयुष्यांत अनेक आशांचे कोळसे झाले आहेत आणि त्यांनीं प्लेटवर आपली निशाणी रंगविली आहे."

यावर मी बोलावें अशी त्यांची इच्छा नसावी ! आणि बोलायचें असलें तरी मी काय बोलणार ? आजपर्यंत अनेक निराशा—अनेक दुःखें—मी मनाच्या अंधारांत काळ्या दोऱ्यानें बांधून ठेवलीं होतीं. तीं मी त्यांच्यापुढें कशी उभी करणार ? लहानपणीं मला डॉक्टर होण्याची आकांक्षा होती. पण ती पुरी झाली नाहीं. व मला कारकून व्हावें लागलें. त्या निराशेचा भला मोठा काळा ठिपका तर मला इतक्या लांबूनहि ओळखूं येत होता ! प्रेमभंगाचें दुःख, अपमानाचें दुःख, अपेक्षाभंगाचें दुःख अशीं अनेक दुःखें त्या मनाच्या प्लेटवर काळ्या ठिपक्यांनीं चितारलेलीं होतीं. इतके दिवस मी त्या जुन्यापुराण्या, म्हाताऱ्या दुःखांना विसरूनहि गेलों होतों. परंतु इतक्या लांबूनहि तीं मला आतां दृग्गोचर होत होतीं.

त्या काळ्या डागांकडे बघतां बघतां, डॉक्टरांचें कांहीं लाल रक्तासारखे लाल दिसणाऱ्या ठिपक्यांकडे लक्ष गेलें, आणि ते म्हणाले, " हे सूडाचे डाग आहेत ! आयुष्यांत ज्या व्यक्तींनीं तुम्हांला त्रास दिला, अपमानित केलं, त्या सर्वांवरच्या रागाचे सूडांत रूपांतर झालें आहे. जोंपर्यंत तुम्ही सूड घेऊं शकत नाहीं, तोंपर्यंत हे डाग तसेच राहणार—तसेच राहणार ! "

मनाची रीळ डॉक्टर उलगडत चालले होते आणि आम्ही दोघे त्याकडे बघत बसलों होतों. मधेंच सडलेल्या अवयवांसारखे दिसणारे कांहीं ओंगळ डाग दृष्टीस पडले. त्यांकडे बघून ते म्हणाले, " मिस्टर ! तुमचं मन अनेक ठिकाणीं किडलेलं आहे. कित्येक व्यक्तींबद्दल तुम्ही गुप्त असूया बाळगीत आहांत ! त्यांचं चांगलं झालेलं तुम्हांला बघवत नाहीं—त्यांचं यश तुम्हांला खुपतं—गुप्तपणानं दुःख देतं. त्यांच्याविषयींची सारी असूया, आणि मत्सर या तुमच्या प्लेटवर किळसवाण्या स्वरूपांत उभी आहे." इतकें बोलून ते थांबले, व कांहीं विचार करून मजज़वळ येत व मला पाठीवर थोपटीत पुढें म्हणाले, " तुमचं मन कमालीचं नासलं आहे. किडलं आहे. इतकी सारी घाण मनांत ठेवून तुम्ही वावरतां हें आश्चर्य आहे ! त्यामुळेंच तुम्हांला असं अस्वस्थ वाटतं ! आणि बेचैनी येते. पण डोन्ट वरी ! मी हें मन आठ-पंधरा दिवसांत साफ करून देतों. तोंपर्यंत अगदीं लहान मुलाचं स्फटिकशुभ्र मन मजजवळ आहे तें मी ' डमी मन ' म्हणून तुम्हांला बसवून देतों म्हणजे तुम्हांला बरं वाटेल. अगदीं लहान मुलासारखं वाटेल. अजून सात-आठ दिवसांनीं तुम्ही परत याल तेव्हां तुमचं स्वतःचं साफ केलेलं मन तुम्हांला मिळूं शकेल." इतकें बोलून त्यांनीं एका मोठ्या कपाटांतलें, लहान मुलाचें मन बाहेर काढलें व माझ्या शरीरांत नीट बसवून दिलें. तें बसवल्यानंतर आम्ही तेथून निघालों आणि घरीं परतलों.

ती रात्र बरी गेली. मला अगदीं हलकें फुलकें—फुलासारखें वाटत होतें. त्या रात्रीं मी घरांतील माणसांशीं हंसतखेळत नीट बोललों. जेवणें झाल्या-नंतर एकदम अगदीं लहान मुलासारखा झोंपीं गेलों. इतक्या लवकर झोंप येणें, हें गेल्या कित्येक वर्षांत शक्य झालें नव्हतें. अंथरुणावर पडलों, कीं नाना तऱ्हेचे विचार, नाना तऱ्हेच्या आठवणी माझ्या मनांत धिंगाणा घालतात.

आणि झोंपीं जाणें अशक्य करून टाकतात. परंतु त्या दिवशीं तसें कांहीं झालें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठलों, आणि रविवार असल्यामुळें, बराच वेळ घरीं रेंगाळून बाहेर पडलों. ठाकुरद्वारांतून, आणि गिरगांवांतून एखादी चक्कर मारायची, लहानपणापासून पाहिलेलीं ठिकाणें पुन्हां पहायचीं, आणि कुठें तरी हॉटेलांत फक्कडसा चहा प्यायचा असा माझा रविवारचा नेहमींचा कार्यक्रम असतो. त्याचप्रमाणें बाहेर पडलों.

वाडीच्या बाहेर पडून नेहमींच्या रस्त्याला लागलों, आणि संवयीप्रमाणें इकडे तिकडे बघत चाललों, पण माझ्या एकदम लक्षांत आलें, कीं आस-पासचें जग त्या दिवशीं एकदम बदललें गेलें आहे. इतके दिवस माझ्या डोळ्यांनीं पाहिलेलें—माझ्या मनानें निर्मिलेलें जग आज कांहीं वेगळेंच दिसत आहे. त्यांत नेहमींचे रंग नाहींत, नेहमींचे गंध नाहींत, नेहमींचा—माझ्या मनानें निर्मिलेला आणि म्हणूनच मला आवडणारा रसहि नाहीं. खरें सांगायचें म्हणजे जग तेंच होतें. इमारती, रस्ते, दुकानें आणि माणसें सारीं तशींच होतीं. परंतु मला तीं निराळीं वाटत होतीं.

मी पुढें चाललोंच होतों. आणि मला आश्चर्य वाटत होतें. चुकल्या-सारखें आणि कसेंतरीच वाटत होते. सारखें लक्षांत येत होतें कीं मी नेहमीं बघणारें—रमणारें जग हें नव्हे ! कोणीतरी जादूच्या कांडीनें माझ्या त्या नेहमींच्या जगाचा विध्वंस केला आहे. आणि नवीनच आळणी, व बेचव जगाचा पट माझ्यापुढें कुणी तरी मांडला आहे.

या अवस्थेंत हिंडतांना, मला अनेक ओळखीचीं माणसें भेटलीं. माझ्या प्रेमाला झिडकारून एका श्रीमंत डॉक्टराशीं लग्न लावणारी नलू दिसली. ऑफिसांतला हेडक्लार्क दिसला. मी ज्याला मूर्ख आणि बावळट समजत होतों, परंतु जो जीवनांत कमालीचा यशस्वी झाला होता असा एक लहान-पणचा मित्र भेटला. पण तीं सारीं माणसें भेटल्यानंतर माझें मन जें ठराविक प्रतिसाद नेहमीं देत असे, तसे त्या दिवशीं माझ्या नव्या मनानें दिलेच नाहींत. नलूबद्दल त्या दिवशीं मला रागहि वाटला नाहीं किंवा तिच्या नवऱ्याबद्दल मत्सर किंवा द्वेषहि वाटला नाहीं. त्यांच्या लग्नानंतर

जवळ जवळ पहिल्यांदाच मी त्यांच्याशीं कपाळाला आठ्या न घालतां बोललों, आणि त्यांच्या सुखी संसाराविषयीं आनंद व्यक्तविला. हेडक्लार्कला त्या दिवशीं मी मुळींच घाबरलों नाहीं—उलट त्यांच्याशीं चार सांसारिक गप्पा मारल्या. आणि वैभवाच्या शिखरावर चढलेल्या त्या माझ्या शाळू सोबत्याला मी त्या दिवशीं मुळींच चुकविलें नाहीं—किंवा त्याच्यापुढें 'मीहि कोणी आहें' असा खोटा आविर्भाव केला नाहीं. त्या दिवशीं मी अगदीं सरळ सरळ त्याचें कौतुक केलें व विनासंकोच माझा पराभव कबूल केला.

मी चाललोंच होतों, आणि मग माझ्या जुन्यापुराण्या, डागळलेल्या, अनेकविध डाग पडलेल्या मनाची आठवण एकदम प्रकर्षानें झाली. ठाकुरद्वारचे नि गिरगांवांतील रस्ते जर पुन्हां चैतन्यानें भरून टाकायचे असतील तर माझें जुनें मन पुन्हां हस्तगत करायला पाहिजे याची खात्री पटली. माझें मन बदलल्यामुळें मीहि बदललों—माझें 'मी' पण नाहींसें झालें; मी मेलों, आणि दुसराच 'मी' जन्माला आलों हें मला एकदम कळलें आणि जुना मी जिवंत करण्याची जरूरी भासायला लागली.

हिंडतां हिंडतां त्या जुन्या 'मी'ची एकदम तीव्रतेनें आठवण होऊन बेचैनी वाढली. जुन्या 'मी' शिवाय जगणें अशक्य आहे, याची जाणीव झाली व नवीन बसविलेल्या स्फटिकशुभ्र डमी मनाचें ओझें वाटायला लागलें. हळूहळू तें ओझें सहन होईना—त्याच्याखालीं जीव गुदमरायला लागला आणि मग मीं एकदम ठरविलें—एकदम साक्षात्कार व्हावा तसें ठरविलें कीं, त्या क्लिनिकमध्यें परत जायचें आणि जुनें मन ताब्यांत घ्यावयाचें! जुनें मन हस्तगत करणें एवढाच ध्यास मग मला लागला.

मग मी वेळ घालविला नाहीं. लगेच टॅक्सी करून, त्या डॉक्टरकडे गेलों. माझें तें जुनें मन अजूनहि लोशनमध्यें तसेंच पडलें होतें. ते अजून साफ झालें नव्हतें हें पाहून मला एकदम आनंद झाला व मी डॉक्टरांपुढें लोटांगण घालीत म्हणालों, "डॉक्टरसाहेब, मी परत आलों आहें. माझं मन मला परत द्या."

"अहो पण तें डागाळलेलं आहे; त्यावर काळे पिवळे डाग पडलेले आहेत..."

" असूं द्या ! असूं द्या ! त्या डागांसहित माझं मन मला परत द्या ! " मी निर्वाणीच्या सुरांत म्हणालों.

डॉक्टरांनीं कांहीं वेळ विचार केला आणि नंतर ते गंभीर मुद्रेनें म्हणाले, " ऑल् राइट ! माझं काय जातं ? "

आणि असें म्हणून त्यांनीं माझें किडलेलें, डागाळलेलें मन रागारागानें उचललें व मला खुर्चीवर पाडून क्षणार्धात बसवून दिलें.

त्यांचे पैसे देऊन मी माझ्या किडक्या मनानें बाहेर पडलों व मुंबईच्या रस्त्यावरून मजेनें हिंडूं लागलों. आणि काय आश्चर्य ! जीवनांत पुन्हां पूर्वींचेच रंग निर्माण झाले. पुन्हां स्वारस्य वाटायला लागलें. जुना 'मी' परत जागा झाला, आणि आसपासचें जग त्याच्या मनानें निर्माण केलेल्या द्वेष, प्रेम, असूया इत्यादि रंगांनीं न्हाऊन निघालें.

◎ ◎ ◎

## : ३ : मुलगा

घरांचे नंबर शोधीत मीं निरनिराळ्या रस्त्यांतून चकरा मारीत होतों. मयसभेसारखे ते नंबर क्षणांत मला आशा दाखवीत होते, क्षणांत माझी निराशा करीत होते. नुसत्या नंबरांवरून घर शोधणें पुण्यांत किती कठीण आहे हें माहीत असूनसुद्धां मी तें दिव्य करण्यास सिद्ध झालों होतों. मी पुण्यास बऱ्याच दिवसांनीं आलों असल्यामुळें माझ्या सरावाचीं पूर्वींचीं ठिकाणें कुठल्या कुठें नाहींशीं झालीं होतीं आणि त्यामुळें माझा आणखीनच घोटाळा उडत होता. पण तो सारा घोटाळा सहन करून मला एक नंबर शोधणं भागच होतं. त्या घरनंबरांत जाऊन एक काम करणं मला आवश्यक होतं.

शेवटीं शोधतां शोधतां मी एका गल्लींत शिरलों, नि घरं बघायला लागलों. हळूहळू ती गल्ली ओलांडून मी दुसऱ्या मोठ्या गल्लींत शिरलों आणि मला किंचित् आश्चर्य वाटलं. मी पुन्हां निरखून पाहिलं, तर खरंच, तीच ती गल्ली होती ! माणसं बदलावींत—म्हातारीं दिसायला लागावींत, तशीं तेथील कित्येक घरं आतां बदललीं होतीं—म्हातारीं झालीं होतीं, पण त्यांच्यांतील चैतन्य अजून तसंच धुगधुगत होतं.

मला आठवलं. एकदम आठवलं. पंधरा-सोळा वर्षांपूर्वीं कायद्याचा अभ्यास करीत असतांना मी याच गल्लींत रहात होतों. होय, हीच ती गल्ली ! गल्लीच्या टोंकाशीं असलेली तालीम आजहि तिथें उभी आहे, आणि लाल मातीचा चमत्कारिक तऱ्हेचा घामट वास अजूनहि त्या कौलारू घरासमोरून येत आहे. त्याच्यापुढें गेल्यानंतर एक मोठं तिमजली निळ्या रंगाचं घर लागे—आजहि तें तसंच आहे. गाडगीळ सबजज्जांचा वाडा असं

त्या घराचं तेव्हां नांव होतं, आणि सबजज्जांची थोरली कॉलेजांत जाणारी मुलगी तेव्हां विशेष सुंदर व फॅशनेबल समजली जात असल्यामुळें तें घर त्या वेळीं आळींतील तरुण लोकांच्या चर्चेचं नि निरीक्षणाचं एक महत्त्वाचं केंद्र झालं होतं. विद्यार्थिदशा सोडून मला आज इतकीं वर्षे झालीं, पण त्या वेळीं दुसऱ्या मजल्यावरील गॅलरींत उभ्या असलेल्या गाडगीळांच्या मुलीकडे मी चोरटा कटाक्ष टाकीत असे, त्याची मला आठवण झाली, व हसूं आलं.

गाडगीळांच्या पुढचीं घरं मग मला पाठ होतीं. पांच-सात घरं टाकलीं कीं, ती मोठी चाळ लागे, तिच्यांत दुसऱ्या मजल्यावर तर माझी त्या वेळीं खोली होती! त्या चाळीकडे बघतां बघतां मीं माझं काम विसरलों. शोधून काढण्याच्या पत्त्याची मला शुद्धबुद्धहि राहिली नाहीं. त्या चाळींत कित्येक वर्षांपूर्वीं घालविलेलं माझं जीवन मी प्रयत्नपूर्वक आठवीत होतों—त्यावर विचार करून मनांतल्या मनांत मी तें जीवन पुन्हां जगण्याचा प्रयत्न करीत होतों.

मी पुढें चाललोंच होतों आणि चाळ जवळ येत चालली होती. कांहीं विलक्षण जुन्या आठवणीमुळें माझी छाती धडधडत होती, आणि बेभान माणसासारखा मी पुढें चाललोंच होतों.

इतक्यांत चाळ आलीच; आणि कोपऱ्यावर उभा राहून मी तिच्याकडे वेड्यासारखा बघायला लागलों. खालच्या मजल्यावर पूर्वीप्रमाणेंच खालच्या जातीच्या लोकांची वस्ती होती. पूर्वीप्रमाणेंच त्यांपैकीं बहुतेक बिऱ्हाडं परटाचीं होतीं—एक-दोन गवळ्यांचीं होतीं. मी उभा होतों तेथून खालच्या मजल्यावरील कोपऱ्यावरचं बिऱ्हाड मला स्पष्ट दिसत होतं. त्या बिऱ्हाडांत मीं पाहिलं, आणि बिजलीचा धक्का बसावा तसं मला वाटलं. पंधरा-सोळा वर्षांपूर्वीसारखंच त्या घरातलं ठराविक दृश्य होतं. कपड्यांची रास पडलेली होती आणि बाहेरच्या बैठ्या लांबटसर टेबलावर इस्त्री जळत होती व तिच्यांतील कोळशाचा कांहींसा उग्र वास येत होता. कोणाच्या तरी कपड्यावर इस्त्री मारण्याचं काम दादू करीत होता! तो दादू होता, हें मी तेव्हांच ओळखलं. सोळा-सतरा वर्षांपूर्वीं जसा तो एक

मळकट गंजीफ्रॉक घालून इस्त्री करीत उभा असे, तसाच तो आतांहि उभा होता.

दमेकरी लोक जसे एका चमत्कारिक आवाजांत खोकतात तसा तो अजूनहि खोकत होता. मीं त्याला ओळखलं, पण तो मला ओळखणं शक्यच नव्हतं.

मी लांबूनच दादूच्या घराकडे टक लावून पहात होतों, इतक्यांत एक पंधरा-सोळा वर्षांचा, तेलकट केसांचीं झुलपं उलटीं वळविलेला, व किंचित् गोरटेला मुलगा सायकलवरून आला आणि कपड्यांचं ओझं लांबूनच दादूच्या पुढ्यांत टाकून कांहीं तरी मोठ्यांदा बोलायला लागला. त्या मुलाची सायकल माझ्या अंगावरच आदळणार होती, म्हणून मीं स्वतःला सावरून त्याच्याकडे पाहिलं. त्याची नि माझी दृष्टादृष्ट होतांच माझ्या मनांत कांहीं जुन्या आठवणी उभ्या राहिल्या व कसंसंच वाटलं.

त्या मुलाकडे पाहून कांहीं शंका मनांत उभ्या राहिल्या, त्यांनीं मला अस्वस्थ केलं; व मी लांबूनच दादूच्या घराच्या आंतल्या खोलीकडे पाहिलं. आंतल्या खोलींत अंधार होता—पूर्वीं जसा असे तसाच! पण त्या अंधाऱ्या घरांत आतां पूर्वींसारखी हालचाल नव्हती—सारं अगदीं शांत होतं.

तशा अवस्थेंत फार वेळ उभं रहाणं शक्यच नव्हतं—माझ्या दर्जाला नि वयाला तें शोभलंहि नसतं. मग मी कांहीं वेळ विचार केला आणि चाळी-समोरच्या हॉटेलांत शिरलों. पंधरा-सोळा वर्षांपूर्वीं ही आळी मी सोडली तेव्हां त्या जागीं हॉटेल नव्हतं—किराणा मालाचं छोटेखानी दुकान होतं तिथं त्या वेळीं! तें दुकान कुठं गेलं कुणास ठाऊक! त्या दुकानाच्या जागीं चहा-चिवड्याचं बारकंस हॉटेल आलेलं दिसत होतं, हें मात्र खरं!

बेभान अवस्थेंत, एखाद्या नशाबाज माणसासारखा मी मग त्या हॉटेलांत शिरलों व रस्त्यालगतच्या खिडकीजवळची जागा पटकावली. चहाची ऑर्डर दिली, व वर्तमानपत्र समोर धरलं. बाह्यतः मी शांत होतों, पण वाचनांत माझं लक्ष नव्हतं. वर्तमानपत्राच्या आडून मी समोरच्या चाळीच्या खालच्या मजल्यावरील दादूच्या बिऱ्हाडाकडे पहात होतों; आणि मनाला जुन्या आठवणींचे कढ येत होते. हॉटेलांतील खुर्चीवर बसल्या बसल्या मला

चाळीच्या दुसऱ्या मजल्यावरील जिन्याजवळची दोन खणांची खोलीहि दिसत होती. त्याच खोलींत मी पूर्वी रहात होतों; आज तिथं कोण रहात होतं कुणास ठाऊक !

पण आज त्या खोलींत रहाणाऱ्या बिऱ्हाडाशीं मला काय करायचं आहे ? सोळा-सतरा वर्षांपूर्वी मी त्या खोलींत होतों आणि त्या वेळच्या चमत्कारिक आठवणी मला आत्तां बेचैन करीत होत्या, हें मात्र खरं !

तेव्हां मी नुकताच कायद्याची पहिली परीक्षा पास झालों होतों आणि दुसऱ्या परीक्षेच्या अभ्यासास जोरानं सुरुवात केली होती. माझे वडील दिवसानुदिवस थकत चालले होते आणि लवकर परीक्षा पास होऊन कऱ्हाडास जाऊन त्यांच्याबरोबर प्रॅक्टीस सुरू करण्याची मला निकड होती.

त्या वेळीं युद्ध नुकतंच सुरूं झालं होतं, आणि पुण्यांतील घरांची टंचाई जोरांत सुरू झाली होती. कॉलेजच्या वसतिगृहांत जागा न मिळाल्यामुळें मी खोलीसाठीं गांवभर वणवणा हिंडत होतों, पण मला खोली मिळत नव्हती. शेवटीं बऱ्याच प्रयत्नानंतर मला खोली मिळाली होती. माझे एक मित्र त्या वेळीं नूतन मराठींत मास्तरकी करीत होते, त्यांना सैन्यांत एकदम कामिशन मिळालें होतें. ते युद्धावर गेले, व त्यांच्याच खोलींत मीं माझं बिऱ्हाड थाटलं.

मी त्या खोलींत रहायला येऊन एक-दोन दिवस झाले असतील ! अजून आसपासच्या बिऱ्हाडांशीं माझी ओळख नव्हती—व ती करून घेण्याची माझी इच्छाहि नव्हती. तेथें सगळा गरीब शाळामास्तरांचा व कारकुनांचा भरणा होता, मला त्यांच्याशीं कांहींच कर्तव्य नव्हतं.

मला वाटतं खोलींत आल्याच्या दुसऱ्या का तिसऱ्याच दिवशीं सकाळीं माझा चहा झाला होता आणि आंतल्या खोलींतील मोरीच्या कट्ट्यावर चहाचीं भांडीं तशींच विसळायचीं पडून राहिलीं होतीं. बाहेरच्या खोलींत छोट्या आरशासमोर बसून मी दाढी करीत होतों.

इतक्यांत दार वाजलं, नि प्रथम एक लहान दोन-तीन वर्षांचा काळा बेंद्रा मुलगा व नंतर अठरा-वीस वर्षांची स्त्री दरवाजांत भीत भीत उभी राहिली. हनुवटीवर साबण चोळतां चोळतांच मीं त्या स्त्रीकडे पाहिलं. ती

विशेष सुंदर नव्हती, पण अंगापिंडानं भरत होती. तिनं कसलं तरी दोन रंगांचं लुगडं नेसलं होतं, आणि तसलीच चोळी घातली होती. दारांत उभी राहून, आपल्या किंचित् मोठ्या वाटणाऱ्या काळ्या डोळ्यांनीं ती माझ्याकडे पाहत उभी होती.

तिची व माझी दृष्टादृष्ट झाल्यानंतर मीं विचारलं, "काय पाहिजे?"

ती कांहींच बोलली नाहीं—नुसतीच लाजली व खालीं मान घालून खालच्या वर्गाच्या बायका फिदीफिदी हंसतात तशी हंसली.

त्या हंसण्याची गंमत वाटून मीं पुन्हां विचारलं, "काय पाहिजे?"

माझ्या डोळ्याला डोळा भिडवीत ती म्हणाली, "तुम्हीं इथें नव्यानीच रहायला आलांत जणुं!"

मीं म्हटलं, "होय ना!"

"तुमच्या पूर्वीचे मास्तर इथं होते, त्यांच्याकडे मी कामाला होतें. तुम्हांला कामाला माणूस पाहिजे का म्हणून विचारायला आलें होतें.

"कामाला बाई!" मी हंसत म्हटलं, "छे माझ्याकडे कामच नाहीं."

"भांडीं विसळायला, केर काढायला, नि धुणीं धुवायला बाई नको का?"

किंचित् तुटकपणानं मी म्हटलं, "नको!"

यावर ती हिरमुसली होऊन खालीं बघायला लागली. मला काय वाटलं कुणास ठाऊक, पण मीच पुढें बोलून गेलों, "नाहीं तर असं करा! या उद्यांपासून कामाला...भांडीं विसळायचीं, केर काढायचे, नि कपडे धुऊन टाकायचे! या सगळ्या कामाचं काय घेणार?"

"तुम्ही द्याल तें!" ती आळोखेपिळोखे देत, व हंसत म्हणाली.

"बरं बरं, ठरवूं उद्यां काय तें!" मीं म्हटलं व कामाला लागलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी चहा करीत असतांनाच ती आली व म्हणाली, "केरसुणी कुठं आहे?"

मीं दरवाज्याकडे बोट दाखविल्यानंतर ती म्हणाली, "तुम्हीं बाहेर गॅलरींत उभे रहा. मी तोंपर्यंत झाडून घेतें."

थोड्याच वेळांत तिनं सारं साफ केलं, व मी आंत आलों, बाई खरंच टापटिपीची होती. तिनं दोन्ही खोल्या नीट साफ केल्या होत्या व कॉटवरची माझी गादी झटकून नीट घातली होती. आंतल्या खोलींतल्या कट्टयावर घासून पुसून ठेवलेलीं भांडींहि चांगलीं लखलखीत दिसत होतीं.

मी खूष होऊन म्हटलं, " छान काम केलंस ! "

ती कांहीं बोलली नाहीं, नुसतीच हंसली.

तिच्याकडे पहात मीं म्हणालों, " मी आंघोळ करून घेतों, नि मग जेवायला जाईन ! खानावळींतून मी आल्यावर तूं कपडे घेऊन जा."

ती " बरं " म्हणाली व मी जेवायला गेलों. जेवून परत आलों तर ती खोलीसमोर उभी होतीच ! मी आश्चर्यानं विचारलं " हें काय ? तुला कसं कळलं मी येत आहे म्हणून ? "

कांहींच न बोलतां ती तोंडाला पदर लावून फिदीफिदी हंसली व नुसतीच उभी राहिली.

मग मीं दार उघडलं, व ती आंतल्या मोरीवर कपडे धूत बसली. तिचं होईपर्यंत मी नुसताच बाहेर बसून राहिलों.

असेच दोन-तीन दिवस गेले. एके दिवशीं सकाळीं दूध न आल्यामुळं मी नुसताच बसलों होतों. इतक्यांत ती आली व खोली झाडतांना म्हणाली, " आज दूध नाहीं आलं ? "

" नाहीं ना ! त्यामुळें तर माझा चहा अडलाय ! "

" मग द्या कीं भांडें ! मी आत्तां खालून घेऊन येतें. " असं म्हणून ती खालीं गेली, व थोड्याच वेळांत दूध घेऊन आली.

मीं तिला म्हटलं, " हें काय ? इतक्या लवकर कुठून आणलंस ? "

" इथून खालूनच– माझ्या घरांतून " ती हंसत म्हणाली.

" म्हणजे, तुझ्या घरीं दूध मिळतं ? "

माझा प्रश्न सरळ होता, पण त्यांत चावटपणाचा–मुक्त शृंगाराचा भाग कल्पून ती लाजल्यासारखं करून तोंडाला पदर लावून फिदीफिदी हंसली, व माझ्या डोळ्यांत डोळा घालीत म्हणाली, " माझ्याकडे दूध मिळतं ना–मोप मिळतं. "

तिची दृष्टादृष्ट झाल्यानंतर माझं सर्वांग शहारलं—किंचित् झिणझिणलं. मी स्वर बदलीत म्हणालों, " इतके दिवस मी तुला परिटीणबाई म्हणत होतों — आतां तूं गवळणबाई झालीस. "

" मी गवळणबाई नाहीं — माझ्या भावाच्या म्हशी आहेत, तिथलं दूध मी विकतें. "

" असं होय ? मग मलाहि तेंच दूध पाहिजे. सकाळचं अर्धा शेर आणि रात्रींचंहि ! " मी तिच्या डोळ्याला डोळा भिडवीत म्हणालों.

एवढ्या वेळांत माझा चहा तयार झाला होता. त्यातला एक कप तिच्या हातांत देऊन मी म्हटलं, " इतके दिवस मी तुला नुसतं परिटीणबाई, परिटीणबाई म्हणत आहे—पण तुझं नांव तरी काय आहे ? "

भिंतीजवळ चहाचा पेला हातांत धरून ती उकिडवी बसली होती, माझा प्रश्न ऐकून ती पुन्हां एकदां फिदीफिदी हंसली, व उगीच बसली.

मी मग स्वरांत शक्य तितका कोमलपणा आणीत म्हटलें, " अं ! नांव काय तुझं ? "

कपबशी विसळीत ती म्हणाली, " माझं नांव व्हय ?—मला हौशी म्हणतात ! "

" हौशी ?...नांव मात्र छान आहे. "

" तुम्हाला आवडलं ना ? " ती हंसत म्हणाली.

" आणि तुझ्या मुलाचं नांव ? "

" त्याला लक्षा म्हणतात. "

" बरं ! " मी हंसत म्हटलं, " आणि नवऱ्याला काय म्हणतात ? "

ती कांहींच न बोलतां नुसतीच लाजली, व उभी राहिली.

मी पुन्हां विचारलं, " नवऱ्याचं नांव काय ग ? "

" नांव कुणी सांगतं का ? " ती लाजत म्हणाली व पदराला हात पुशीत म्हणाली, " चला ! जातें मी खालीं. "

मला काय वाटलं, कुणास ठाऊक ? पण मी एकदम दाराजवळ जाऊन म्हटलं, " नवऱ्याचं नांव न सांगतां जाऊं देणार नाहीं. "

घाबरल्याचा अभिनय करीत ती म्हणाली, "नका, नका, जाऊं दे मला ! "

" नाहीं जायचं " मी म्हटलं, व दार लावलं.

ती जवळ येऊन माझ्या अंगाला झटत म्हणाली, “ जाऊं द्या मला. ”

“ नाहीं जायचं ” तिचा हात धरून तिला जवळ घेत मी म्हटलं. एवढ्या वेळांत माझ्या शरीरानं पुरता पेट घेतला होता, व तिच्या मांसल बांधेसूद वक्षस्थलांनीं मला गुदगुल्या करायला सुरुवात केली होती. स्त्री-स्पर्शाचा माझा तो अगदींच पहिला प्रसंग नव्हता. तरीहि त्या निःशंक आलिंगनानं मी बेभान झालों.

तेवढ्या वेळांत तिनं माझा हात बाजूला सारून दार किलकिलं केलं होतं. ती जाणार असं पाहून मी मोठ्यांदा ओरडलों, “ हौशे नांव सांगितल्याशिवाय जायचं नाहीं.”

“ बरं सांगतें ! ” ती हंसून म्हणाली, “ त्यांचं नांव दादू आहे.”

“ पुन्हा सांग ! काय नांव आहे ? ”

ती दार उघडीत, व डोळ्यांची उघडझाप करीत म्हणाली,

“ सांगेन, पुन्हां केव्हां तरी ! ”

ती गेली, व मी दाराला कुलुप लावून बाहेर पडलों.

त्यानंतर जेवून लवकर यायचं व ती धूत असतांना तिथें थट्टामस्करी करीत बसायचं, याची मला चटकच लागली. आज इतके दिवस त्या गोष्टीला झाले, परंतु मला आश्चर्य वाटतं कीं खालच्या वर्गाच्या, किंचित् घाणेरड्या, अशिक्षित, व एक मूल असलेल्या स्त्रीबद्दल मला त्या दिवसांत इतकं आकर्षण कसं वाटत होतं ? नात्यामध्यें, ओळखीच्या, आणि कॉलेजमध्यें कित्येक मुली व स्त्रिया माझ्या परिचयाच्या होत्या, पण हौशीबद्दल जसं आकर्षण मला वाटे, तसं त्यांच्याबद्दल कधींहि वाटलं नव्हतं. कदाचित् एक कारण असं असेल कीं त्या साऱ्या पांढरपेशा स्त्रियांबरोबर बोलतांना स्त्रीशरीराबद्दलचं आकर्षण सुप्त स्वरूपांत ठेवणं मला भाग पडे. त्यांच्या बरोबर वाङ्मयाबद्दल, राजकारणाबद्दल व इतर अनेक गोष्टींबद्दल बोलावं लागे व त्यांच्याविषयींचं वैषयिक आकर्षण दाबून लपवून ठेवावं लागे. पण हौशीच्या बाबतींत तसं कांहीं नव्हतं. पुरुषाला स्त्रीशरीराबद्दल आकर्षण वाटावं, व तें बोलून दाखवावं, यांत तिच्या बाबतींत गैर कांहीं नव्हतं. ज्या तऱ्हेची किंचित् अश्लील वाटणारी थट्टा मी तिची उघड उघड करीत होतों, तशी दुसऱ्या

पांढरपेशा स्त्रीची करणं कधीं शक्य होतं का? त्या खुल्या खेडवळ शृंगारामुळेंहि ती मला तेव्हां जास्त आवडत असेल.

एके दिवशीं दुपारीं मी असाच आरामशीर झोपलों होतों. झोप नुकतीच संपली होती, आणि बाहेर जगहि शांत होतं. मजल्यावरील सगळे पुरुष कामावर गेले होते आणि बायका घरांत आराम करीत पडल्या होत्या. इतक्यांत—

दाराबाहेर काकणं वाजलीं, व हलक्या आवाजांत कुणाच्या तरी हांका ऐकूं आल्या. मी उठलों व दार उघडलं. ती हौशी होती व तिच्या कडेवर लक्ष्मण होता. मी विचारलं, "काय ग?"

"खोली आतांच झाडून जातें! संध्याकाळीं मला बाहेर जायचं आहे."

"असं होय?" मी म्हटलं, व उठून आंतल्या खोलींत जाऊन स्टोव्ह पेटाविला.

आंत येऊन ती नेहमींप्रमाणें मोरीच्या कट्ट्याजवळ उभी राहून चहा प्यायली, व मग एकदम मुसमुसलेल्या रडक्या आवाजांत म्हणाली, "मालक, माझं एक काम आहे!"

"कसलं ग?"

बांगड्या वाजवीत व स्वतःच्या टपोऱ्या उरोजांकडे नजर टाकीत ती म्हणाली, "मला एक दहा रुपयांची नड आहे – रेशन आणायचंय!"

मी थट्टा करीत हंसून म्हटलं, "दहा रुपये? बापरे! इतके पैसे मजजवळ तरी कुठून असणार ग?"

त्यावर ती माझ्याजवळ येत अजीजीनं बोलावं तसं म्हणाली, "माझी नड आतांपुरती भागवाच! तुमचे पैसे कसेबी फेडून द्या!"

"पैसे कसेबी फेडून द्या!" मी हंसून तिच्या डोळ्यांत बघत म्हटलं.

"कसेबी फेडून घ्या – मी नाहीं म्हणत नाहीं."

"असं होय! मग देतो हं" मी कांपऱ्या आवाजांत म्हटलं, व मी काय करीत आहे हें कळण्याच्या आंतच लक्ष्मणला बाहेर ठेवून आंतल्या खोलीला कडी घातली.

ती घाबरली नाहीं – पण घाबरल्याचं नाटक करीत म्हणाली, "चला आटपा बिगी बिगी! लक्शा रडंल."

आंत आम्ही दोन-चार मिनिटंच होतों. पण तेवढ्यांत बाहेरच्या लक्शानं मोठ्यांदा रडायला सुरुवात केली. मोठमोठ्यांदा ओरडून आंतल्या दारावर तो धडका द्यायला लागला.

आम्ही थोड्याच वेळांत झपाट्यानं बाहेर आलों. मी घाबरलों होतों, नि ती घामेजली होती. तिनं बाहेर येऊन लक्शाला चटकन् पदराखालीं घेतलं व मी सिगरेट पेटविली. शेजाऱ्यापाजाऱ्यांना हें कळलं असावं का? बहुतेक असावं, कारण त्याच वेळीं शेजारच्या मास्तरीणबाई गॅलरींतल्या तारेवर कपडे वाळत घालण्यासाठीं आल्या. त्या मुद्दाम बाहेर आल्या असं मला वाटलं—खरं खोटं कोणास ठाऊक!

त्यानंतर एक-दोन महिन्यांत तिला अशीच पैशाची जरूरी भासली व मी ती भागवली.

एकदां दुपारीं आंतल्या खोलींत मी तिला म्हटलं, "हौशे, तूं मला फार आवडतेस."

कांहींच न बोलतां ती नुसतीच हंसली.

मी विचारलं, "मी आवडतो कां तुला?"

"आवडता कीं."

"आणि दादू?"

दादूचं नांव ऐकतांच तिनं पुन्हां तोंडाला पदर लावला, व ती फिदी-फिदी हंसली.

मी पुन्हां विचारलं, "दादू आवडतों का?"

"तुमच्या परीस नाहीं!"

"मग चल आपण पळून जाऊं! माझ्यापाशींच तूं रहा."

हें खोटं आहे, थट्टा आहे, हें कळूनसुद्धां ती म्हणाली, "चला! आणि लक्ष्मण?"

"त्यालाहि घेऊन जाऊं. नाहीं तर असं करूं!"

"कसं?"

"त्याला इथंच दादूजवळ ठेवून जाऊं." आणि पुढें हंसत म्हटलं, "तुला माझ्यापासून मुलगा होईलच कीं!"

त्यावर तिनं लाजल्यासारखं केलं.

"कां, लाजायला काय झालं? तो मुलगा किती चांगला असेल. गोरा...निळ्या डोळ्यांचा!"

ती हंसली, व म्हणाली, "चला! कांहीं तरीच तुमचं बोलणं."

मी कांहीं तरी बोलणार, इतक्यांत बाहेर कुणीतरी आलं, व मी दार उघडलं.

मी त्या वातावरणात, असाच किती तरी दिवस रंगून पडलों होतों; पण कांहीं अकल्पित कारणांमुळें मला एकदम पुणं सोडाव लागलं. त्या वर्षीं मी नापास झालों; व मी कऱ्हाडलाच घरीं राहून अभ्यास केला. पास झाल्यानंतर वडिलांची वकीली माझ्यासाठीं तयार होतीच, त्या गादीवर मी अलगद बसलों. वकीली करतां करतां हौशीला, दादूला, पुण्यांतल्या चाळींतील त्या दोन खोल्यांना मी केव्हांच विसरून गेलों.

पुढें माझं लग्न झालं आणि मॅट्रिकपर्यंत शिकलेली, गोरीपान व रसिक बायको मला मिळाली. तिच्या सहवासांत माझे दिवस मग मजेंत जायला लागले.

असेच दिवस चालले असतांना, एके दिवशीं संध्याकाळीं कोर्टांतून येऊन मी आरामखुर्चीवर बसलों होतों, व तिनं आणून दिलेला चहा पीत होतों. त्या वेळीं मी सहज तिच्याकडे बघितलं व कांहीं शंका मनांत येऊन विचारलं,

"तुला कांहीं होतं आहे का?"

मंद हास्य करीत ती म्हणाली, "नाहीं बाई. चांगली तर आहे मी!"

"मला फसवूं नकोस! कांहीं तुला होतं आहे, हें नक्की!"

"खरंच कांहीं होत नाहीं."

"कांहीं तरी होत आहेच. कुठें दुखतंय का?"

यावर ती खुदकन् हंसली, व म्हणाली, "वकील म्हणून मिरवायचं, नि इतक्या साध्या गोष्टीदेखील लक्षांत येत नाहींत?"

मी निरखून पहात म्हटलं, "काय लक्षांत येत नाहीं?"

"शोधा, म्हणजे सांपडेल." ती हंसून म्हणाली.

मी तिच्याकडे पुन्हां एकदां नीट पाहिलं, व टाळी वाजवीत म्हटलं, "सांपडलं!"

" काय ? "

" तुला काय होत आहे तें ! "

" मग सांगा ना. "

" मी नाहीं सांगणार. तूंच सांगितलं पाहिजेस ! "

बरेच आढेवेढे घेत ती म्हणाली, " आपल्याला....आपल्याला "

" सांग – पूर्ण सांग ! "

" आपल्याला बाळ होणार आहे." आणि खोलींत ग्लाक्सोचं बाळ टांगल होतं त्याकडे दृष्टि टाकीत ती म्हणाली, " याच्यासारखं बाळ होणार आहे. गोऱ्या रंगाचं....निळ्या डोळ्यांचं."

तिचे शब्द मी ऐकले नि माझा एकदम ' मूड ' गेला. कुठल्या तरी जुन्या आठवणी भुतासारख्या माझ्या मनांत घुमायला लागल्या. माझ्या चेहऱ्याकडे पहात ती म्हणाली, "...पण तुम्ही इतके गंभीर कां झालांत ?"

मी काय सांगणार ? सांगण्याला मला तोंड तरी होतं का ?

मी मग थोडा गप्प बसलों व हंसत म्हणालों, " अग आपल्याला मुलगा होणार आहे ना ? म्हणजे माझी जबाबदारी वाढणार; मग मला गंभीर न होऊन कसं चालेल ? "

त्या वेळीं तो प्रसंग तितकाच संपला होता.

त्या वेळीं संपलेला तो प्रसंग आज इतक्या वर्षांनीं त्या जुन्या चाळी-समोरच्या हॉटेलांत बसून मी अनुभवीत होतों. मी तसाच किती वेळ बसलों असतों कुणास ठाऊक, पण इतक्यांत समोरच्या चाळींतील मुलांचं एक टोळकं त्या हॉटेलांत शिरलं व मिसळपाव खायला लागलं. त्या टोळक्याच्या मधोमधच मघाशीं मी पाहिलेला दादूच्या घरांतील तो मुलगा बसला होता. इतक्या लहान वयांतसुद्धां तो जोरांत सिगारेट ओढीत होता आणि अचकट विचकट बोलत होता. मला त्याच्याविषयीं घृणाहि वाटत होती, नि कांहीं चमत्कारिक आपलेपणाहि वाटत होता. कांहीं निराळंच आकर्षण वाटल्यामुळें मी त्याच्याकडे पहात होतों. खालच्या जातीच्या मानानं खरोखरच त्याचा रंग गोरा होता व डोळे किंचित् निळे होते.

त्याच्याकडे पहातां पाहतां मी उठणार, इतक्यांत त्या पोरांना बाहेरून कुणाची तरी हांक ऐकूं आली. त्यावर दुसरा मुलगा माझ्यासमोरच्या मुलाला म्हणाला,

"ए लेका, तुझा भाऊ लकशा सारखा बोंबलतोय ना तुझ्या नांवानं."

माझ्या समोरच्या पोरानं जोरांत सिगरेट ओढली व म्हटलं, "बोंबलूं दे साल्याला!"

पण इतक्यांत 'लकशा'च आंत आला व समोरच्या पोरांशीं मोठ्यांदा बोलायला लागला.

माझं मन मग शरमेनं भरून गेलं व मी उठलों, कौंटरवर पैसे टाकले व बाहेर पडलों. मनांत प्रश्न घोंगावत होता कीं, तो 'लकशा' होता, मग हा कोण? किंचित् गौर वर्णाचा, निळ्या डोळ्यांचा हा मुलगा कोण?

त्या प्रश्नाला मी टाळण्याचा प्रयत्न केला, पण एखाद्या ब्रह्मसमंधासारखा तो माझा पाठलाग करायला लागला. त्या प्रश्नाच्या पकडींतून सुटण्यासाठीं मग मी सपाट्यानं पावलं टाकीत त्या गल्लींतून पसार झालों. कोपऱ्यावरून वळतांना त्या चाळीकडे, मनांत फार इच्छा असूनसुद्धां मला बघवलं नाहीं!

◎ ◎ ◎

## : ४ : प्रकृति

एस. टी.ची मोटार गांवाच्या स्टँडवर थांबली, तेव्हां दुपारचे अकरा वाजून गेले होते, आणि श्रावण महिना असूनसुद्धां ऊन अंगाला चांगलाच चटका देत होतं.

मोटार पूर्णतया थांबल्यानंतर प्रथम बापू खालीं उतरले आणि त्यांनीं वरच्या टपावरचं सामान काढून घेतलं. नंतर मोटारीच्या आंत अंगांत स्वेटर घालून व डोक्याला मफलर गुंडाळून बसलेल्या नानूला त्यांनीं म्हटलं "उतर खालीं, गांव आलं."

फिक्कट चेहऱ्याचा, बारीक तापानं गांजलेला, पंधरा-सोळा वर्षांचा नानू मग जपून खालीं उतरला नि सामानाजवळ जाऊन उभा राहिला.

सामान बरंच होतं आणि स्टँडपासून घरहि चांगलं अर्धा पाऊण मैल लांब होतं. दुपारच्या रणरणत्या उन्हांत पायीं जाणं शक्यच नव्हतं, आणि ते तितकंसं इष्टही नव्हतं. स्टँडपलीकडेच टांग्याचा स्टँड होता, नि तिथे मरतुकड्या घोड्यांचे दोन-चार टांगे उभे होते. त्या बाजूला दृष्टि टाकीत बापू नानूला म्हणाले, "मी टांगा ठरवून आणतों. तोंपर्यंत तूं इथेच उभा रहा." चार-पांच तासांच्या मोटारच्या प्रवासामुळें नानू खरा म्हणजे दमला होता, आणि नुसतं उभं रहाणंहि त्याला त्रासदायक वाटत होतं, तरीहि तो त्यांना म्हणाला, "जा" आणि तसाच उभा राहिला.

बापू चार-दोन पावलं पुढे गेलेच होते, ते कांहीं विचार करून पुन्हा मागें परतले, व त्याला म्हणाले, "आणि असं बघ ! तूं उन्हांत उभा राहूं नकोस ! मी टांगा ठरवून आणतों तोंपर्यंत तूं त्या लिंबाच्या झाडाखालींच उभा रहा कसा ! ऊन तुला बाधेल."

त्यावरहि नानू “ बरं ” म्हणाला, आणि हलक्या पावलांनीं चालत लिंबाच्या झाडाखालीं जाऊन उभा राहिला. बापू लांब गेले आणि नानूला थोडं बरं वाटलं ! त्याच्या अशक्त शरीराला लिंबाच्यां झाडाच्या सावलीनं किंचित् गारवा आला.

नानू तशाच अवस्थेंत उभा होता, इतक्यांत त्याच्या पाठीवर कोणाची तरी थाप पडली आणि पाठोपाठ जनानी हास्याचा किंचित् मोठा भासणारा आवाजहि त्याच्या कानावर आला. पाठीवर थाप पडतांच नानूनं मागें वळून बघितलं नि त्याला बरं वाटलं. त्याची आतेबहीण कुसूम तिथें उभी होती, आणि त्याच्याकडे बघून हंसत होती.

हंसत खिदळत ती त्याला म्हणाली, “ काय पेशन्टमहाशय ! कसं काय आहे ? ” त्या हास्याचा संपर्क बाधून आजारी नानूचीहि कळी किंचित् खुलली आणि तो म्हणाला, “ तुला कसं काय दिसतं आहे ? ”

“ मला तर चांगलेच दिसत आहांत ! नाक, डोळे, कान, तोंड सारं तर जाग्यावर आहे. ”

स्वतःच्या बोलण्यावर ती स्वतःच हंसत आहे इतक्यांत बापू टांगा ठरवून आले व तिला म्हणाले, “ हें काय ? तूं केव्हां आलीस ? ”

“ आत्तांच आलें ! सकाळपासून आईनं स्टँडवर जाण्याचा लकडा लावला होता, पण शाळेची पी. टी. होती म्हणून तिकडे गेलें आणि ती उरकून परस्पर इकडे आलें.

तिच्या बोलण्यावर मग बापू नुसतेच हंसले आणि म्हणाले, “ हो, मी विसरलोंच होतों ! तूं आतां मास्तरीणबाई झाली आहेस नाहीं का ? ” आणि नंतर त्यांनीं टांग्यांत सामान चढवायला सुरुवात केली.

टांग्यांत सामान चढविल्यानंतर बापू पुढें टांगेवाल्याजवळ बसले आणि कुसूम व नानू मागच्या बाजूस बसले व टांगा चालू झाला.

पुढच्या बाजूस बसलेले बापू मग आपल्याच विचारांत गढून गेले, आणि नानू शेजारींच बसलेल्या कुसूमकडे बघण्यांत आणि हंसण्या-खिदळण्यांत मग्न होता. आज जवळ जवळ दोन-तीन वर्षांनीं ती त्याला भेटली होती आणि अशक्त अवस्थेतदेखील तिच्या सहवासाची त्याला

गंमत वाटत होती. खरं सांगायचं म्हणजे ती वयानं एक दोन वर्षांनींच वडील होती. गेल्या वर्षात ती मॅट्रिक झाली होती आणि लग्न होईपर्यंत वेळ जाण्यासाठीं तिनं मुलींच्या शाळेंत व्यायामशिक्षिकेची नोकरी पत्करली होती. वयानं नानूएवढीच असूनसुद्धां ती आतां चांगली उंच झाली होती. आणि तिचे सारे अवयव भरले होते. तिच्या आरोग्यपूर्ण आणि कान्तीमान शरीराकृतीकडे नुस्तं बघणंदेखील नानूला बरं वाटंत होतं.

टांगा चालतां चालतां मधेच तिच्या हिरव्या रंगाच्या पांचवारी पातळाकडे नि त्याच रंगाच्या ब्लाऊझकडे त्याचं लक्ष गेलं व पातळ हातांत घेत तो म्हणाला, " हा रंग कुठून काढलास ग ? "

" कां ? " ती हंसत अंग घुसळत म्हणाली, " तुला आवडत नाहीं का ? "

" माझ्या आवडण्याचा काय प्रश्न आहे ? पण मघाशीं मोटारस्टँडवरून पांचसात मुलींचा घोळका गेला, त्यांनींहि असेच परकर घातले होते म्हणून विचारलं ! "

" अस्सं होय ! " त्याच्या दंडाला स्वतःचा दंड घाशीत ती म्हणाली, " तुझं निरीक्षण मात्र तीव्र आहे बरं का ! " आणि नंतर ती पुन्हा थोडी हंसली व तिनं सांगितलं, " तो आमच्या शाळेचा युनिफॉर्म आहे. पी. टी. च्या वेळीं आम्ही तसेच कपडे घालतों."

" वा ! मग एकदम सगळ्या मुली ग्राउंडवर उभ्या राहिल्या कीं किती छान दिसत असतील नाहीं ? "

" असतील ना ! मला तरी हा रंग फार आवडतो. लांबून बघितलं कीं साऱ्या मुली हलत्या बोलत्या वनलताच वाटतात ! "

टांगा पुढें चालला होता आणि खडकाळ रस्त्यावर मनस्वी धक्के बसत होते. पुढच्या बाजूस बसलेले बापू चूपच होते. आणि मागें कुसूमची सारखी बडबड सुरू होती.

त्या बडबडींतच मग घर आलं. कुसूम झटकन खालीं उतरली आणि तिनं हात धरून नानूला खालीं उतरवून घेतलें. बापू उतरलेलेच होते व सामान काढीत होते. त्यांच्याशीं कांहीं बोलून नानूचा हात धरून कुसूम आंत गेली.

आंत सोप्यावर कुसूमची आई त्यांची वाटच पहात होती. त्यांना आलेली बघतांच ती आनंदानं ओरडली, "आले का ग! मला वाटलं आतां आणखी किती उशीर होतो आहे!"

नानूला बकोट्याला धरून कुसूम सोप्याच्या पायऱ्या चढली व म्हणाली, "उशीर कशाचा! वेळेवर तर आली मोटार! पण पेशंटमहाराजासाठीं टांगा ठरवावा लागला, नि उशीर झाला.

तिच्या बोलण्यावर मग सगळींच हंसली व आंत गेलीं.

दुपारचीं जेवणं झाल्यानंतर माजघरांत मीटिंग भरली, तेव्हां कुसूमची आई बापूंना म्हणाली, "तूं उद्यां जाणार ना!"

"होय मला गेलंच पाहिजे. नानूला घेऊन मला यावंच लागलं, म्हणून मी आलों; नाहीं तर माझीं कामं खोळंबून पडलीं आहेत." ते म्हणाले, आणि नंतर बोलतां बोलतां त्यांनीं नानूच्या आजाराची माहिती सांगितली. गेले चार-सहा महिने तो आजारीच होता आणि त्यामुळें त्याचें मॅट्रिकचं वर्षहि बुडलं होतं. बारिक ताप आणि अशक्तपणानं त्याला बरेंच दिवस घेरलं होतं. आतां तो तसा बरा होता, पण डॉक्टरांनीं त्याला पूर्ण विश्रांति घ्यायला सांगितलं होतं.

ती सारी हकीगत ऐकून कुसूमची आई म्हणाली, "तूं आतां त्याची काळजी करूं नकोस. इथें तो मजेंत राहील. कुसूमहि इथें आहे. त्यामुळें त्याचं मन रमण्यास त्रास पडणार नाहीं."

यावर बापू हंसले नि म्हणाले, "गेल्या सीझनला कुसूमचं लग्न झालं नाहीं, हें बरंच झालं म्हणतों मी! तिच्यामुळें नानूचा वेळ खरोखरच चांगला जाईल." नंतर आणखी कांहीं बोलणीं झालीं, आणि बापू बाहेर निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं परत निघण्यापूर्वीं त्यांनीं औषधाच्या चार-पांच बाटल्या व इंजेक्शनच्या ट्यूब्स कुसूमच्या हवालीं केल्या, आणि तीं औषधं केव्हां केव्हां नि कशीं कशीं घ्यायचीं हें विस्तारानं सांगितलं. कुसूमच्या खोलींतच नानूचं अंथरुण रहाणार होतं, त्यामुळें तिनं तें सारं औषधपुराण गंभीरपणानं ऐकून घेतलं, आणि त्या बाटल्या नि

पुढ्या स्वतःच्या खोलींत ठेवून दिल्या. नंतर प्रकृतीची चांगली काळजी घेण्याबद्दल, आणि दर आठवड्याला पत्र लिहिण्याबद्दल नानूला वारंवार बजावून बापू निघून गेले. आणि त्या घरांतलं नेहमीचं वातावरण सुरू झालं.

कुसूमच्या आईचा वाडा मोठा होता. बाहेर मोठमोठें सोपे नि अंगण होतं, आणि परसांत फुलांचीं झाडं होतीं. खालच्या बाजूला एक दोन बिऱ्हाडं होतीं, आणि दुसऱ्या मजल्यावरच्या तीनचार ऐसपैस आकाराच्या खोल्या कुसूमच्या आईकडे होत्या. एका खोलींत स्वयंपाकघर होतं, नि दुसरींत देवघर असून तिथेंच कुसूमची आई रात्रीं वास्तव्य करी. गच्चीच्या अलीकडची मोठी हवेशीर खोली कुसूमकडे होती, आणि त्याच खोलींत समवयस्क म्हणून नानूचं अंथरुण घातलं होतं. खोलीच्या बाहेरच गच्ची असल्यामुळें तिथून गांवाला वळसा घालून वाहणाऱ्या नदीचा देखावा मोठा सुंदर दिसत असे. गच्चीच्या आंत खिडकीजवळ कुसूमची कॉट होती, आणि तिथेंच उशाशीं टेबलखुर्ची होती. कुसूमला गोष्टी वाचायचा नि कविता करायचा नाद होता. त्यामुळें टेबलावर नेहमीं रंगीबेरंगी वेष्टनं असलेलीं मासिकं व पुस्तकं पडलेलीं असत. टेबलाच्या पलीकडेच दुसऱ्या भिंतीला लागून नानूची कॉट घातली होती; आणि त्याचं औषधाचं सारं साहित्य कॉटजवळच्या बारक्या स्टुलावर ठेवलं होतं. खोलींतील एकंदर वातावरण मोठं प्रसन्न होतं, आणि नानूला तिथें थोड्याच दिवसांत बरं वाटेल, अशी सर्वांचीं खात्री होती. पहिले सात आठ दिवस मग तसेंच रेंगाळत गेले. बहुतेक सारा दिवस नानू अंथरुणावर निजूनच असे. सकाळीं उन्हं पडलीं कीं अंगांत स्वेटर चढवून तो गच्चीवर जाई, व तिथून गांवाचा देखावा पहात तासतास बसे ! एखादेवेळीं सकाळीं थोडं लवकर जागं झाल्यावर, तो खालीं परसात जाई, आणि कुसूमला पारिजातकाचीं फुलं वेंचण्यास, किंवा पिवळ्या चाफ्याचीं फुलं आकडीनं काढण्यास मदत करी. दुपारीं कुसूम शाळेंत जाई, आणि मग त्याचा वेळ किंचित् कंटाळवाणा जाई. कंटाळा घालविण्यासाठीं मग तो स्वयंपाकघरांत पाट मांडून कुसूमच्या आईशीं गप्पा मारीत बसे. किंवा तिला एखादा वर्तमानपत्रांतला लेख किंवा मासिकांतील गोष्ट वाचून दाखवीत असे. या साऱ्याचाच कंटाळा आला कीं तो खोलींत जाऊन टेबलावरचं एखादं पुस्तक चाळीत, नाहींतर

कविता गुणगुणत पडून राहत असे. कित्येक वेळां त्याची सारी दुपार झोपण्यांतहि जाई. अशक्तपणामुळें ग्लानी येऊन त्याला सारखं झोपून रहावंसं वाटणं अगदीं सहाजिक होतं.

असेच आणखी कांहीं दिवस गेले, आणि नानू जास्त ताजातवाना झाला; व त्याला खूपच बरं वाटायला लागलं. तापाची भावना कमी झाली, आणि जिभेची धार वाढत चालली. स्वयंपाक घरांतील गप्पांवर मग त्याचं समाधान होईनासं झालं. बाहेर जावं, कुठेंतरी, कुणाबरोबर तरी मिसळावं, मनसोक्त हसावं आणि गप्पा माराव्या, अशा भावना मग त्याला व्हायला लागल्या, व तो त्या दृष्टीनें विचार करायला लागला. वेळ घालविण्यासाठीं कांहीं तरी चाळा शोधण्यासाठीं त्याचं मन मग इकडे तिकडे भटकायला लागलं.

अशाच अवस्थेंत असतांना एके दिवशीं सकाळीं तो जरा लवकर जागा झाला; रात्रभर उत्तम झोप झाल्यामुळें त्याच्या मनाला हुशारी वाटत होती, आणि शरीर ताजतवानं झालं होतं.

जागा झाल्यावर तो उठला, आणि अंथरुणावर बसला. खोलींत अजून काळोख होता, पण बाहेर किंचित् फटफटलं होतं. त्यानं सहज म्हणून कुसूमच्या कॉटकडे पाहिलें, तर ती तिथं नव्हती. काहींसं आश्चर्य वाटून त्यानं इकडे तिकडे पाहिलं, आणि एकदम त्याच्या लक्षांत आलं कीं, कुसूम बाहेर गच्चीवर आहे! आणि ती कांहीं तरी शारीरीक क्रिया करीत आहे, व त्यामुळें साऱ्या गच्चीवर आवाज येत आहेत!

आश्चर्य वाटून तो उठला, आणि गच्चीच्या दारापाशीं गेला. गच्चीचं दार बाहेरून ओढून घेतलेलं त्याला दिसलं. त्याला प्रथम वाटलं कीं, दार एकदम जोरानं उघडावं, आणि कुसूमला हांका मारून बिचकवावं. पण मागून त्यानं तो विचार बदलला, आणि हलक्या पावलानं दारापाशीं जाऊन, फटींतून तो बाहेर बघायला लागला. बाहेरचं दृश्य खरोखरच अपूर्व होतं. त्याच्याकडे बघून तो स्तिमित झाला, आणि स्थळकाळाचं भान विसरून तो नुसताच बघत उभा राहिला.

बाहेर कुसूमच होती! पण तिनं अर्धी चड्डी आणि पुरुष घालतात तसला गंजीफ्रॉक घातला होता आणि ती एक मोठी दोरी दोन्हीं हातांत

धरून तीवर उड्या मारीत होती. दोरीबरोबरच तिचं गोरंपान बांधेसूद शरीर वर जात होतं, आणि पुन्हा खालीं येत होतं. तिच्या पावलांचा आवाजहि सीमेंटच्या गच्चीवर मजेदार पद्धतीनं होत होता, आणि तिथून तो जिकडे तिकडे घुमत होता. सकाळच्या मंद प्रकाशांत तिचे भुरभुरणारे केस, श्रमानं किंचित् लाल झालेला चेहरा, आणि गोरंपान शरीर मोठं सुंदर दिसत होतं.

तिच्या उड्या होईपर्यंत नानू मग तसाच चोरून तिच्याकडे पहात बसला. दहा पंधरा मिनिटं दोरीवरच्या उड्या चालल्या, आणि मग ती दमली आणि थांबून कपाळावरचा घाम पुसायला लागली.

ती थांबताच नानूनं आंतूनच टाळ्या वाजविल्या, आणि दार उघडलं.

त्याला पहातांच खरं म्हणजे तिनं लाजायला पाहिजे होतं—शरमिंद व्हावयास पाहिजे होतं. पण, तसा कोणताच विकार तिच्या चेहऱ्यावर दिसला नाहीं. ती शांतच होती, पण कां कुणास ठाऊक, नानू मात्र एकदम कमालीचा अस्वस्थ झाला होता! खरं सांगायचं म्हणजे व्यायाम तिनं केला होता. पण याचीच छाती धडधडत होती, आणि शरीर घामाघुम होण्याच्या बेतांत होतं.

त्याच्याकडे बघून सहज बोलावं तसं ती म्हणाली, "इतक्या लवकर उठलास?"

"होय ना! सहज जागा झालों, आणि बाहेर आलों! मला हें माहीत नव्हतं. नाहीं तर पहिल्यापासूनच पहाटे उठून बसलों असतों."

"असं का? बराच आहेस कीं!" ती ठसक्यानं म्हणाली, व पुन्हां उड्या मारायच्या तयारींत उभी राहिली.

त्यानें उत्कंठेनं विचारलं, "हें तूं काय करीत आहेस?"

"अरे हा व्यायाम आहे!"

"असला कसला व्यायाम? दोरीवरून उड्या मारण्याचा!"

"अरे हा तर सगळ्यांत उत्तम व्यायाम आहे. मी तर मास्तरणीबरोबर पैज मारली आहे! न दमतां—न थांबतां निदान पांचशें तरी उड्या मारण्याची."

तो यावर कांहीं बोलणार, इतक्यांत तिच्या एकदम लक्षांत आलं, व ती म्हणाली, " हें काय ! तूं असा गंजीफ्रॉकवरच का बाहेर आला आहेस ? बाधेल ना ! " असं म्हणून मग ती झपाट्यानं आंत गेली, आणि खोलींतला स्वेटर आणून त्याच्याजवळ देत म्हणाली, " आधीं स्वेटर घाल नि मग बोल ! विनाकारण बाधलं म्हणजे माझ्यावर येईल. "

त्याचा स्वेटर घालून झाल्यावर तिनं पुन्हां दोरी हातांत घेतली, आणि पवित्र्यांत उभी राहून म्हणाली, " आतां तूं मोज हं ! " आणि एक दोन तीन म्हणून तिनं एकदम उड्या मारायला सुरुवात केली.

पण नानू मोजण्याचं विसरूनच गेला ! उड्या मारतांना होणाऱ्या तिच्या हालचालींकडे नुसता बघतच राहिला.

उड्या मारून झाल्यानंतर तिनं विचारलं, " किती झाल्या ? "

तो स्वतःच्याच तंद्रींत होता, तिचा प्रश्न त्याच्या लक्षांतच आला नाहीं.

तिनं पुन्हा हंसत हंसत त्याला विचारलं, " किती झाल्या ? " कांहीं तरी उत्तर द्यायचं म्हणून तो म्हणाला, " खूप झाल्या ! "

यावर ती एकदम हंसली, व त्याच्या पाठीवर सपाटा घालीत म्हणाली, " तुझं लक्ष कुठें आहे ? "

यावर तो कांहीं तरी बोलणार इतक्यांत कुसूमची आईच वर गच्चींत आली, आणि रागावल्यासारखं करून म्हणाली, " हें काय चाललं आहे ?" कुसूमला एक उड्या मारायचं वेड लागलं आहे, पण त्यांत नको सामील होऊस ! "

यावर तो किंचित् वरमून खालीं बघायला लागला, तेव्हां तिची आई दरडावणीच्या स्वरांत तिला म्हणाली, " आणि तुला नको होतं का कळायला ? आजारी मुलगा तो ! सहा महिने ताप येत होता त्याला ! आणि तूं आपली सरळ सकाळच्या गारठ्यांत त्याला घेऊन बसलीस ? "

" मी कुठें त्याला आणला ? तोच आला ! " ती नरमाईच्या आवाजांत म्हणाली, " वा ऽ हें काय तुझं बोलणं झालं ! " आई रोषपूर्ण आवाजांत म्हणाल्या, व नानूकडे पाहून त्यांनीं सांगितलं, " उद्यांपासून इतक्या

आ. क्र. 94563 नों दि. 5-02-1989
दि. ...



सकाळीं उठायचं नाहीं रे! प्रकृती सुधारायची आहे ना? पुन्हां ताप यायला लागला तर बापू मला बोलेल!"

तो विषय त्या दिवशीं तितकाच थांबला! कुसूम आंघोळ वगैरे उरकून नेहमींप्रमाणें शाळेंत गेली. शाळेंतून यायला तिला आज उशीर होणार होता. पंधरावीस दिवसांनीं शाळेचं गॅदरिंग होतं, त्यांतील मुलींच्या सांघिक नृत्याची जबाबदारी कुसूमवर होती. तालीम घेण्यासाठीं तिला शाळेंत थांबणं जरूर होतं.

तो सारा दिवस नानूनं खोलींत स्वस्थ पडून घालविला. नेहमींप्रमाणें तो स्वयपाक घरांतहि गेला नाहीं, आणि कुसूमच्या आईला त्यानं कांहीं वाचूनहि दाखविलं नाहीं. आठ-पंधरा दिवसांनीं प्रथमच त्याला आज एकटं एकटं वाटत होतं. त्याचं शरीर आणि मन दोन्हीहि अस्वस्थ होतीं. सारा दिवस तो तडफडतच होता.

संध्याकाळीं शाळेंतून कुसूम उशीरा परत आली, आणि गॅदरिंगच्या नाटकाच्या व सामूहिक नृत्याच्या गंमती सांगूं लागली. पण त्यानं तिला एकहि प्रश्न विचारला नाहीं. तिच्या विनोदी बोलण्याला त्यानं नेहमींप्रमाणें सादहि दिली नाहीं. ती सारी हकीगत ऐकतांना तो नुसताच तिच्याकडे बघत बसला. रात्रीचीं जेवणं झाल्यावर तीं दोघंहि झोपायला गेलीं. कुसूम दिवसभर दमली होती. आणि विश्रांतीची तिला जरूर होती. ती झटकन झोंपी गेली; पण नानू बराच वेळ जागाच राहिला. बराच वेळ तळमळल्या-नंतर त्याला केव्हां झोंप लागली, हें त्याचं त्यालाच कळलं नाहीं.

पण झोपहि फार वेळ लागूं शकली नाहीं. पहांटे पहांटे तो एकदम जागा झाला, आणि कांहीं आठवण होऊन त्यानं टक्क डोळे उघडले. खोलींत सारा अंधार होता, आणि बाहेरहि अजून फटफटलं नव्हतं. दिवा लावावा असं त्याला वाटलं, पण मग कांहीं विचार करून तो बेतहि त्यानं रद्द केला; आणि तो नुसताच पहांटेच्या धूसर अंधुक प्रकाशांत कुसूमच्या कॉटकडे बघत राहिला.

ती अगदीं शांतपणानें झोंपली होती. झोपेंत तिच्या अंगावरचं पांघरुण आणि लुगडं बाजूला झालं होतं आणि शरीराचा बराचसा भाग अनावृत्त अवस्थेंत

दिसत होता. पहांटेच्या त्या अंधारानं तिचं गौरकाय बांधेसूद शरीर जणुं गुंडाळून टाकलं होतं, आणि तें फारच चांगल दिसत होतं.

बराच वेळ त्यानं अनिमिष नजरेनं तिच्याकडे बघितलं, आणि मग स्वतःच्या जागृतावस्थेची ओळखसुद्धां येऊं न देण्यासाठीं त्यानं तोंडावरून पांघरून घेतलं. व तो एका कुशीवर होऊन स्वस्थ पडून राहिला. डोक्या-वरच्या पांघरुणाच्या फटींतून कुसुमचं दर्शन होईल अशी त्यानं अर्थातच व्यवस्था केली होती.

अशीच दहा-पंधरा मिनीटं अगदीं निस्तब्ध अवस्थेंत गेलीं, आणि नंतर कांहीं वेळानं कुसूमच्या पलंगावर त्याला हालचाल दिसली. थोडा वेळ मग तसाच गेला, आणि मग कुसूम उठली, आणि अंथरुणावर बसल्या बसल्या दोन्हीं हात वर करून तिनं मनसोक्त जांभई दिली. नंतर ती उठून उभी राहिली आणि अंगांतल्या अगदीं तलम आणि पांढऱ्याशुभ्र अशा बॉडीवर तिनं खुर्चीच्या पाठीवर ठेवलेला निळसर पट्ट्यांचा ब्लाऊझ घातला, आणि हलक्या हातानं दार उघडून ती बाहेर गच्चीवर गेली. गच्चीवरून तिनं चुळा खळखळून भरल्याचा आवाज मग ऐकूं आला. आणि ती पुन्हा आंत आली. थोडा वेळ थांबून तिनं कपाटांतली तिची चड्डी व गंजीफ्रॉक घातला, व हातांत दोरी घेऊन ती पुन्हां बाहेर गेली. बाहेर जातांना तिनं मधलं दार हलक्या हातानं लावून घेतल्याचा आवाजहि मग आला.

ती बाहेर गेल्यावर लगेच नानू उठला, आणि हलक्या पावलानं दारा-जवळ जाऊन फटींतून बाहेर पहायला लागला. प्रथम ती नुसती ताठ उभीं राहिली, आणि नंतर तिनं दोन्ही हात वर खालीं करण्याचा व्यायाम सुरूं केला. तो व्यायाम संपतांच, तिनं दोरीवरच्या उड्या मारण्यास सुरुवात केली. दोरी सारखी वर्तुळाकृती फिरत होती; आणि तिच्याबरोबर कुसूमचा सारा देह लवलवत होता. तिचा चेहरा लाल झाला होता, आणि केसांच्या बटा कपाळावर रुळत होत्या. दाराच्या फटींतून तिच्याकडे पहातांना नानू स्वतःचं अस्तित्वच विसरला होता. आपण काय करीत आहोंत हेंच त्याला समजत नव्हतं.

तिच्या उड्या मारून झाल्या, आणि तिनं बारक्याशा टॉवेलला अंग पुसलं व ती गच्चीवर पाठमोरी उभी राहून नदीचा देखावा पहायला लागली.

दाराआडच्या नानूला मग अगदीं बघवेना! त्याची छाती धडधडायला लागली, आणि साऱ्या शरीरांत मनस्वी थकवा वाटायला लागला. मग तो आंत आला, आणि डोक्यावरून पांघरुण घेऊन स्वस्थ झोपला.

थोड्याच वेळांत गच्चीवरून कुसूम आंत आली, आणि हापपँट काढून ठेवून तिनं लुगडं नि ब्लाऊझ घातला. नंतर मग तिनं गच्चीच्या कठड्यावर ठेवलेल्या कुंड्यांतून मोगरीचीं नि गुलाबाचीं फुलं आंत आणलीं, आणि त्यांचा मनसोक्त वास घेत नानूच्या कॉटजवळ येऊन ती त्याला हांका मारायला लागली.

तिच्या हांका ऐकूं न आल्यासारखं दाखवून तो तसाच पडला!

कांहीं वेळ जाऊन देऊन तिनं त्याचं पांघरुण अंगावरून उडवलं, आणि त्याच्या तोंडाशीं तोंड नेऊन हलक्या बारिक आवाजांत गंमतीदार आवाज केला.

त्याच्या कानाला तिचे मऊ लुसलुसीत ओठ लागत होते, आणि व्यायामानंतरच्या घामाच्या वासांत मोगरीच्या फुलांचा गंध मिसळून गेला होता. घामाला इतका सुंदर वास असतो हें प्रथम त्या दिवशीं त्याला कळलं, व तो तसाच पडून राहिला.

पण तिनं त्याला पडूं दिलं नाहीं. हालवून हालवून त्याला जागं करून तिनं उठून बसविलं. जागं झाल्याचं नाटक करीत मग तो म्हणाला, "किती त्रास देतेस ग! झोपूं दे कीं जरा!"

"जरा झोपूं दे म्हणे! किती वेळ झोपायचं तरी!"

मग त्यानं आळोखेपिळोखे दिलं आणि आश्चर्यानं विचारावं तसं तिला विचारलं, "तूं केव्हां उठलीस?"

"केव्हांच उठलें आहे मी! व्यायामसुद्धां झाला माझा." ती म्हणाली, व नानूला घेऊन दूध प्यायला स्वयंपाकघरांत गेली.

नानूनं मग चहा घेतला, नि ठरलेल्या औषधांचा डोस घेतला. पण त्याच्या अंगाची मरगळ कांहीं गेली नाहीं. एका विशिष्ट तऱ्हेचा थकवा त्याच्या सर्वांगांत भरून गेला, तो मलूल झाला.

सकाळीं कुसूमनं आंघोळ केली नि ती शाळेंत गेली; पण नानू मलूलच राहिला! आज तो कुणाशीं कांहींहि बोलला नाहीं. थकल्या भागलेल्या माणसासारखा तो अंथरुणावर पडून आढ्याकडे बघत राहिला.

संध्याकाळीं कुसूम शाळेंतून परत आली, तेव्हां दिवेलागणी झाली होती; आणि दिवा न लावतांच तो अंधारांत पडून राहिला होता. कपडे बदलल्यानंतर तिनं त्याला विचारलं, “ काय रे नुसताच पडून आहेस?”

कांहींच न बोलतां तो नुसताच तिच्याकडे पहात राहिला.

तेव्हां ती जवळ आली, आणि अंगाला हात लावून म्हणाली, “ ताप बीप नाहीं ना आला? ”

त्याला किंचित् बरं वाटत नव्हतंच! पण तिच्या लक्षांत येऊं नये म्हणून बाह्यतः हंसत हंसत खोट्या उत्साहानं तो म्हणाला, “ छे बुवा! मी तर चांगला आहे!” आणि उठून आळोखेपिळोखे देत व खोटा उत्साह दाखवीत त्यानं सांगितलं, “ उगीच कंटाळा आला होता! कांहींच करमत नव्हतं; म्हणून पडलों होतों झालं! ”

“ आतां उद्यांपासून मला सुट्टी आहे चारपांच दिवस! मी घरींच राहीन! तुला मग इतका कंटाळा वाटणार नाहीं.” ती म्हणाली, व त्याला घेऊन स्वयंपाकघरांत गेली.

रात्रीचीं जेवणं झाल्यावर तिनं नानूला औषध दिलं, व त्याचं पांघरुण साफ करून सांगितलं, “ तूं नीज आतां! चांगली झोप झाल्यावर बरं वाटेल.”

अंथरुणावर पडल्या पडल्या त्यानं विचारलं, “ आणि तूं? ”

“ मी झोंपतेंच आहे! शाळेच्या वह्या तपासायच्या आहेत. त्या तपासून मी झोंपणारच आहे.” ती म्हणाली व तिनं त्याच्या बाजूच्या दिव्याला कागद लावला व ती वाचीत बसली.

वीस-पंचवीस मिनिटं झालीं, तरी तिचं वाचन चाललंच होतं. तिला वाटलं होतं नानूला चांगली झोप लागली असेल! म्हणून तिनं वाचतां

वाचतां त्याच्याकडे पाहिलें, तर त्याचे डोळे टक्क उघडे होते, आणि तो पडल्या पडल्या तिच्याकडे बघत होता.

त्याच्या जागं असण्याचं तिला आश्चर्य वाटलं व कांहींतरी विचार करून ती मजेदार पद्धतीनं हंसली व म्हणाली, “ थांब हं ! तुला दिव्याचा त्रास होत असेल ! मी दिवाच मालवून टाकतें; म्हणजे तुला झोप येईल.”

आणि नंतर तिनं दिवा मालविला, व ती अंथरुणावर पडली. तिला लवकरच झोंप लागली, पण नानू जागाच होता. त्याचे डोळे जळजळत होते, आणि अंगें कसरल्यासारखं झालं होतं. पण तो जागाच होता. पलंगावर त्याच्या शरीराची सारखी चाळवाचाळव चालली होती. मधेंच त्याला तहान लागत होती. आणि तो उठत होता. मधेंच तो या कुशी-वरून त्या कुशीवर होत होता !

रात्र सारी अशीच उडून गेली, पण त्याला शांत झोंप लागलीच नाहीं. मधें मधें तो झोंपत होता, आणि दचकून जागा होत होता. आणि नंतर ती नेहमीची प्रतीक्षेची पहाट आली, आणि मग झोपेचं सोंग घेऊन तो निपचित पडला.

कुसूमचा व्यायाम नेहमीप्रमाणें झाल्यानंतर तिनं नानूला हलवून जागं केलं. डोळे चुरचुरत जळजळत होते तरीहि तो हंसत हंसत उठला, आणि तिच्याबरोबर स्वयंपाकघरांत गेला. त्याचं औषध नि चहा घेऊन झाल्यावर तिनं त्याला विचारलं, “ तुझा आतां काय प्रोग्रॅम आहे ? ”

हलक्या घोगऱ्या आवाजांत त्यानं विचारलं, “ का ? तूं काय करणार आहेस ? ”

“ आज सुट्टी आहे ! सकाळीं आमच्या दोघीतिघींचा आपल्या मळ्यांतील विहिरींत पोहायला जाण्याचा विचार आहे.”

“ मग मीहि तिकडेच येईन. ”

“ तुला चालवेल ? अर्धा मैल तरी लांब आहे. शिवाय उन्हहि होईल.”

तिच्याबरोबर पोहायला जाण्याच्या कल्पनेनंच तो हरखला होता. तो लगोलग म्हणाला, “ न चालायला काय झालं ? अर्धा मैल म्हणजे काहीं विशेष नाहीं.”

१५८०

“ मग चल बापडा ” ती म्हणाली, आणि तिनं पिशवींत पंचा नि पोहायच्या वेळेस नेसायचं जुनं पातळ घेतलं. कांहीं वेळानं तिच्या मैत्रिणी आल्याच आणि ते बाहेर पडले.

गांवापासून मळा अर्धा पाऊण मैल लांब होता, पण त्या तरुण मुलींच्या घोळक्यांत हास्यविनोद करीत जातांना नानूला कांहीं विशेष त्रास झाला नाहीं. मळ्यांत गेल्यावर विहिरीच्या कट्यांवर उभं राहून कुसूमनं व इतर मुलींनीं कपडे बदलले आणि पायऱ्या उतरून त्यांनीं पोहायला सुरुवात केली. नानू प्रथम कांठावरच्या आंब्याच्या झाडाच्या सावलींत कपडे सांभाळीत उभा होता. पण नंतर नुसतं उभं राहून त्याला कंटाळा आला, आणि तो खालीं येऊन पोहणं पहायला लागला. सर्वच मुली पोहत होत्या, पण कुसूमचं कौशल्य वाखाणण्यासारखं होतं. ती कांहीं वेळ उताणी पडून पोहत होती तर कांहीं वेळ पाण्यांत बुडून स्वतःच्या दमाचा अदमास घेत होती. पोहण्याचा कंटाळा आला कीं ती पायऱ्यांवर बसून तिथल्या दगडानं तळपाय घाशीत, नाहीं तर नुसतं इतर मुलींच्या अंगावर पाणी उडवीत होती. पोहण्याच्या वेळीं इतका हशा, खोखोशा, आणि आनंद चालला होता कीं त्या भरांत विहिरीच्या कट्टयावर उभा राहिलेल्या नानूचं अस्तित्व त्या केव्हांच विसरल्या होत्या.

असंच तास दीडतास पोहणं झालं आणि मग त्या बाहेर आल्या. कुसूमनं पातळ बदलल, व ओले केस पाठीवर नुसतेच मोकळे सोडले. ऊन लागूं नये म्हणून तिनं मग डोक्यावरून पदर घेतला आणि ओला टॉवेल तसाच खांद्यावर फडफडत सोडून दिला.

नंतर ती सारी मंडळी घरीं निघाली. ऊन रणरणायला लागलं होतं, आणि शेतांतील पायवाटेचा फुफाटा तापल्यामुळें त्रासदायक वाटायला लागला. त्या मुलींबरोबर नानू तसाच फरफरटत कांहींहि न बोलतां चालला होता. त्याचं अंग कोमट झालं होतं आणि त्याला चालवतहि नव्हतं. त्या मुली स्वतःच्या गप्पांत इतक्या गुंतल्या होत्या कीं त्याच्याकडे त्यांचं लक्षहि नव्हतं.

घरीं आल्यावर सारे गप्पगप्पच होते. कुसूम दमली होती आणि जेवणानंतर स्वयंपाकघरांतच आडवी झाली होती. नानू इकडे तिकडे

उगीचच करीत होता. त्याच्या अंगाची लाही आणि डोळ्यांची जळजळ वाढलीच होती. आपल्याला रात्रीं ताप येणार याबद्दल त्याला मनस्वी भीति वाटत होती.

दुपारची झोप झाल्यानंतर संध्याकाळीं कुसूम शाळेंत गेली. आज तिच्या नाटकाची रंगीत तालीम होती, त्यामुळें रात्रीं तिला यायला बराच उशीर होणार होता.

नानूनं संध्याकाळचं जेवण केलं व झोकांड्या खात तो खोलींत येऊन पडला. त्याच्या अंगांत ताप भरत होता. आणि त्याला मनस्वी थकवा वाटत होता.

त्या थकव्यांतच त्यानं डोळे मिटून झोपेची आराधना सुरू केली. झोप आली नाहीं, पण एक प्रकारच्या ग्लानींनंच मग त्याला घेरलं. काय चाललं आहे हेंच त्याला कळेना ! डोक्यांत कसले विचार चालले आहेत याचाच पत्ता त्याला लागेना ! जिकडे तिकडे प्रचंड आवाज होत आहेत आणि सारी पृथ्वी सारखी हालत आहे, असं त्याला वाटत होतं. त्या अवस्थेंत मग तो बराच वेळ पडून राहिला.

बऱ्याच वेळानं तो एकदम जणूं मोहनिद्रेंतून जागा झाला. त्याचीं कानशिलं व शरीर तापानं थरथरत होतं. तरीहि तो उठून बसला. आणि अंधाऱ्या खोलींत डोळे विस्फारून इकडे तिकडे बघायला लागला. तापाच्या या ग्लानींतच त्याला कुसूमची कॉट दिसली ! अंगाभोंवतीं पांघरून लपेटून ती स्वस्थ झोपली होती.

एकूण रात्रीं केव्हां तरी ती शाळेंतून परत आली होती तर !

तिच्याकडे बघत मग तो तसाच मिनिटं दोन मिनिटं स्वस्थ बसला, आणि मग त्याला काय वाटलं कुणास ठाऊक, पण झपाटलेल्या माणसासारखा जो एकदम उठला आणि झोकांड्या खात तिच्या कॉटजवळ गेला.

ती शांत झोंपली होती आणि तिचा श्वास मंदगतीनं चालला होता.

त्या श्वासाचं संगीत ऐकत मग तो क्षण दोन क्षण उभा राहिला आणि नंतर तिच्या कानाजवळ तोंड नेऊन किंचित् मोठ्या आवाजांत त्यानं हांक मारली,

" कुसूम...ए...कुसूम ! "

पण ती जागी झालीच नाहीं ! झोपलेलीच राहिली.

मग त्यानं पुन्हां तिला किंचित् कर्कश नि घोगऱ्या आवाजांत हांक मारली, आणि हातानं तिचं मस्तक जोरानं हलवलं.

शान्त झोपेंतून जाग्या झालेल्या कुसूमला प्रथम कळलंच नाहीं, आणि जेव्हां कळलं तेव्हां आश्चर्यानं तिनं विचारलं, " कोण ? नानू ? कां रे ? काय झालं ? "

तरीहि तो कांहींच बोलला नाहीं. थरथर कांपत तिच्या कॉटजवळ नुस्ताच उभा राहिला.

तेव्हां तिनं दिवा लावला व त्याला विचारलं, " काय झालं ? तुला कांहीं होतं आहे का ? "

धापा टाकलेल्या आवाजांत तो म्हणाला, " मला भीति वाटली—फार भीति वाटत आहे ! झोंपच येत नाहीं ! "

" वेडा कां तूं ? भीति कसली आलीय ! नीज मुकाट्यानं " ती हंसून म्हणाली. पण नंतर तिलाच कांहींतरी वाटून ती म्हणाली, " नाहीं तर असं कर ! तूं इथेच ये निजायला. आपण एका कॉटवरच झोपूं ! "

एखादी गोष्ट सहज बोलावी तशी ती बोलली. तिनं त्याला जवळ निजविलं आणि त्याच्या डोक्यावर थोपटण्यास सुरुवात केली. या तिच्या थोपटण्यामुळें नानूला एकदम कसंसंच वाटलं व तो आणखीनच तिच्या कुशींत शिरला ! आणि पांढऱ्या शुभ्र बांधेसूद शरीरांत सामावला गेला.

तो बिलगल्यानंतर मात्र त्याच्या अंगांतील उष्णतेबरोबरच तिला आणखीहि कांहीं गोष्टी एकदम जाणवल्या व तिची झोंप उडाली. तिनं मग दिवा लावला व किंचित् करड्या आवाजांत त्याला म्हटलं, " हें रे काय ? तुला खूपच ताप आला आहे. तुझे डोळेहि किती लाल दिसत आहेत ? "

पण नानू बोलण्याच्या मनःस्थितींत कुठें होता ! एक प्रकारच्या बेहोषींतच तो तिच्या पांघरुणांत पडला होता आणि तिला बिलगत होता.

त्याला तसं पाहून कुसूमला त्याची कींव आली व तिनं हांका मारून आईला उठविलं. त्या दोघी मग त्याच्या उशाशीं रात्रभर जागत बसल्या.

नानूचा ताप दोन-तीन दिवस टिकला, आणि पुढें उतरला. पण त्याला मनस्वी अशक्तपणा वाटायला लागला आणि त्याच्या चेहऱ्यावर अशक्तपणाची पांढुरकी छटा दिसायला लागली.

मग त्या मायलेकींनीं विचार केला, आणि त्यांनीं बापूंना बोलावणं पाठविलं. पंधरा-वीस दिवसांपूर्वीं नानूला प्रकृतीसाठीं ठेवून गेलेलें बापू मग पुन्हां परत आले आणि त्याला परत घेऊन गेले.

गांवची उत्तम कोरडी हवा, रम्य वनश्री आणि कुसूमची व तिच्या आईची प्रेमळ वागणूक यांनीं नानूची प्रकृति सुधारेल अशी त्यांची कल्पना होती. पण ती कल्पना साफ खोटी ठरलेली होती !

त्याची प्रकृति सुधारण्याऐवजीं उलट बिघडलेलीच होती !

◎ ◎ ◎

## : ५ : थट्टा

कपडे करून मी केव्हांचा तयार होतों; पण तिची वेशभूषा अजून संपलेली नव्हती ! दोन–तीनदां हांका मारल्यानंतरहि जेव्हां तिचें बाहेरच्या खोलींत येण्याचें लक्षण दिसेना, तेव्हां मीच रागारागानें ओरडलों, " काय, विचार काय आहे तुझा ? किती वेळ तरी मी नुसताच ताटकळत उभा आहे ! "

यावर तिचें कांहींतरी नेहमींप्रमाणें ठसक्यांत उत्तर येईल अशी माझी अपेक्षा होती. पण तसें कांहीं झालें नाहीं;—आंतून कांहींच आवाज ऐकूं आला नाहीं.

थोडा वेळ थांबून मग मीच रागानें आंत गेलों.

माझी कल्पना होती कीं आंतल्या खोलींतल्या आरशासमोर पातळ नेशीत किंवा पावडर लावीत ती उभी असेल. पण तसें कांहींच नव्हतें ! तिचें पातळ नेसून केव्हांच झालें होतें, आणि ती खिडकीजवळच्या कॉटवर सुन्नपणानें बसली होती.

मी ओरडलों, " हें काय ? नुसतीच बसली आहेस ? आज आपल्याला हिंडायला जायचें आहे हें विसरलीस कीं काय ? "

" विसरायला काय झालं ! मी तर केव्हांपासून तयार आहे. " ती मंद हंसून पुढें म्हणाली, " जरा थकल्यासारखं वाटत होतं, म्हणून कॉटवर बसलें होतें इतकंच ! "

" थकायला काय झालं ! असें काय सकाळपासून कामाचे गाडे उपसले आहेस ? " मीं म्हटलें, व थोडा वेळ थांबून तक्रारीच्या सुरांत पुढें सांगितलें, " छे ऽ बुवा तूं भारीच ' स्लो ' आहेस. "

यावर ती हंसली—मिस्कीलपणानें डोळे मिचकावून हंसली, व अंगाला आळोखेपिळोखे देत म्हणाली, " होय का! भारीच का 'स्लो' आहे मी प्रत्येक कामांत! बरं झालं बाई, एकदाचं कळून आलं!" आणि नंतर तिनें भराभर ब्लाऊझच्या गुंड्या घातल्या, आणि आरशासमोर उभी राहून कुंकवाची टिकली लावतांना, थट्टेखोर विनोदी हास्य चेहराभर फुलवीत, ती पुढें म्हणाली, "वाईट इतकंच वाटतं, कीं मी स्लो आहे; हें कळायला इतकीं सात–आठ वर्षं जावीं लागलीं."

"बरं बरं! चावटपणा करूं नकोस!" मी तिच्या पाठीवर धपका मारीत म्हटलें, "संध्याकाळचे सहा वाजून गेले आहेत! शक्य तितक्या लवकर बाहेर पडलं म्हणजे बरं!"

ती म्हणालीं, "होय ना!" आणि तिनें पायांत चपला सरकावल्या.

दाराला कुलूप लावतां लावतां मीं विचारलें, "बाळ कुठें आहे?"

"शाळेंतून तो परस्पर मित्राकडे गेला आहे. आपण परत आल्यावर त्याला हांक मारूं."

"पण इतका वेळ तो तिथं राहील का?

"नाहींतर येईल एकटाच घरीं परत. वरच्या बिऱ्हाडांत खेळेल, आपण येईपर्यंत!" ती म्हणाली व चालूं लागली.

शनिवारची संध्याकाळ होती, आणि घरापुढचा रस्ता सुंदर रीतीनें फुलला होता. आनंदी व हंसतमुख स्त्री–पुरुषांच्या त्या प्रवाहांत मग आम्हीं स्वतःला सोडून दिलें, आणि प्रवाहाबरोबर वहायला लागलों. त्या वातावरणानें आमच्या वयांतील क़ांहीं वर्षं मग एकदम कापलीं गेलीं, आणि आम्हीं तरुण नि अवखळ बनलों.

चालतां चालतां बस–स्टॉप आला. तिकडे पाहात ती म्हणाली, "बसनें जायचं ना!"

"बसनें! छे ऽ! मजेंत चालतच जाऊं कीं!"

"चालत? नको बाई! उगीचच दमायला होतं!"

"हंसायला काय झालं?" मीं तिच्याकडे बघत म्हटलें, आणि मला एकदम थट्टा करण्याची लहर आली. डोळे मिचकावीत गमतीनें पुढें म्हणालों, "एवढ्याशा चालण्यानं दमून जाण्याइतकीं कांहीं तुझी परिस्थिति नाहीं!"

या माझ्या बोलण्यावर तिनं हंसायला पाहिजे होतें; पण तसें कांहींच झालें नाहीं. एकदम तुसडेपणानें ती म्हणाली, "बोला – वाटेल तें बोला तुम्हीं ! पण मी कांहीं चालत येणार नाहीं. बसनंच जाणं बरं !" आणि असं म्हणून ती बसकडे चालायला लागली.

बसमध्यें मागच्या बाजूला जागा नव्हती, आणि ड्रायव्हरच्या मागच्या बाजूलाच आम्हां दोघांनाहि बसावें लागलें.

बस चालू लागल्यानंतर इंजिनचा घरघराट ऐकूं यायला लागला, नि अंगाला हादरे बसायला लागले. थोडा वेळ मग ती माझ्या खांद्यावर डोकें टेकून बसली, व मग एकदम म्हणाली, "बसनें उगाच आलों !"

"वा ! खूपच आहे ! तुझ्याच आग्रहामुळें तर बसनें आलों !"

"आग्रह माझा होता ! पण या आवाजानें, नि तेलाच्या वासानें कसं गुदमरल्यासारखं वाटतंय् !" असें म्हणून तिनें पर्समधला पांढरा शुभ्र रुमाल बाहेर काढला, व तो नाकाला लावून म्हटलें, "शी ऽ काय घाण येतीय् !"

मी कांहींच बोललों नाहीं ! नुसताच तिच्याकडे बघत बसलों.

पण तिचें रडगाणें चालूच होतें ! तोंडें वेडींवांकडीं करीत ती म्हणाली, "या वासानं मेलं डोकं किती चढतं !....ओकारी येईल असं वाटतं !"

"ओकारी ! कमाल आहे हं अगदीं !"

"कमाल कसली ? ओकारी का कुणाला येऊं नये ?"

"यावी...कुणालाहि यावी ! पण ती तुला येऊं नये, अशी माझी प्रार्थना आहे !" मीं हंसत हंसत म्हटलें.

पण माझ्या हंसण्याकडे तिचें लक्षच नव्हतें. इतक्या. वेळांत बस दोन–तीन स्टॉप पुढें जाऊन थांबली होती.

तिच्या मनांत काय आलें कुणास ठाऊक; पण एकदम उठून ती म्हणाली, "उतरूं इथं !"

"इथंच ?" मी आश्चर्यानें विचारलें, "अजून खूप पुढें जायचें आहे."

"कांहीं नको ! इथंच उतरूं ! मला कससंच वाटतं आहे." असें म्हणून ती पुढच्या दारानें खालीं उतरली.

मलाहि उतरावें लागलें.

रस्त्यानं चालतांना मी म्हणालों, " आज काय झालं आहे तरी काय ?"

" कुठं काय ? " ती हंसत हंसत म्हणाली.

" मग असं काय बावचाळल्यासारखं करीत आहेस ? बसमधून एकदम मध्येंच उतरलीस ! कसंसंच वाटतंय....ओकारी येतीय् हें पालुपद सारखं चालूंच आहे ! "

यावर ती हंसली पुन्हां व चालूं लागली. वाटेंत फुलांच्या दुकानांत मोतीयांचे गजरे आणि चाफ्याचीं पिवळीं धमक फुलें जाणाऱ्यायेणाऱ्याकडे बघून मिस्कील हास्य करीत होतीं. त्यांच्याकडे लक्ष देऊन ती म्हणाली, " गजरा घ्यायचा का ? "

मी कांहींच बोललों नाहीं, मग तीच पुढें म्हणाली, " घेऊंच. या दिवसांत मोगरीचा गजरा म्हणजे किती गंमत असते."

असें म्हणून तिनें मोठे दोन टपोरे गजरे खरीदले, नि माझ्या हातांत एक अडकवून ती दुसऱ्याचा वास घेत पुढें चालायला लागली.

चालतां चालतां माझी स्तब्धता तिच्या एकदम लक्षांत आली; व तिनें हंसत हंसत विचारलें, " कां ? बोलत कां नाहीं ? "

" काय बोलायचं ? "

" कां ! कांहींहि बोलावं कीं ? " ती म्हणाली. संध्याकाळच्या वातावरणामुळें तिची कळी खुलली होती, आणि मिस्कीलपणा खदखदूं लागला होता. कपाळाला गंमतीदार आठ्या घालीत मग ती पुढें म्हणाली, " कांहीं बोला कीं ? लग्नापूर्वीं तुम्हीं किती बोलके होतां."

" होय ना ?...पण तेव्हां लग्न झालं नव्हतं. आतां जबाबदारी वाढली आहे."

" इश्य ! जबाबदारीचं कुठें म्हणतें आहे मीं ! त्यावेळीं तुम्हीं किती छान छान बोलायचे !—अगदीं एखाद्या कादंबरींतल्या नायकासारखे ! "

" आतां मी कादंबरींतला नायक राहिलों नाहीं ! एक आपला साधा माणूस आहे मीं ! "

" अहो कळलं, पण ॲक्टिंग करायला काय झालं ? "

ती म्हणाली व थोडा वेळ थांबून एखादी गंमतीदार कल्पना स्फुरल्या-सारखा चेहरा करून पुढें म्हणाली, " खरंच गडे ! थोडा वेळ ॲक्टिंग करूं या ! तुम्हीं नायक, नि मी नायिका ! "

" ठीक आहे " तिच्या मिस्किलपणाचा संसर्ग बांधून मीं म्हटलें, " मीं नायक काय ? ऑल् राइट् ! पण हल्लींचे नायक लेकाचे काय बोलतात कुणास ठाऊक ? "

" काय बोलतात बरं ? " तीं हातांतल्या गजऱ्याचा वास घेत म्हणाली, " नाहीं तर असं करा ? तुम्हीं आपलें सूर्यास्तावर बोला—चालेल ? "

" चालेल का ? " मीं हंसलो, व जुन्या 'मनोरंजन' कालांतील नायकाच्या आवाजांत म्हणालों, " प्रिये ! भगवान् सहस्ररश्मी पश्चिम क्षितिजावरून निशादेवीच्या मंदिरांत जात आहे..."

मीं सुरुवात मोठ्या जोरांत केली होती, पण मग माझें मलाच हंसूं आलें. तोंडाला रुमाल लावीत मीं म्हटलें, " छे बुवा ! कांहीं जमत नाहीं; विठ्ठल सीताराम गुर्जरांचे नायक एका दमांत इतकीं मोठीं वाक्यें कशीं बोलायचे कुणास ठाऊक ? "

माझ्या हंसण्याला तिनें साद दिली नाहीं; ती एकदम गंभीर झाली व म्हणाली, " चालून चालून दमलें बाई ! कुठं तरी बसायचं का ? "

" हें काय चाललं आहे, मला कळत नाहीं. इतक्या थोड्या चालण्यांत तूं दमलीस ! आश्चर्य आहे ! मघाशीं बसमध्येंहि तूं असंच केलंस. "

ती चालतच होती; इतक्यांत समोर एक उडुपी हॉटेल दिसलें, त्याकडे बघून ती म्हणाली, " आपण हॉटेलांत जाऊं ! "

" हॉटेलांत कशाला ? " मीं चिडून म्हटलें, " आणि तुझं हें दमण्याचं नि कसंसंच वाटण्याचं प्रकरण मला कळतच नाहीं. काय झालं आहे काय तुला ? "

" सांगतें ना ? हॉटेलांत बसूनच सांगतें. चला. " ती म्हणाली, व हॉटेलच्या कंपार्टमेंटमध्यें शिरली.

आंत शिरल्यानंतर पंखा चालू करीत ती म्हणाली, " कांहीं तरी झणझणीत तिखट मागवूं ! "

मीं हंसून विचारलें, " तिखट खाण्याचे हे डोहाळे केव्हांपासून लागले ! "

" झाले पंधरा–वीस दिवस ! " ती हंसून म्हणाली, आणि तिनं खाद्यपदार्थांची ऑर्डर दिली.

मी मग तिच्या समोरच्या खुर्चीवर बसून टेबलावरच्या साखरेच्या भांड्यांशीं खेळत बसलों.

थोडा वेळ तसाच गेल्यावर तिनें विचारलें, " बोलत कां नाहीं ? "

" काय बोलायचें ? "

" कांहीं तरी बोला कीं !....मला तर खूप बोलावं नि हंसावं असं वाटतंय् ! "

" असं वाटण्यालाच डोहाळे लागले असें म्हणतात ! "

" बरोबर ओळखलंत " ती एकदम म्हणाली, " तुम्हांला हें सगळं कसं सांगावं, याचाच मी विचार करीत होतें. "

कांहीं शंका येऊन मी एकदम ओरडलों, " कशाबद्दल म्हणते आहेस तूं ? "

" दुसरं कशाबद्दल ? डोहाळ्याबद्दलच ! आय ऍम कॅरिइंग ! " ती माझ्याकडे बघत म्हणाली.

मी तिच्याकडे बघितलें—निरखून बघितलें, नि क्षणार्धांत जीव एकदम थरकला; आणि पुढच्या विचारांनीं घशाला एकदम कोरड पडली.

पण इतक्यांत ती हंसली, आणि कां कुणास ठाऊक, मला एकदम बरं वाटलं. छातीवरचं भलं मोठं ओझं एकदम उतरल्यासारखं वाटलं.

हंसत हंसत ती म्हणाली, " तुम्हांला सांगायचें, म्हणजे भीतीच वाटत होती. पण तुम्हीं आपोआपच ओळखलंत ! देव पावला ! "

" कांहीं तरी बोलूं नकोस. मला सारं कळतंय् ! तूं माझी टिंगल करीत आहेस ! "

" टिंगल ! नाहीं बाई ! खरंच सांगतें आहे, " ती फिदीफिदी हंसत म्हणाली, " थट्टा करण्यासारखा का हा विषय आहे ? "

मीं तिच्याकडे बघितलें, व ओळखलें, कीं ती थट्टाच करीत आहे. त्याशिवाय ती हंसेल कशी ? इतकी भीतिदायक बातमी सहजासहजीं सांगेल कशी !

नक्कीच ती थट्टा करीत होती. एखाद्या विषयांत रंगून जाऊन थट्टा करणें—नि दुसऱ्याला घाबरवून सोडणें तिला फार आवडतें, हें मला चांगलें माहीत आहे.

तरीहि खात्री करून घेण्यासाठीं मीं म्हटलें " थट्टा नसली, तर मात्र आश्चर्यच आहे. हॉऊ इट हॅज हॅपन्ड ! आपण तर सर्व तऱ्हेची काळजी घेतली होती..."

" म्हणे, हॉऊ इट हॅज हॅपन्ड ! कितीहि काळजी घेतली, तरी होणें जाणें थांबतें का ? " ती मिस्कील हास्य करीत म्हणाली, " **आलें देवाजीच्या मना....तेथें कोणाचें चालेना** "

ती थट्टा आहे याबद्दल माझी खात्रीच झाली; आणि मी तिच्याकडे बघत हंसायला लागलों.

ती हंसतच होती, आणि मला विचारीत होती, " तुम्हांला वाईट नाहीं ना वाटत ? "

" वाईट कशाला वाटेल ? पूर्वींच्या काळीं अशा बातमीमुळें हत्तीवरून साखर वाटण्यांत येई ! आज नुसता चहा प्यायला कांहींच हरकत नाहीं. " असें म्हणून मीं घंटा दाबली.

" हें काय ?—घंटा कशाला दाबलीत ? "

" या आनंदाप्रीत्यर्थ चहा नको का प्यायला ? " मीं म्हटलें व चहाची ऑर्डर दिली; चहा आल्यानंतर तिच्या कपाला माझा कप लावीत मीं म्हटलें, " थ्री चिअर्स फॉर दि कमिंग चाइल्ड ! "

यावर ती खदखदा हंसली व मला म्हणाली, " फारच चावटपणा करतां हं तुम्हीं एखादे वेळीं ! तुम्हीं सगळं गंमतीवरच नेतां ! मला वाटलं होतं, हें कळल्यानंतर काय काय तारांगण कराल तुम्हीं कुणास ठाऊक ? "

" तारांगण कशासाठीं ? " मीं मुद्दामच वेडेपणाचें सोंग घेऊन विचारलें.

" हें काय बोलणं ! जबाबदारी केवढी आहे ? पांच–सात वर्षांपूर्वी बाळच्या वेळीं निदान माझी आई तरी होती, तिच्या मदतीवर तेव्हां सारं पार पडलं. पण आतां कोण येईल ? "

मला भिवविण्याचा तिचा प्रयत्न चालला होता, हें मला कळत होतें; म्हणून मुद्दामच बेडरपणाचा आविर्भाव करीत मीं म्हटलें, " अं ! त्यांत काय

मोठंसं ! आया का प्रत्येकाला जन्मभर पुरतात ? दुसरी कांहींहि व्यवस्था करतां येईल ! " इतकें बोलून मी थांबलों, आणि मोठ्यांदा हंसत म्हणालों, " आतां लवकर घरीं जाऊं ! तुझी आतां काळजी घ्यायला पाहिजे. गप्पा-गोष्टींचा हा ताण या स्थितींत तुला झेपायचा नाहीं. "

" चला ! कांहीं तरीच नका बोलूं ! " ती हंसत म्हणाली, " अजून कांहीं तितकी वेळ आली नाहीं ! "

आम्हीं हॉटेलांतून बाहेर पडलों आणि बस–स्टॉपवर उभे राहिलों. बस यायला अजून बराच वेळ होता आणि क्यूहि मोठा होता. त्यामध्यें उभा राहात, मीं हलक्या आवाजांत म्हटलें, " नाहीं तरी आपणांला अजून एक मूल पाहिजेच होतें ! बाळला एखादी तरी बहीण हवीच ! नाहीं का ? "

" अहो इतकी सोपी का गोष्ट आहे ती ! किती उस्तवारी नि खटा-टोप ! पुन्हां मूल म्हणजे त्याची पुढची सारी जबाबदारी ! एक मूल म्हणजे कमींत कमीं पुढचीं वीस वर्षें तरी जिम्मेदारी आली ! "

" मग त्यांत काय झालं ? आजपासून वीस वर्षें !...त्यावेळीं मी पंचावन्न–साठ वर्षांचा असेन ! तूं पन्नाशी ओलांडलेली असशील. तिथपर्यंत आपण नक्की जगूंच ! "

" जगण्याचं कुणी काय बघितलं आहे ? नाहीं तर मध्येंच कांहींच्या बाहीच व्हायचं, आणि तें मूल उघडं पडायचं. "

संभाषणाला गंभीर वळण लागलेलें पाहून मीं हंसून म्हटलें, " तूं एवढी काय त्याची काळजी करतेस ? माझे वडील नेहमीं म्हणायचे कीं ज्यानें चोंच निर्माण केली आहे, तो चारा देईलच ! त्यांना एकंदर पांच मुलें, नि चार मुली होत्या ! पण ते नाहीं कुठें डरले ? "

इतक्या मुलांच्या कल्पनेनेंच तिचें अंग शहारलें, नि आळस देऊन लांबवर बघत ती म्हणाली, " बस यायचं कांहीं लक्षण दिसत नाहीं ! "

मी हंसलों आणि विनोद करीत म्हणालों, " खरंच का ! विसरलोंच मी ! तुझ्या सध्यांच्या परिस्थितींत इतकं उभं राहाणं तुला सहन होत नसेल. सॉरी हं ! आपण रिक्शानंच जाऊं. "

" इश्य ! सारखी थट्टा काय करतां ? "

" थट्टा नाहीं; खरंच म्हणतों आहें मी हें ! " मीं हंसत हंसत म्हटलें, व रिक्शा बोलावली.

रिक्शांत प्रथम मी चढलों आणि तिला हात देत म्हणालों, " जरा हळू हो बेतानं ! नाहींतर त्रास होईल ! "

यावर मात्र ती मनमुराद हंसली, व माझ्या खांद्यावर रेलून, एकातांत बोलावें, तशा हळुवार आवाजांत म्हणाली, " पुरे बरं का ! कळतात मला साऱ्या गोष्टी ! "

" कळतात ना ! मग बरं झालं ! " मी हंसून म्हटलें, व रिक्शा चालायला लागली.

थोडा वेळ गेल्यानंतर मीं तिला म्हटलें, " घरीं पोचल्यानंतर आपल्याला अनेक गोष्टींचा विचार करावा लागेल ! "

" कसला विचार करायचा ? " आळोखेपिळोखे देऊन माझ्या अंगावर आळस देत म्हणाली.

" वाऽ ! आतां किती तरी विचार आहेत, " मी बोटें घालीत म्हटलें, " प्रथम म्हणजे कोणत्या हॉस्पिटलमध्यें नांव घालायचें ? मला वाटतें, आपल्या घराशेजारीं एक नवीन हॉस्पिटल निघालें आहे, त्यांतच घालावें नांव ? "

ती कांहींच बोलली नाहीं. माझी थट्टा तिला सुखवीत होती, हें ओळखून मी पुढें म्हटलें, " दुसरा विचार तुझ्या नोकरीसंबंधीं करायला हवा ! तुला २–३ महिने रजा मिळेल, पण नंतर तुला राजीनामाच द्यावा लागेल. दोन मुलं घरीं ठेवून नोकरी करणं तुला जमणार नाहीं. "

थोडा वेळ तसाच जाऊं देऊन, मीं तिसरा विचार सांगितला, " मुलाचं नांव काय ठेवायचं हा एक प्रश्नच आहे ! "

" पुरे बरं का ! तुम्हीं एखादी गोष्ट कुठल्याकुठेंच ताणतां " ती उठून बसत म्हणाली. पण मला कावणें शक्यच नव्हतें. मला घाबरवून टाकण्यासाठीं तिनें प्रथम ही थट्टा सुरू केली होती. तिचा आतां पुरेपूर सूड घेणं मला भागच होतं.

मी मुद्दामच पुराण पुढें चालविलें, " मुलगी झाली तर तिचें नांव मीं ठरवून टाकलं आहे. तिला मी भारतीच म्हणणार ! "

यावर ती कांहींच बोलली नाहीं, तेव्हां मी पुढें म्हणालों, " मुलगा झाला तर मात्र प्रश्न आहे ! बाळच्या वेळीं आपण रात्ररात्र जागून विचार केला,...पण बाळ हेंच नांव ठेवलं ! तें नांव तितकसं चांगलं नाहीं ! तुला नाहीं असं वाटत ? "

" मला कांहीं वाटत नाहीं. तुम्हीं गप्प बसावं असं मात्र वाटतं."

" बरं बुवा ! बसतों गप्प ! " मीं म्हटलें आणि तोंडाला रुमाल लावून हंसू दाबण्याचा आविर्भाव करीत पुढें म्हणालों, " या सगळ्या गोष्टी झाल्या ! पण...पण बिन्याची सुपारी आणि आळीवाच्या लाडूंचं काय ! ते कोण करून देणार ? "

" आतां मात्र अगदीं अखेर झाली बरं कां ! " माझ्या मांडीला चिमटा घेत ती म्हणाली, " कांहींतरी जिभेला हाड ठेवा. "

मीं आणखी कांहीं बोलणार होतों, पण इतक्यांत रिक्षा घरापुढें थांबली आणि आम्हीं दोघं खालीं उतरलों.

रात्र बरीच झाली होती, आणि मित्राकडून येऊन बाळ केव्हांचा वरच्या बिन्हाडांत बसला होता. तो कंटाळला होता आणि अगदीं झोपेला आला होता. त्याला मग तिनें खालीं आणलें आणि अंथरूण घालून झोंपवलें.

मग आम्हीं दोघेच मजेंत जेवलों. माझी थट्टा करण्याची लहर वाढतच होती, आणि थट्टा करून घेण्यासाठीं ती उत्सुक होती. मजेंत जेवणें झाल्यावर तिनें पातळ बदललं, आणि ब्लाऊझ काढून टाकून नुसत्याच बॉडीनें ती पलंगावर पाय पसरून बसली.

मी तिच्याकडे बघत होतों, नि थट्टा करीत होतों. थोड्याच वेळांत डोक्यांतला गजरा तिनें काढला आणि माझ्या अंगावर फेकला.

त्याचा मनसोक्त वास घेऊन मीं म्हटलें, "गजरा मात्र छान आहे हं!"

" छान आहे ना ? " ती मिस्कीलपणानें हंसत आली, माझ्या डोळ्यांत बघत म्हणाली, " आणखी काय काय छान आहे ? कळूं द्या तरी ? "

" आणखी खूप गोष्टी छान आहेत. सांगूं का ? "

यावर ती कांहींच बोलली नाहीं. कॉटवर पडल्यापडल्या नुस्तीच माझ्याकडे बघून हंसली.

पण त्या हंसण्यानेंच माझ्या अंगांत एकदम उन्माद संचारला. घोगऱ्या बारीक आवाजांत मीं म्हटलें, “ सांगतों हं ” आणि दिवा मालवून तिला जवळ घेऊन चुंबन घेतलें, “ सांगूं का ? ”

पूर्ण आलिंगन देत ती म्हणाली, “ सांगा ना ? केव्हांपासून चाललं आहे सारखं ! सांगून तरी टाका ! ” ती हंसत म्हणाली.

“ बरं बरं ! ” मीं म्हटलें, पुन्हां दिवा लावून उशाजवळचें मोठें कपाट नेहमींप्रमाणें उघडलें.

निजल्या निजल्याच आश्चर्यचकित मुद्रेनें माझ्याकडे बघत ती म्हणाली, “ कपाट उघडतां ? ”

तिच्या विचारण्याचें आश्चर्य वाटून मीं विचारलें,

“ हा काय प्रश्न ! ”

“ आज कपाट उघडायची जरूर नाहीं. लक्षांत नाहीं का ? ”

अंथरुणावर अर्धनग्न अवस्थेंत पडलेल्या तिच्या आकृतीकडे बघत मीं म्हटलें, “ म्हणजे ? ”

“ अहो म्हणजे—म्हणजे काय करतां ? आतां कपाट उघडून काय उपयोग ? जें होऊं नये, तें झालंच आहे ” ती हंसत म्हणाली.

कांहीं शंकेनें थरकांप होऊन मी तिच्याजवळ बसत विचारलें, “ काय म्हणत आहेस ? मला कांहींच समजत नाहीं,”

“ समजायचं काय आहे त्यांत कपाळ ? संध्याकाळपासून मी काय सांगत आहे ? ” असें म्हणून तिनें पुन्हां दिवा मालवला व गळ्यांत हात टाकीत म्हटलें, “ तुम्हांला अजून कळलें नाहीं का ? आय ॲम कॅरिइंग ? ”

हें ऐकतांच माझ्या मनांतील, व शरीरांतील थरारणाऱ्या भावना एकदम उन्मळून पडल्या. माझ्या गळ्यांतले तिचे हात बाजूला काढून मीं जड मेलेल्या आवाजांत म्हटलें, “ मला वाटले ती सारी थट्टा होती. तूंहि सारखी हंसत बोलत होतीस—पण—पण तें सारं खरंच तर ! ”

“ हो ना ! ” ती म्हणाली, व माझ्या आणखी जवळ सरकली.

तिचें शरीर व मन भावनांनीं व वासनांनीं पुरेपूर पेटलें—थरारलें होतें. मला तें सारें जाणवत होतें. पण माझ्या मनांतली सारी उमेद, सारा

उत्साह संपला होता, आणि शरीर एखाद्या जड, चेतनाहीन ओंडक्यासारखें झालें होतें.

तिच्या भावनांना मीं साद देऊं शकतच नव्हतों. मीं पुन्हां दिवा लावला, आणि खिडकी उघडीत म्हटलें, "तूं नीज आतां. मी जरा इथेंच वाऱ्यावर बसतों—सिगरेट ओढीत!"

◎ ◎ ◎

## : ६ : वाटणी

दवाखान्याच्या आंतल्या बाजूला डॉक्टर एका रोग्याला इंजेक्शन द्यायची तयारी करीत होते; आज त्यांचें लक्ष अगदीं नको म्हटलें तरी घराच्या आंतल्या बाजूला चौकाच्या मागें सोप्यावर ज्या दोन तीन खोल्यांमध्यें दादांनीं व आईनें संसार थाटला होता तिकडे जात होतें. समोरच्या टेबलावर रोगी पडला होता, आणि ट्यूब उकळतां उकळतां डॉक्टर समोरच्या त्या दोन खोल्यांकडे बघतच होते. शेवटीं फार वेळ असें बघण्यांत अर्थ नाहीं असें ठरवून त्यांनीं भिंतीवरचा पडदा खालीं टाकला व ट्यूब उकळत्या पाण्यांतून काढून रोग्याला इंजेक्शन दिलें. नंतर रोगी निघून गेला, पण डॉक्टर त्या आंतल्या खोलींतच बसले. सकाळचे अकरा वाजून गेले होते, आणि बाहेरच्या बाजूला दुसरे कोणी रोगीहि नव्हते; त्यामुळें आंतल्या बाजूला बसणें त्यांना सहज शक्य होतें.

आंतल्या बाजूच्या मोठ्या खुर्चीवर ते बसले होते, आणि त्यांना समोरच्या बिऱ्हाडांतील हालचाल अगदीं स्पष्ट दिसत होती. दादांचें जेवण संपलें होतें, आणि ते बाहेरच्या बाजूला चुळा भरत होते. इतक्या लांबूनहि डॉक्टरांना दादांचें तें विकलांग शरीर, आणि डोक्यांवरचे नि मिशांच्या झुबक्यांतील पांढरे केस दिसत होते, आणि कसेसेंच वाटत होतें. मुलांचे अभ्यास चालले होते. आणि वहिनी आंतल्या बाजूनेंच कुणाच्या तरी अंगावर ओरडत होत्या, व म्हातारी आई सोवळ्यांत असून बाहेरच्या सोप्यावर बसून कांहीं म्हणत होती.

त्या सर्व देखाव्याकडे बघून डॉक्टरांनीं स्वतःच्या वरच्या बाजूला असलेल्या बिऱ्हाडाकडे दृष्टी टाकली. तिथें सारें शांत होतें—सुस्थिर होतें.

इतकी सकाळ झाली तरी कोणतीच गडबड तिथें नव्हती. मंदाकिनीची आंघोळ नुकतीच उरकली होती, आणि ती ड्रेसिंग टेबलापाशीं उभें राहून स्वतःचें रूप न्याहाळत होती, व आंतल्या स्वयंपाकघरांत आचारी स्वयंपाक करीत होता.

त्या दोन्हीं दृश्याकडे डॉक्टरांनीं एकवार बघितलें, आणि गेल्या दोन चार वर्षांतील त्यांचें मंदाकिनीशीं लग्न झाल्या दिवसापासूनच्या कुटुंब-कलहांतील अनेक घटनांचें त्यांना स्मरण झालें व चित्त व्याकुळ झालें. पहिल्या भांडणावरून गोष्टी आतां या थराला आल्या होत्या आणि दादा वेगळें रहायला लागले होते, अजून दोनचार दिवस गेले, कीं मंदाकिनीच्या वडिलांच्या साक्षीनें घराची वांटणी अगदीं कायदेशीर व पक्की होणार होती! पुढच्या रस्त्यावरील भाग डॉक्टरला मिळणार होता, आणि तिथें त्यांचा दवाखाना जोरांत चालणार होता. आंतल्या काळोख्या, अवजड बांधणीच्या जागेचा ताबा दादांकडे जाणार होता. इतके वर्षांच्या भांडणांत हेंच ठरलें होतें. मंदाकिनीचे वडील बाबासाहेब हे गांवांतले प्रख्यात नाणावलेले वकील तर होतेच परंतु शिवाय नगरपालिकेचे अध्यक्षहि होते. त्यांनीं आजपर्यंत अनेक बिलंदर प्यादीं खेळवलीं होतीं. दादांसारख्या भोळसट, नि एकमार्गी माणसाला खेळवणें त्यांचा पोरखेळ होता.

या सर्व व्यवहारांत पहिल्यापासून डॉक्टर विरोधी होते. त्यांच्या भावानें त्यांचें शिक्षण केलें होतें, आणि पोट मारून वडिलांच्या मागें त्यांना वाढविलें होतें. दादांना—आईला, अशा तऱ्हेनें सोडून जाण्याची कल्पनाहि त्यांच्या मनाला कशीतरीच वाटत होती. पण त्यांची ही भावना मंदाकिनीनें धुळीला मिळवली होती.

लग्नानंतरचे आठ दहा महिने बरे गेले, पण नंतर धुसफुशीला सुरुवात झाली. त्याचा पहिला प्रत्यय एका लहानशा प्रसंगानें डॉक्टरना आला. त्या दिवशीं रात्रींचा दवाखाना बंद करून डॉक्टर वर गेले, आणि दादां-बरोबर जेवण करून स्वतःच्या खोलींत कांहीं वाचत पडले! बऱ्याच वेळानें मंदाकिनी निजण्याच्या तयारीनें आंत आली आणि नुस्तीच उभी राहिली.

पडल्यापडल्याच डॉक्टरनें तिच्याकडे पाहिलें आणि त्यांना तिचें तरूण, सुंदर स्वरूप मोठें विलोभनीय वाटलें. ते मग अंथरूणावरून एकदम उठले

व तिच्या जवळ जाऊन उभे राहिले. रात्रीच्या मंद प्रकाशांत तिचें स्वरूप तर जास्तच मनोहारी दिसत होतें.

डॉक्टरांनीं मग तिला जवळ घेतलें, व कॉटवर बसवीत म्हटलें, " आज आम्हांला सर्व दिवस उपास पडला ! "

" तो कसा ? " लाडालाडानें तिनें विचारलें.

" आज एक माणूस दुपारीं तिकडे वडीलांकडे गेलं होतं म्हणून दिवसभर दर्शन झालं नाहीं." डॉक्टर हंसत म्हणाले, " आतां उपास सोडायला पाहिजे."

बराच वेळ ती मग लाडांत बोलत राहिली आणि मग एकदम आठवण झाल्यासारखं करून म्हणाली, " तुमचा उपास सोडायला मी एक आईकडून गंमत आणली आहे ! "

" होय ? ती काय बुवा ? "

" ओळखा ? "

डॉक्टर एकदम हंसले व तिच्या गालावर टिचकी मारून म्हणाले, " अग तूं म्हणजे तुझ्या आईनें मला दिलेली गंमतच आहेस ! "

ती एकदम सुखावली, बटनांशीं खेळत म्हणाली, " तुम्हांला आंब्याच्या वड्या आवडतात ना ? मग त्या मी आणल्या आहेत ! " असें म्हणून ती उठली आणि खालच्या सूटकेसमधून स्टेनलेसस्टीलचा मोठा डबा काढून तिनें त्यांच्यापुढें उघडला.

चौकोनी आकाराच्या तांबडसर वड्या बघून त्यांना एकदम आश्चर्य वाटलें व कांहीं शंका मनांत आली. ते म्हणाले, " या वड्या इथें आपल्या खोलींत कशा ? घरांत नाहीं दिल्या ? दादांना, मुलांनाहि झाल्या असत्या."

" पुरे तुमचं तें पुराण ! म्हणे दादा नि मुलं ! वहिनी आणि आई ! इतक्या सगळ्यांना वड्या वाटायच्या म्हणजे एखाद्या रमण्यांत दक्षणा वाटण्यापैकीं आहे ! "

तिचें बोलणें ऐकून त्यांना मनस्वी वाईट वाटलें होतें. मनाला धक्का बसला होता. ते रागानं तिला म्हणाले होते, "काय हें? तुला हें असं बोलवतं तरी कसं ?"

" कसं आणि काय ? बोलण्याची वेळ आली म्हणून बोलावं लागतं. अहो तुम्हांला एवढं कसं कळत नाहीं. त्यांच्या माहेरून कधीं कांहीं येतंय

का ? फुटकी कवडी तरी ते लोक खर्च करतात का ? परवां मुलांचा मामा आला तर एक आण्याच्या लिमलेटच्या गोळ्या मुलांच्या हातांवर ठेवून गेला. अशी तीं माणसं ! ”

ह्या तिच्या बोलण्यावर मग खूप बाचाबाची झाली होती, आणि मग रागावून डॉक्टर म्हणाले, “ असंच आहे तर या वड्या मीहि खाणार नाहीं ! तुझ्या तूंच खा ! ”

परंतु त्यांचा तोहि निश्चय त्या रात्रीं टिकला नाहीं. त्यानंतर बरीच धुसफुस झाली, रडणींफुगणीं झालीं, आणि तिच्या तारुण्यापुढें–सौंदर्यापुढें शरण जाऊन डॉक्टरनें त्या वडया रात्रीं खाल्याच ! त्या दिवसापासून मग कांहीं अपूर्वाईचा जिन्नस तिच्या माहेरून तिनें आणला, कीं एकदम त्या दोघांच्या खोलींतच यायचा हें जणु ठरून गेल्यासारखें झालें.

या प्रसंगानंतर डॉक्टरांचें जणु मनस्वास्थ्य नष्ट झालें, आणि ते एका निराळ्या दृष्टीनें घराकडे बघायला लागले. हळूहळू त्यांच्या लक्षांत आलें, कीं घरांत दोन प्रवाह पडले आहेत. एक फार मोठी भिंत अदृश्य रूपानें दादांच्या संसारांत, व स्वतःमध्यें उभी आहे.

असेच दिवस गेले आणि मग एके दिवशीं त्यांना त्यांच्या सासऱ्याकडून सहज म्हणून बोलावणें आलें. दवाखाना आटोपून दुपारच्या वेळीं ते तिकडे गेले. तेव्हां मंदाकिनी होती, व तिच्या श्रीमंत बहिणी आणि भाऊ मुद्दाम कांहीं गोष्ट ठरवून आल्यासारखीं दिसत होतीं. ते दिवाणखान्यांत गेले तेव्हां बाबासाहेब कांहीं वकीली कागदपत्र चाळत बसले होते; त्यांच्याकडे नजर गेल्यावर ते म्हणाले, “ या ! ”

खुर्चीवर बसत त्यांनीं विचारलें, “ का बोलावलं ? ”

बाबासाहेबांनीं एकदां वकीली पद्धतीचें मोठें हास्य केलें व म्हणाले, “ तुम्ही अगोदर चहा तर घ्या. मग पुढें बघूं. ”

थोड्याच वेळांत चहा घेऊन मंदाकिनी आली, कांहींतरी कामाचं निमित्त साधून सासूबाईहि आल्या, आणि नंतर बाळासाहेब, मिशांतल्या मिशांत हंसत एकदम म्हणाले, “ मी तुम्हांला बोलावलं तें कशासाठीं.... ”

“ कशासाठीं ? ”

" अशासाठीं कीं तुमच्या घराचा एकदां पूर्ण विचार करून टाकावा."

" घराचा? नि विचार कसला?"

" विचार हाच कीं एकत्रीत इतके दिवस निभाले, हें खूप झालें, आतां पुढें तसें रहायचें किंवा नाहीं, हें तुम्ही ठरवायला हवें!"

' हें मी ठरवायला पाहिजे. मग तुम्हीं कां बोलत आहांत!' असें विचारावें असें त्यांना वाटलें, पण ते बोलले नाहींत. मंदाकिनीकडे पहात नुसते तसेच बसले.

त्यांच्या मनांतली खळबळ त्यांच्या सासऱ्यानें ओळखली होती; म्हणून मग मृदु—कमावलेल्या आवाजांत तो म्हणाला, " असें विचार करणें—मनांत आणणें हें वाईट आहे हें मी जाणतों, पण एकंदर परिस्थितीकडे बघून तसं करणं भाग आहे." आणि मग त्यांनीं बदलत्या काळाकडे बघण्याबद्दल एक फार मोठें आख्यान त्यांच्यापुढें लावलें. त्यांनीं त्यांना सांगितलें. " तुम्हीं आतां एकत्रीत किती दिवस असे राहाणार? तुमची प्रॅक्टीस आतां वाढत जाईल! उद्यां तुम्हांला मुलेंबाळें होतील, त्यांच्यासाठीं तुम्हांला पैसे जमविणें—इस्टेट करणें जरूर आहे. तुम्हीं तसेंच दादांच्या संसारांत राहिलांत तर वाळवीनें घर खावें, तशी तुमच्या साऱ्या पैशाची अवस्था होईल आणि तुमचा सारा जन्म दारिद्र्यांत पिचत जाईल."

डॉक्टर सुन्नपणानें ऐकत होते आणि ते बोलत होते, " म्हणून म्हणतों वेगळें होण्याच्या दृष्टीनें हीच वेळ आहे. वेगळें व्हायला असें आहे तरी काय म्हणा! एक तें रहातें घर आहे त्याचे दोन भाग करायचे; पुढचा तुम्हीं घ्यायचा आणि मागचा दादांकडे ठेवायचा!"

हें बोलणें झाल्यानंतर कांहींच न बोलतां ते घरीं आले आणि उगाच आढ्याकडे बघत कांहींहि न बोलतां बसून राहिले, त्या दिवशीं संध्याकाळीं ते दवाखान्यांतहि गेले नाहींत. कुणाशीं कांहीं बोलले नाहींत. दादांच्या मुलांकडे आईकडे कांहीं निराळ्या दृष्टीनें बराच वेळ टक लावून बघत राहिले.

त्या बेचैनींत आठवडा दोन आठवडे गेले; आणि घरांतील अस्वस्थता वाढत गेली. मंदाकिनी कुणाशी भांडत नव्हती, पण तिच्या वागणुकींतून परकेपणा जाणवत होता. कुठें तरी कांहीं तरी चुकतें आहे हें लहान मुलांनाहि कळून चुकलें होतें, त्यामुळें तीहि अपराधी चेहऱ्यानें गप्प होतीं.

असें वातावरण फार दिवस सोसणें शक्य नव्हतें. एके दिवशीं रात्रीं निमूटपणें जेवण झाल्यानंतर, ते स्वतःच्या खोलींत आले आणि आराम-खुर्चीत उगाच वाचत पडले, तेव्हां त्यांना दादांकडून त्यांच्या खोलींत बोलावणें आलें. हें कांहीं निराळ्याच प्रकारचें बोलावणें आहे, हें ओळखून ते एकदम चमकले आणि खालच्या मानेनें आंत गेले.

आंतल्या खोलींत दादा नि आई होती, व बाहेरच्या बाजूस किंचित् अंधारांत मंदाकिनी उभी होती. ते आल्यानंतर कांहीं वेळ तसाच शांततेंत गेला, आणि मग दादांनीं खालच्या आवाजांत म्हटलें, “ तुला कशासाठीं इथें बोलावलें आहे, याची कल्पना तुला असेलच ! ”

कांहींच उत्तर देतां येण्याजोगें नसल्यामुळें ते तसेच ठिम्मपणानें उभे राहिले. तेव्हां दादाच पुढें म्हणाले, “ मीं बरेच दिवस विचार करीत होतों; शेवटीं दोन-चार दिवसापूर्वीं मी नि आईनें विचार पक्का केला ! ”

तो कांहीं तरी विचारील, असें त्यांना वाटलें पण तो गप्पच उभा राहिला.

तेव्हां तेच पुढें म्हणाले, “ मला आतां असें वाटतें, कीं आपण आतां वेगळें व्हावें—वाटण्या करून टाकाव्यात ! ” आणि थोडा वेळ त्याच्याकडे किंचित् रोखून बघत ते म्हणाले, “ आज एकत्र रहाण्यांत मौज नाहीं. ”

यावर ते एकदम उद्वेगानें ओरडले, “ असंच कांहीं नाहीं. आपण अजूनहि एकत्रच राहूं शकतों ! ”

यावर दादा हंसले होते आणि म्हणाले होते, “ तो प्रश्न आतां चर्चा करण्यासारखा राहिलेला नाहीं. वेगळें रहायचें हें ठरलेलेंच आहे ! ”

आणि मग आई म्हणाली, “ या वाड्याचेच तर दोन भाग करायचे ! एक पुढचा नि दुसरा मागचा. ” आणि ती थोडा वेळ थांबली, व कांहीं विचार करून पुढें म्हणाली, “ पुढच्या भागांत दादानें रहावें...नि मागच्या बाजूला डॉक्टरनें रहावें ! ”

इतका वेळ ती तिथेंच बोलत होती, पण आतां आंतल्या बाजूला अंधारांत उभी असलेली मंदाकिनी एकदम बाहेर आली, व म्हणाली, “ हें कसं शक्य आहे ? आम्हीं कसे मागं रहाणार ? ”

" कां ? पुढच्या बाजूला रहाण्याचा मोठ्या मुलाचा अधिकारच आहे ! "

" तें मीं कांहीं जाणत नाहीं. पुढच्या बाजूला यांचा दवाखाना आहे, तो कुठें जाणार ? त्यांपेक्षां आपणच मागें रहावें ! '

" पण दवाखाना दुसरीकडे गेला तर ? "

" त्यापेक्षां आपणच मागच्या बाजूला राहिलात तर काय वाईट ? इथें आमचा दवाखाना आहे, चार माणसं–येणार जाणार ! पुढचीच बाजू आम्हांला पाहिजे ! " मंदाकिनीनें फणकारून सांगितलें.

त्यावर मग बरीच भवती न भवती झाली आणि शेवटीं दादांनीं कबूल केलें; व मग एका दिवशीं आंतल्या दोन खोल्यांत दादांचा संसार सुरू झाला.

गेले दोन महिने बाहेरच्या दवाखान्यांतून डॉक्टर तो संसार पहात होते आणि त्यांना कसेसेंच वाटत होतें. पण आतां अजून एक चार-पांच दिवसांत तें सारें संपणारच होतें. मंदाकिनीच्या वडिलांच्या साक्षीनें आतां वाटण्या पक्क्या होणार होत्या, आणि मागच्या भागांत दादा कायमचा कोंबला जाणार होता.

डॉक्टरनें त्या आंतल्या खोलींतून दादांच्या बिऱ्हाडाकडे बराच वेळ बघितलें, व ते बाहेर आले बाहेर कुणीहि नव्हतें. पेशन्टस् घरीं गेले होते आणि दुपारचे बारा वाजून गेल्यामुळें रस्त्यावरहि शांतता होती.

मग डॉक्टर उठले व दवाखाना बंद करून वर गेले. वर मंदाकिनी उत्तम नवें पातळ नेसून, कांहीं विणकाम करीत बसली होती. तिच्याकडे त्यांनीं एकदां बघितलें व ते कांहीं तरी गंमतीदार बोलले.

परंतु ती आज खऱ्या रागांतच होती. डॉक्टरच्या थट्टेला तिनें कांहीं जबाब दिला नाहीं. ती नुस्तीच उठली व टेबलावर पानें मांडायला लागली.

जेवणें सुरू झाल्यावर पांचसांत मिनिटें तशींच गेलीं आणि मग डॉक्टरनें विचारलें, " कां ? आज विचार कसला चालला आहे ? "

" कांहीं नाहीं–विचार कसला ? " थंडपणानें हंसत ती म्हणाली आणि नंतर तिचें तिलाच काय वाटलें कुणास ठाऊक, पण ती खुदकन् हंसली व म्हणाली, " आज दुपारीं तुम्हांला बाबांनीं बोलावलंय. "

" कशाला ? "

" त्या वांटण्या पक्क्या करायला. दादांनाहि आजच बोलावलें आहे. आजच कागद करून टाकूं म्हणतात," आणि नंतर त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवून ती पुढें म्हणाली, " आणि बाबांना या वांटण्या मान्य नाहींत."

आश्चर्यानें त्यानें विचारलें. " कां म्हणून "

ते म्हणतात, " मोठ्या भावानेंच पुढें रहायला पाहिजे. हा त्याचाच मान आहे. आपण पुढची जागा घेऊन त्यांना मागें ढकलणें हें जगाच्या दृष्टीनें शोभणार नाहीं ! "

" दादा तेंच म्हणत होते. पण तेव्हां तूंच जोरांत होतीस "

यावर तिनें केविलवाणा चेहरा केला व म्हटलें, " मी चुकलें. भलता हट्ट मी धरला. बाबा खूप रागावले ! " आणि नंतर खालीं मान घालून तिनें सांगितलें, " तुमच्या दवाखान्याला, बाबा दुसरी जागा मिळवून देणार आहेत."

हें काय चाललें आहे हें डॉक्टरच्या लक्षांतच येईना. इतका बदल कसा झाला हेंच त्याला उमगेना. पण तो उगाच बसला.

हळूहळूं संध्याकाळ झाली आणि मग तीं दोघंहि बाबासाहेबांच्या घरीं गेलीं. थोड्याच वेळांत दादा नि आई आले आणि मग सर्व माणसें मोठ्या दिवाणखान्यांत जमलीं. बाबासाहेबांनीं एकदां सर्वांकडे चष्म्यांतून बघितलें व ' वाटणी ' या विषयावर भाषण केलें आणि नंतर म्हटलें, " या विषयावर मी खूप विचार केला आणि ठरविलें कीं, घराचें दोन भाग करावेत नि पुढच्या भागांत दादांनीं रहावें."

डॉक्टरनें सर्वांकडे आश्चर्यानें बघितलें ! नगरपालिकेचे अध्यक्ष असलेले बाबासाहेब, मंदाकिनी, तिचे भाऊ, सारे ठीक होते; व दादा आणि आई मात्र भोळेपणानें हंसत होते. बाबासाहेब पुढें म्हणाले, " मोठ्या भावाचाच पुढें रहावयाचा हक्क आहे. या बाबतींत प्रथमपासून मंदाकिनीकडून चूक झाली व तिनें भलता हट्ट धरला, याबद्दल मला वाईट वाटतें ! "

या भाषणानंतर मग ठरविण्याजोगें कांहीं नव्हतेंच. मग कायदेशीर कागद झाला. पुढचा भाग दादांना व मागचा डॉक्टरला मिळाला. कॉफी झाली व सर्वजण आनंदानें घरीं परतले.

एक-दोन दिवसांतच मग डॉक्टरनें स्वतःचें बिऱ्हाड मागें नेलें व दादा पुढें आले. दवाखान्याला जागा मिळेपर्यंत कांहीं दिवस त्याच जागेंत ठेवण्याचें ठरलें. या सर्व प्रश्नांत एक मंदाकिनीचा पराभव झाला होता, तरीहि ती आनंदांत होती; मागच्या कोंदट जागेंत मजेनें रहात होती.

डॉक्टर थंडच होते, पण मंदाकिनीच्या आनंदाचें कारण त्यांना कळत नव्हतें. कुठें तरी पाणी मुरतें आहे हें असें मात्र त्यांना वाटत होतें.

असेच आणखी चारसहा महिने गेले आणि मग एके दिवशीं संध्याकाळीं मंदाकिनी माहेरून घरीं आल्यानंतर म्हणाली, "आज एक बातमी आहे."

त्यांनीं विचारलें, "ती काय ?"

"अहो, दोनचार दिवसांपूर्वींच म्युनिसिपालटीचा ठराव झाला. आपला रस्ता रुंद होणार ! आणि रोड वायडनिंगमध्यें आपल्या घराचा पुढचा निम्मा भाग पडणार !"

एकदम साक्षात्कार व्हावा—वीज लखलखावी, तसा त्याच्या बाबा-साहेबांचा, कावा एकदम लक्षांत आला, व तो म्हणाला, "अस्सं ? असं होतं तर !"

पण ती बोलण्याच्याच रंगांत होती, "अहो, हा रस्ता रुंद होणार, आणि हें घर पडणार, हें बाबांना आधींच माहित होतें. आतां मात्र दादांची पंचाईत होणार घर पडल्यानंतर ते कुठें जातील कुणाला ठाऊक ?"

या बोलण्यावर डॉक्टरांना एकदम खिन्न वाटलें, व ते खिडकींतून वाड्याच्या समोरच्या भागाकडे बघत बसले. दादांना—आईला येणाऱ्या संकटाची मुळींच जाणीव नव्हती. तीं दोघेहि बाहेरच्या दिवाणखान्यांत मजेंत बसलीं होतीं.

तो त्याच्याकडे बघत असतांनाच, मंदाकिनी म्हणत होती, "एकूण वाटणी फायद्यावर पडली. आतां या जागेंत मोठा दवाखाना बांधावा गडे !"

◎ ◎ ◎

## : ७ : वासना

रविवार आहे. कचेरीला सुट्टी आहे, नि खानावळींत ' फीस्ट ' आहे. मी भरगच्च जेवतों, आणि कोपऱ्यावरच्या पानवाल्याकडून ' मसाला पान ' घेतों. पान चघळतां चघळतां सिगरेट ओढावीशी वाटते, म्हणून मीं ' कॅप्स्टन ' चें पाकीट विकत घेतों, आणि घरीं परततों.

घरांत जिकडे तिकडे धुरळा सांठला आहे. सकाळच्या चहाचीं भांडीं नि कपबशा अजून तशाच विसळायच्या पडून राहिल्या आहेत, आणि त्यावर माशा घोंघावत आहेत! धोब्याकडून आलेले कपडे कॉटच्या उशाशीं कालपासून तसेच पडले आहेत; अजून त्यांच्याकडे मी पाहिलेंहि नाहीं.

खोली आवरावीशी वाटते, पण मी आवरत नाहीं. माझा तो स्वभावच नाहीं. तोंडांतलें पान संपलें आहे, आणि गालांत मजेदार शिथिलता भरूं लागली आहे. त्याच अवस्थेंत मी आरामखुर्चींत पडून राहतों, आणि सिगरेट पेटवितों. सिगरेटच्या झुरक्यांनीं माझी गुंगी अधिकच वाढते, आणि वातावरणावर एक प्रकारची मदिरता पसरते.

हळूंहळूं मी जांभया देतों. एकदां विचार येतो, कीं खोली आवरावी! केर काढून स्वच्छता करावी, आणि परीटघडीचे कपडे कपाटांत नीट ठेवावेत. पण क्षणार्धांत तो विचार विरघळून जातो. माहेरी गेलेली पत्नी पांच-सात दिवसांतच यायची असते. ती परत आल्यावर तिच्यासाठीं कांहीं तरी काम हवेंच कीं!

माझें मलाच मग हंसू येतें, व मी टेबलाजवळच्या भिंतीवर लटकावलेल्या फोटोंतील पत्नीकडे व मुलांकडे पहातों. फोटोंतील तिची मुद्रा निरांजनाच्या वातीसारखी शान्त व स्निग्ध असते. मला तिची मग जास्तच तीव्रतेनें

आठवण होते. गेला महिना दीड महिना मी तिच्याशिवाय, नि मुलांशिवाय कसा काढला असेल, याचेंच माझ्या मनाला नवल वाटायला लागतें.

मनाच्या त्या अवस्थेंत मग मी बराच वेळ आरामखुर्चीत लोंबकळत पडतों. आठवणींच्या तीव्रतेला मग क्षणाक्षणाला भरती यायला लागते, आणि मी सारख्या सिगरेटस् ओढतों. एक संपल्यानंतर दुसरी, आणि मग तिसरी ! नंतर डोकें जड होतें, आणि झोंपण्याच्या विचारानें मी कॉटवर अंग झोंकून देतों. झोंप येते, नि येत नाहींहि ! लहानपणीं बागेंत उडणारीं रंगीबेरंगी फुलपांखरें हातांत आल्यासारखीं वाटत, पण तीं लगेच निसटून जात. झोंपेचेंहि आज असेंच झालें होतें. डोकें जड झालें होतें. जांभया येत होत्या, आणि डोळ्यांतून किंचित् पाणी गळत होतें. झोंप येईलशी वाटत होती, पण येत नव्हती.

कॉटखालींच कोणत्यातरी मासिकाचा अंक काल रात्रीं मीं दुमडून टाकला होता, तो मग मीं हातांत घेतों. त्यावर बाईचें मोहक चित्र असतें. अस्मानी रंगाच्या तंग ब्लाऊझ्मधून दिसणाऱ्या—भासणाऱ्या तिच्या उरोजांकडे मग मी उगाचच बघत बसतों. मला गुंगी येते—पण जितकी आणि जशी यायला पाहिजे तशी येत नाहीं. मग मी मासिक उघडतों, आणि काल रात्रींच वाचून टाकलेली ‘ ती ’ गोष्ट काढतों. ‘ तो आणि ती ’ ची रंगतदार आणि लज्जतदार गोष्ट आहे. मला गुंगी आणणारा, माझ्या मनोविकारांचें विमान कोठल्यातरी अदृश्य परिस्तानांत नेण्यास समर्थ असणारा, सारा मालमसाला तींत अगदीं खच्चून भरला आहे. सराईत चोरानें ओळखीच्या घरांत प्रवेश करावा, तसा मग मी सहजतेनें गोष्टींत शिरतों, आणि नायिकेच्या पदराशीं खेळायला लागतों. थोड्याच वेळांत तिचें उघडें शरीर दिसायला लागतें, आणि मी मनस्वी सुखावतों. मलपृष्ठावरील ती गोल गोल अस्मानी रंगाचीं वक्षःस्थळें मला मग नाजूक गुदगुल्या करतात, व मी झोंपी जातों.

मी झोंपतों—खूप झोंपतों. नानाविध स्वप्नांच्या लुसलुशीत पायघड्यांवरून मग मी मजेनें चालत जातों, आणि वासनांच्या मऊमऊ फुलांनीं सजविलेल्या झोंपाळ्यावर खूप झोंके घेतों. माझ्या झोंपेंत अस्मानी गुबगुबीत वक्षः-स्थळांच्या बागा फुलतात, आणि काळ्याशार चमकदार डोळ्यांचीं पांखरें

भिरीभिरी हिंडतात.

बऱ्याच वेळानें मी जागा होतों, आणि कॉटवर नुसताच पडून रहातों. नंतर मी उठतों, आणि आळसटलेल्या शरीरानें खिडकींपाशीं उभा रहातों. संध्याकाळ संपलेली असते, आणि घराघरांतून विद्युद्दीप लागलेले असतात. रस्त्यावरून तरुण, सुंदर, फॅशनेबल स्त्रिया जात असतात, त्यांच्याकडे मी उगाचच टक लावून पहातों, त्या पहाण्यामुळेंच कीं काय, माझें शरीर अधिकच जड होतें आणि मन बेचैनीनें पेट घेतें.

नंतर मी आंत येतों आणि स्टोव्ह पेटवून चहा बनवतों. चहा घ्यायल्यानंतर सिगरेट पेटवून आरामखुर्चींत लोंबकळायला मी सुरुवात करतों. रात्रींचे आठ वाजायचा सुमार असतो आणि सारी रात्र माझ्यापुढें तोंडें वेडीवांकडीं करीत–डोळे मिचकावीत उभी असते. एखाद्या दीर्घ प्रवासासारखी ती काळीकुट्ट रात्र मला फार त्रासदायक वाटते आणि मी घराबाहेर पडतों.

कुठें जायचें तें माझें ठरलेलें नसतें. पण कुठें तरी जाऊन खूप हंसावें, उंची वस्त्रें ल्यालेल्या सुंदर स्त्रियांशीं खूप बोलावें, थट्टामस्करी करावी, अशी मनाला भूक लागलेली असते. त्या भुकेची वखवख सहन करीत बेहोष अवस्थेंत चाललों असतांना, मला 'मानापमान' नाटकाची जाहिरात दिसते आणि मी नाटकाला जायचें ठरवितों. नाटकाच्या थिएटरांत मला पाहिजे असलेलें वातावरण नक्कीच असणार याची मला खात्री आहे. सूटबूट घातलेले आणि मिस्कील हास्य करणारे पुरुष आणि नानाविध आकर्षक रंगांचीं पातळें नेसलेल्या निरनिराळ्या धाटणीच्या मधुरभाषणी स्त्रिया, तिथें आज येणार याची मला कल्पना आहे.

नाटकाला अजून अवकाश आहे, म्हणून मी कोपऱ्यावरच्या इराण्याच्या हॉटेलांत शिरतों, आणि चहा मागवतों. चहा संपल्यानंतर मी सिगरेट पेटवितों, आणि नाकातोंडांतून धूर सोडीत रस्त्याकडे बघत बसतों. सिगरेट संपल्यावर थिएटरकडे निघावें, असा मीं विचार करतों.

इतक्यांत एक आठ–दहा वर्षांची, सॅटिनचा तांबडा फ्रॉक घातलेली मुलगी काउन्टवर चॉकोलेट घेतांना मी पहातों. मला कांहींच संवेदना होत

नाहींत—मीं नुसताच पहातों. पण इतक्यांत तिच्या मागोमाग एक मध्यमवयीन स्त्री आणि पुरुष येतात, नि त्या मुलीशीं बोलायला लागतात. त्या स्त्रीनें गर्द हिरव्या रंगाचें गोल पातळ नेसलें आहे, आणि तिच्या अंगांत पिवळसर रंगाचा स्वेटर आहे. पांढऱ्या शुभ्र हलव्याच्या दाण्यांत मधें मधें केशरी दाणे असावेत, तशी तिच्या स्वेटरवर तांबडीं बारीक फुलें आहेत. मजा अशी कीं कांहीं फुलें थेट अगदीं तिच्या वक्षःस्थळावर पडलेलीं आहेत! मी तिच्याकडे पहातों, आणि मला मजा वाटते. मी मग तसाच तिच्याकडे पहात बसतों. क्षण दोन क्षण जातात.... आणि मनांत कोठल्या तरी जुन्या आठवणी अभावितपणें पेट घ्यायला लागतात. मी मग मनाला विचारतों, "ही तीच का?" आणि मन निर्वाळा देतें, "होय! तीच ती!"

मग मला रहावत नाहीं आणि मी उठतों, व काउन्टरजवळ जातों. त्या लहान मुलीचें चॉकलेट घेणें संपून, तें त्रिकूट पुढें निघालें असतें. मी त्या स्त्रीकडे पुन्हां टक लावून पहातों, शंकाच नको! तीच ती! तें अपुरें नाक, पिवळसर गौर वर्ण नि काळेभोर मोठाले डोळे! मी तिच्याकडे पाहिलें, आणि कळत न कळत तिच्या कपाळाच्या उजव्या बाजूस—भिवईच्या थोडें वर मजेदार आठ्या पडलेल्या दिसल्या. मग तर माझी खात्रीच झाली, कीं तीच ती!

ती वासंती होती. आणि मी आज तिला जवळ जवळ दहा वर्षांनीं बघत होतों—हो, दहाच वर्षें! कॉलेज सोडून झालींच कीं तितकीं वर्षें! इतका विचार मनांत येतो, तों हें त्रिकूट पुढें चालूहि लागलें होतें. मी मग काउन्टरवर पैसे फेकतों, आणि झपाट्यानें त्यांच्या मागें जातों.

मनाला गंमत वाटते आणि हंसू येतें. दहा वर्षांपूर्वीं कॉलेजांत असतांना मी इतर मुलांप्रमाणें असाच तिच्या मागोमाग नेहमीं जायचा, आणि तिला ऐकूं येईल असें मोठ्यांदा कांहीं तरी बोलायचा! त्यावेळीं ती आमच्या कॉलेजांतील सर्वांत सुंदर व उंच मुलगी म्हणून प्रसिद्ध होती. पाठीवर दोन वेण्या सोडायची आणि तऱ्हेतऱ्हेची वेषभूषा करायची! एका वर्षीं गॅदरिंगमध्यें तिनें मुलींच्या गर्बा नृत्यांत राधेची भूमिका किती सुंदर वठविली होती! नाकांत मुंकलें घालून आणि डोक्यावर दुधाचा घडा

घेऊन गवळणीच्या वेषांत ती स्टेजवर आली, तेव्हां मुलांनीं टाळ्यांचा किती कडकडाट केला होता! त्यावेळची तिची उत्तान सुंदर आकृति अजूनहि माझ्या मनांत घोटाळत आहे. संपत आलेली चॉकलेटची वडी चविष्टपणानें चघळावी, तशा मी तिच्या आठवणी चघळत आहे.

ती मला ओळखतहि नसेल! कितीतरी मुलांचा घोळका त्यावेळीं तिच्या भोंवतीं घोटाळत असायचा. क्रिकेट टीममध्यें खेळणाऱ्या किंवा नाटकांत काम करणाऱ्या श्रीमंत, उमद्या तरुणांच्या जबड्यांत ती नेहमीं असायची! मला आठवत आहे, कीं क्रिकेट टीमचा कप्तान शाम चौधरी याच्याबरोबर त्यावेळीं ती नेहमीं दिसायची. त्या दोघांविषयीं, कॉलेजच्या त्या चिमुकल्या जगांत, त्या दिवसांत मनस्वी कुजबूज चालायची.

ती कुजबूज करण्यांत आमच्यासारख्यांना एक प्रकारचा चोरटा आनंद वाटायचा. कॉलेज सुटल्यानंतर, शामबरोबर ती इराण्याच्या हॉटेलांतील स्पेशल खोलींत शिरली कीं आम्हीं शेजारच्या खोलींत बसायचे! तिचें आमच्यासारख्यांकडे त्यावेळीं कशाला लक्ष असेल? तिच्यावर दुरून दुरून एकतर्फी प्रेम करणारे माझ्यासारखे अनेक होते. त्यांची तिला काय पर्वा असणार?

नाना प्रकारचे विचार घोळवीत मी बस स्टॉपवर येतों. बस पकडून थिएटरवर जाण्याचा माझा विचार असतो. स्टॉपवर गर्दी नसतेच. फक्त पुढची रांग भरलेली असते. मी मागच्या बाजूस उभा रहातों—आणि काय आश्चर्य? त्रिकूट तिथें पुढच्या रांगेंत अगदीं माझ्या शेजारीं उभें असतें.

उभ्या उभ्या मी वासंतीकडे टक लावून बघतों. ती आतां खूप सुटलेली असते, आणि गाल किंचित् ओघळल्यासारखे दिसतात. तिनें खूप ऐट केली आहे. तिनें गोल पातळ नेसलें आहे. आणि तोंडावर व मानेवर लावलेली पावडर मला स्पष्ट दिसत आहे. मला मग वाटतें कीं आतां हें सारें तिला शोभत नाहीं. तिनें गोल पातळ नेसायचें सोडून नऊवारी मंद रंगाचें लुगडें नेसलें तर बरें, असें उगीचच माझ्या मनांत येतें, व मी हंसतों. नतर मी तिच्या नवऱ्याची पहाणी करतों. अर्थात् तो शाम चौधरी नसतोच! कॉलेजांतील त्यावेळचाहि कोणीच नसतो. मला याचें आश्चर्य वाटत

नाहीं, व मी त्याच्याकडे बारकाईनें पहातों. त्यानें चष्मा लावला आहे व त्याचा रंग मलूल गोरा आहे. त्याच्या अंगांत गरम कोट असून, तलम धोतर त्यानें चापून–चोपून नेसलें आहे. थोडा वेळ मी विचार करतों, कीं हा माणूस काय धंदा करीत असावा ! सरकारी नोकरींतील अकौंटंट... डॉक्टर...वकील ! पण त्यांपैकीं एकहि धंदा माझ्या मनाला पटत नाहीं. मी विचार करीत उभा राहतों, आणि त्याच्या धंद्याविषयीं एक कल्पना मला 'स्ट्राइक्' होते. मला वाटतें, तो बहुधा कोठल्या तरी कॉलेजांत इंग्रजीचा किंवा मराठीचा प्राध्यापक असावा ! असें कां वाटतें कुणास ठाऊक पण वाटतें हें मात्र खरें. प्राध्यापक मंडळींच्या चेहऱ्यावर जो एक प्रकारचा कंटाळवाणेपणाचा तवंग नेहमीं दिसतो, तोच त्याच्या चेहऱ्यावर आहे, असें मला वाटतें.

बस बराच वेळ येत नाहीं आणि आम्हीं कंटाळलेल्या अवस्थेंत उभे असतों. इतक्यांत माझ्या अंगाला कुणाचे तरी पाय लागतात व मी चमकतों. वासंतीची मुलगी स्टॉपच्या दांड्यावर बसून घोडा–घोडा करीत असते, तिचेच ते पाय असतात. मला कसेंसेंच वाटतें व मी तिच्याकडे हंसत हंसत बघतों. एवढ्या वेळांत तिच्या गोऱ्या गोऱ्या लालसर पोटऱ्या माझ्या कोटाला घासायलाहि लागलेल्या असतात.

वासंतीचें लक्ष इतक्यांत तिच्याकडे जातें आणि ती त्रासिकपणानें म्हणते, " बेबी ! उतर बरं खालीं ! लोकांच्या अंगाला पाय लागतात, हें कळत नाहीं का तुला ? "

मी हसत हंसत म्हणतों, " असूं द्या हो ! लहान मुलांचे पाय थोडे लागले, तर काय बिघडलं ? " मी हंसत—मननोकळेपणानं बोलतों खरा पण माझा आवाज मलाच घोगरा नि कसासाच वाटतो. वासंती माझ्याकडे बघतहि नाहीं. थोडा वेळ जाऊं देऊन ती लांब रस्ता न्याहाळते आणि कंटाळवाण्या आवाजांत प्राध्यापकाला म्हणते, " अजून बस कशी येत नाहीं कुणास ठाऊक ! "

मी तसाच ढिम्मपणानें उभा रहातों. वासंतीचा मला राग येत नाहीं. कॉलेजांत असतांना ती माझ्याशीं कधींच बोलली नव्हती—आजहि

बोलण्याचा संभव नव्हता. बेबीचे पाय माझ्या छातीला लागत असतात आणि मी आणखीनच पुढें सरकतों. थोड्याच वेळानें लाल फ्रॉकच्या खालच्या मऊमऊ मांड्या माझ्या अंगाला घासायला लागतात आणि मला कसेंसेंच वाटतें. इतक्यांत लांबून बस येतांना दिसते आणि बेबीची खालीं उतरण्याची धांदल सुरू होते. तिला उतरतां येत नाहीं, म्हणून मीं तिच्या काखेंत हात घालून तिला नीट उतरवतों व जमिनीवर उभी करतों.

बस येते, ती बरीच भरलेली असते. पुढच्या बाजूस तीन जागा असतात, त्यांपैकीं एकावर मवाल्यासारखा दिसणारा तेलकट केसांचा माणूस अगोदरच बसलेला असतो. त्याच्या शेजारीं मग अर्थातच 'प्राध्यापक' बसतात व पलीकडे वासंती बसते. तिच्या मांडीवर अर्धवट उभी नि अर्धवट बसलेली अशी बेबी उभी राहते.

मी मागच्याच बाकावर खिडकीशेजारी बसतों. बस सुरू होते आणि आंतलीं माणसें हिंदकळायला लागतात. कडेच्या सीटवर बसलेली बेबी कुचंबते—अवघडते. तिला खिडकीजवळ बसायचें असतें व तसें ती आईला सांगते.

तिचें बोलणें मला ऐकूं आल्यानंतर मी सहजतेनें म्हणतों, "तुला खिडकीजवळ का बसायचं आहे बेबी ? ये इकडे."

वासंती कांहींच बोलत नाहीं. पण तिच्या नेहमींच्या पद्धतीनें कपाळाला आठ्या घालून अनिच्छा दर्शविते. 'प्राध्यापक' मात्र मवाल्याच्या अंगाशीं अंग खेटल्यामुळें 'नर्व्हस्' झालेला असतो. त्याला माझी कल्पना पसंत पडलेली असावी. तो मोठ्यांदा म्हणतो, "जा ग बेबी ! जा त्यांच्याजवळ. ते एवढं बोलावत आहेत तर जायला काय हरकत आहे ?"

एक चमत्कारिक धडपड माझ्या छातींत उत्पन्न होते आणि सारें शरीर कापायला लागतें. मीं उभा रहातों आणि पुढच्या बाकावरील बेबीच्या काखेंत हात घालून तिला वर उचलतों आणि माझ्याजवळ बसवतों.

तिला वर उचलतांच तिचा लाल लाल फ्रॉक फडफडतो आणि तिच्या गोऱ्यागोऱ्या मांड्या मला दिसतात. मीं मग एकदम चमकतों आणि 'असें वाटायला नको—हे विचार कांहींच्या—बाहींच आहेत' असें मनाला पटवतों.

पण मन स्वस्थ रहातच नाहीं. विकारांच्या नि वासनेच्या लाल लाल ठिणग्या त्यांतून केव्हांच उडायला लागलेल्या असतात.

माझ्या मांडीवर मला खेटून बसलेल्या बेबीकडे मीं नीट पहातों. लहानपणीं वासंती अशीच असेल का? मग मीं डोळे मिटून घेतों आणि बेबी अजून आठ-दहा वर्षांनीं किती 'फार्मांत' येईल याचीं चित्रें चितारण्यास सुरुवात करतों. नंतर मन पलटी खातें. बेबी म्हणजे वासंतीच नव्हे का? तिच्यासारखीच गोरीभुरकी आहे. वासंतीचें रक्त, तिचे अवयव, चेहऱ्यावरील हावभाव, सारे तर बेबीनें चोरले आहेत! खरी वासंती म्हणजे नुस्ताच पालापाचोळा उरला आहे! बेबी म्हणजेच खरी वासंती आहे!

इतक्यांत थिएटर येतेंच. तें त्रिकूट नाटकालाच जात असतें. मीं त्यांच्याबरोबरच जातों व त्यांच्या शेजारचेंच तिकिट काढतों. ते इकडेतिकडे करतात तोंपर्यंत मीं माझी खुर्ची पकडतों.

थोड्याच वेळांत तें त्रिकूट येतेंच. मीं एका बाजूला असतों आणि तीन खुर्च्या टाकून पलीकडे तो मवाल्यासारखा दिसणारा माणूस असतो. पुरुषाजवळ पुरुष या न्यायानें एका पुरुषाजवळ 'प्राध्यापक' नि दुसऱ्याजवळ बेबी बसणें योग्य होतें. त्या दोघांच्यामध्यें-परपुरुषापासून लांब अशा अवस्थेंत मग वासंती बसली असती!

'प्राध्यापक' उभ्याउभ्याच माझ्याकडे टक लावून पहातात. त्यांना मीं बरा माणूस वाटलों असण्याचा संभव आहे, कारण ते माझ्या शेजारीं बसतात. बेबी मग त्या मवाल्याजळ बसते आणि त्या दोघांमध्यें वासंती बसली आहे. माझें शरीर विलक्षण तापलें असून डोक्यांत नानातऱ्हेचे विचार उसळत आहेत. त्याच अवस्थेंत मीं वासंतीकडे चोरट्या नजरेनें पहात आहे. तिचें शरीर अगदीं गलथान, नि निःसत्त्व दिसत आहे! तिच्या पलीकडे बसलेली बेबी, खरोखरच किती सुंदर दिसते आहे! तिचें शरीर अजून अपरिपक्क आहे-अजून ती फुलायची आहे. पण तिनें समोरच्या खुर्चीला टेकलेले पाय, किती गोरेपान दिसत आहेत! पंधरा वर्षांपूर्वीं गरबा नृत्यांत राधा गवळणीची भूमिका करणाऱ्या वासंतीचे पाय असेच गोरे गोरे असतील का? बेबीच्या पोटऱ्यांवर भासमान होणारा गुलाबी रक्तिमा, पूर्वीं वासंतीच्याहि पोटऱ्यांवर असेल का?

मला काय झालें आहे, हें माझें मलाच कळत नाहीं. नाटकांत लक्ष लागत नाहीं, पण मीं तें बघण्याचा प्रयत्न करतों. वासंती नाटक बघतां बघतां प्राध्यापकाशीं कांहीं बोलत आहे, पण तो नुसताच 'हो' ला 'हो' करीत आहे. आज दहा-पंधरा वर्षें तिचें असले लाडेलाडे बोलणें ऐकून तो बहुधा कंटाळला असेल! मी त्याच्या शेजारींच बसलों आहे; आणि नाटकाबद्दल तो माझ्याशीं कांहीं टीकात्मक बोलत आहे. मीं कांहींच उत्तर देत नाहीं—कांहीं बोलण्याच्या मनःस्थितींत आज मी नाहीं, हेंच खरें!

इतक्यांत अंक संपतो आणि मीं बाहेर पडतों. पान खाऊन सिगरेटचे झुरके घेत, उगीचच मीं बाहेरच्या प्रांगणांत रेंगाळत फिरतों. समोरच्या हॉटेलांत तलम गर्भरेशमीं वस्त्रें नेसलेल्या स्त्रिया चहा पीत आहेत, आणि शेजारच्या पुरुषांशीं नर्मविनोद करीत आहेत. त्यांतली ती पांढरें शुभ्र पातळ नेसलेली आणि मंद हिरव्या रंगाचा ब्लाऊझ घातलेली, मध्यमवयीन स्त्री किती रसरशीत, नि भरदार दिसत आहे! कशाचें तिला इतकें हंसू येत आहे, कुणास ठाऊक! हंसण्याची उबग अनावर झाल्यामुळें तिच्या डोळ्यांतून पाणी गळत आहे आणि गालावर लाली पसरली आहे! बिजलीच्या प्रकाशांत, तिचे पांढरे शुभ्र दांत तरी किती सुंदर आणि कांतिमान् दिसत आहेत! त्या स्त्रीकडे बघून माझ्या वासना अधिकच पेट घेत आहेत.

घंटा होते आणि मी आंत जायला निघतों. पुन्हां विचार करून मीं बाहेर येतों आणि चॉकलेटच्या वड्या आणि खाऱ्या शेंगाचा पुडा घेऊन आंत जातों. आंत बेबी त्या पहिल्या खुर्चीवरच बसलेली असते आणि 'प्राध्यापक' व वासंती बाहेर चहा प्यायला गेलेलीं असतात.

मी बेबीच्या हातांत चॉकलेट ठेवतों आणि हंसत विचारतों, "काय बेबी! कसें काय आवडलें नाटक?"

बेबी कांहींच बोलत नाहीं. इतक्यांत 'प्राध्यापक' नि वासंती आंत येतात. मीं मग बेबीला वडी दाखवीत म्हणतों, "अजून पाहिजे का वडी?" आणि प्राध्यापकाकडे वळून हंसत विनोद करीत पुढें म्हणतों, "पण मग आमच्याजवळ बसायला पाहिजे."

मीं मग बेबीचा गोरागोरा हात धरतों आणि तिला माझ्या शेजारच्या

खुर्चीवर बसवतों. बेबीचा हात हातांत घेत स्टेजकडे पहातों. नाटक सुरुहि झालेलें असतें.

बेबीचा हात किती कोवळा आणि लुसलुशींत आहे ! तिच्या हाताचीं बोटें तरी किती छान आहेत !....नाटकांत माझें लक्षच लागत नाहीं—लागणें शक्यच नाहीं...मीं बेबीकडें नि वासंतीकडे चोरट्या नजरेनें पहात आहे आणि बेबीच्या शरीराशीं खेळत आहे, कोठलीं तरी पूर्वजन्मीची अतृप्त इच्छा जणुं माझ्या मनांत हेलावत आहे. वासंतीच्या शरीराशीं लगट करण्याचें माझें अनेक वर्षांपूर्वीचें स्वप्न मी बेबीच्या स्वरूपांत पहात आहे. कां कुणास ठाऊक ? पण पुदिन्याच्या वासानें वृत्ती धुंद व्हाव्यात तसें माझें मन वासंतीच्या जुन्या आठवणींनीं होत आहे, हें मात्र खरें.

काय चाललें आहे हें माझें मलाच कळत नाहीं. बेबीचे पाय मीं मांडीवर घेतले आहेत नि तिच्याशीं खेळण्याच्या मिशानें माझ्यांतील राक्षस तिला गुदगुल्या करीत आहे. तिला आतां झोंप यायला लागली आहे म्हणून मी तिला गालांवर, छातीवर, मांड्यावर आणि पार्श्वभागावर थोपटत आहे. वासंती नि प्राध्यापक दोघेंहि नाटक पहाण्यांत रंगले आहेत. त्यांना माझ्या मनाची कल्पना नाहीं-असणें शक्यहि नाहीं !

बराच वेळ हा खेळ चालतो आणि मला गुंगी येते. त्या गुंगीमध्यें दुपारची, अस्मानी वक्षःस्थळें असलेली स्त्री मला बेबीच्या स्वरूपांत दिसते आणि मी तिला जास्तच हळुवारपणानें थोपटायला लागतों. पण इतक्यांत अंक संपतो आणि मीं जागा होतों.

मीं आतां खरोखरच जागा झालों आहे; आणि मला कसेंतरीच वाटत आहे. माझ्या मांडीवर निजलेल्या बेबीला मीं 'प्राध्यापकां'जवळ देतों आणि बाहेर येतों. बाहेर येऊन सिगरेट पेटवितों पण तिची चव लागत नाहीं. समोरच्या चहाच्या दुकानांत त्या मागच्या बायका सोडा—लेमन घेत असतात ! पांढरें शुभ्र तलम पातळ नेसलेली, मजबूत बांध्याची ती मध्यम-वयीन स्त्री किती वेळ तरी सारखी हंसतेच आहे आणि तिचे सारे अवयव हेलकावत आहेत ! पण आतां मला तिच्यांत कांहींच स्वारस्य वाटत नाहीं. तिच्यावरची नजर काढून मीं दुसऱ्या बाजूलाच बघत आहे.

अंक सुरू झाला आहे, आणि लोक आंत गेले आहेत. मी एकटाच बाहेर काळोखांत उभा आहे. माझी मलाच किळस आल्यामुळें, आतां न जाण्याचें मीं ठरविलें आहे.

मी बराच वेळ उभा रहातों नि चालायला लागतों. अंधार पडला आहे, आणि झोंबणारा गार वारा सुटला आहे. मी चालतच आहे—झपाटलेल्या, झिंगलेल्या माणसासारखा मी चालतच आहे.

बऱ्याच वेळानें मी घरीं येतों नि दिवा लावतों. फोटोंतील पत्नीची शान्त व स्निग्ध नजर मला दिव्याच्या प्रकाशांत दिसते आणि धीर येतो. कांहीं वेळ विचार करून मीं हातांत केरसुणी घेतों आणि इतक्या रात्रीं खोली साफ करतों. अस्मानी वक्षःस्थळांच्या त्या बाईला रद्दींत फेकून देतों आणि गादीवर परीटघडीचा पलंगपोस व उशांना नवे अभ्रे घालतों. अभ्र्यांवर माझ्या पत्नीनें भरतकाम केलेलें असतें, त्यांतील रंग मला एकदम आकर्षक वाटतात. उशीवर डोकें ठेवतांच, माझें मन शांत होतें आणि मीं झोपीं जातों.

◎ ◎ ◎

## : ८ : सरता उन्माद

आंघोळ झाल्यानंतर, कपडे करतां करतां, वामनरावांनीं बायकोला म्हटलें, " चहा कर थोडासा ! ऑफिसची वेळ होत आली."

सुमती फणी-करंड्याची पेटी घेऊन दारासमोर बसली होती. पाठीवर रुळणारे काळेभोर लांबसडक केस डाव्या खांद्यापुढें घेऊन, उजव्या हातांतील कंगव्यानें ती ते विंचरत होती. वामनरावांच्या बोलण्याकडे तिचें लक्षच नव्हतें. आरशांतील स्वतःच्या छबीच्या टप्पोऱ्या गौरवर्ण गालांकडे बघण्यांतच ती केव्हांपासून तरी मशगुल होती.

वामनरावांनीं एकदां तिच्या पाठमोऱ्या ऐसपैस आकृतीकडे बघितलें, नि पुन्हां मोठ्यांदां म्हटलें, " ऐकलंस का ! आठ चाळीसची लोकल आहे आज. शनिवार—सकाळचं ऑफिस आहे, हें विसरलीस वाटतं ? "

यावर तिनें डाव्या बाजूनें मुरडून वामनरावांकडे बघितलें, आणि स्मित केलें. हंसतांना आपले पांढरेशुभ्र दांत फारच सुंदर दिसत आहेत— वर्तमानपत्रांतील टूथपेस्टच्या जाहिरातींतील बाईसारखे दिसत आहेत, असें वाटून तिनें पुन्हां समोरच्या आरशांत बघितलें, आणि स्वतःशींच खूष होऊन मानेला सौम्य हिसडा देत ती उठली, व कोपऱ्यांत शेगडी पेटून चालली होती, तिच्यावर चहाचें आधण ठेवलें.

चहा प्यायल्यानंतर वामनराव बाहेरच्या खोलींत आले, आणि वहाणा घालतां घालतां म्हणाले, " दुपारीं पांच वाजतां, घारपुऱ्यांकडचीं माणसें मुलीला घेऊन येणार आहेत ! लक्षांत आहे ना ? "

तिनें मग नुसत्या मानेनेंच होकार दिला, व ते बाहेर पडले.

त्यानंतर मग ती पुन्हां गॅलरीजवळच्या खिडकींत गेली आणि वेणी घालायला लागली. समोरच्या चाळींतील चष्मेवाले, स्थूल अंगाचे गृहस्थ आपणाकडे बघत आहेत, असें लक्षांत येतांच, तिचें वेणी घालण्याचें काम जास्तच कलाकुसरीनें सुरू झालें. तिला स्वतःच्या लांबच्च लांब काळ्याभोर केशकलापाचा मोठा अभिमान होता. त्यामुळें ती त्या केसांशीं बराच वेळ खेळत बसली. नंतर अंबाडा घालतांना तिनें आपले दोन्ही गौरवर्ण हात उंच केले, आणि आरशांतील स्वतःच्या उन्नत स्तनभागांकडे निरनिराळ्या बाजूनें बघितलें. मग तिनें समोरच्या चाळीकडे पाहून कपाळाला आठ्या घातल्या, आणि आरशाची पेटी धाडकन् लावून घेत हांक मारली, " भावजी, आंघोळीला पाणी उपसायचं का तुमचं ? "

चाळीच्या व्हरांड्यांत छोट्या स्टुलावर बसून विष्णु ' पेपर ' वाचीत होता. आज दुपारीं घारपुऱ्यांची मुलगी घरीं दाखवायला येणार होती; त्यामुळें त्यानें ऑफिसला रजा घेतली होती. वर्तमानपत्राच्या मजकुराआडून त्याला घारपुऱ्यांची मुलगी दिसत होती, आणि चाळीच्या सकाळच्या वेळच्या धबडग्यांतसुद्धां त्याचें मन सुखावत होतें.

सुमतीनें मग एकदां त्याचेकडे तिरक्या नजरेनें पाहिलें आणि हंसून किनऱ्या आवाजांत म्हटलें, " कुठं तंद्री लागली आहे भावजी ! "

विष्णूनें एकदम चमकून विचारलं, " अं ! काय म्हणालांत ? "

" नाहीं, म्हटलं कुठं तंद्री लागली आहे ! कुणाचं चिंतन इतकं मघां-पासून सुरू आहे ? " असें म्हणून ती हंसली आणि अंगाला मजेदार आळोखेपिळोखे देऊन पुढें म्हणाली, " आंघोळ व्या करून; पाणी उपसलं आहे."

विष्णुनें मग अंडरवेअर लावून स्वयंपाकघरांतील मोरींत आंघोळीला सुरुवात केली. सुमतीचें वामनरावांशीं लग्न झालें, तेव्हां विष्णु सारा-पंधरा सोळा वर्षांचा होता. तो आंघोळ करतांना बाहेर जाण्याची त्यामुळेंच तिला जरूरी नव्हती.

त्याची आंघोळ होतांना ती मग तिथेंच शेगडीजवळ बसली, आणि कढईत भाजलेले भुईमुगाचे दाणे ताटांत काढून जोरजोरानें सालें काढायला

लागली. सालें काढतांना ती फुंकर मारीत होती, आणि एखाददुसरा दाणा तोंडांत टाकीत होती. आपल्या तोंडाचा मजेदार चंबू झाला आहे, आणि दाणे पाखडत असतांना आपलें सारें शरीर मजेदार हेलकावे खात आहे, याची तिला जाणीव होती. त्या जाणिवेनेंच मग तिनें कोपऱ्यांतल्या मोरींत टॉवेलनें अंग पुसणाऱ्या विष्णूकडे पाहिलें. दोघांची दृष्टि एकमेकांत भिडली, आणि विष्णूचे डोळे खालीं वळले. तिचें वामनरावांशीं लग्न झाल्यापासून विष्णूवर तिच्या व्यक्तिमत्त्वाचा एक चमत्कारिक दाब आहे, हें तिला माहीत होतें; म्हणूनच मग ती खुदकन हंसली, व खलबत्त्यांत दाणे कुटीत असतांना लाडकेपणानें म्हणाली, "इश्य भावजी! वेडगळासारखे उभेच का आहांत! घारपुऱ्यांच्या मुलीनं इतकं वेड लावलंन् म्हणजे कमालच आहे!"

विष्णु कांहीं बोलला नाहीं. पण त्याचीं कानशिलें लाल झालीं होतीं, आणि सारें शरीर कांपत होतें. त्यानें मग कपडे केले, व तो बाहेर पडला. मनाच्या अशा अवस्थेंत हॉटेलांत जाऊन, सिगरेट ओढीत बसण्याची त्याची कित्येक दिवसांपासूनची संवय होती.

तो बाहेर निघून गेल्यानंतर तिला एकदम मोकळें मोकळें वाटलें. तिनें मग टॉवेल लावून घेऊन साग्रसंगीत आंघोळ केली. हाताला, मांड्यांना, स्तनाग्रांना, व पोटाला साबण लावतांना, ती स्वतःच्या शरीरावर भलतीच खूष झाली, व गाणें गुणगुणूं लागली. त्या गाण्याच्या सुरांनीं तिला मग चारपांच वर्षांपूर्वी वामनरावांबरोबर पाहिलेल्या मेट्रोमधील एका इंग्रजी सिनेमांत नेलें. त्यांत नायिकेच्या स्नानाचा असाच देखावा चित्रित केला होता. पोहोण्याच्या विरविरीत पोषाखांत जलक्रीडा करीत असतांना त्या स्वरूपसुंदर नायिकेच्या गळ्याखालील गोरागोरा बांधेसूद भाग पाण्यांत होता; आणि त्याची हालचाल होतांना, तो एखाद्या चकचकीत माशाच्या अंगाप्रमाणें दिसत होता. तोंड माणसाचें व शरीर माशाचें, अशा स्वरूपांत ती स्वरूपसुंदर मीनाक्षी तेव्हां तिला दिसली होती. आतां, चाळीमधल्या मोरींत आंघोळ करतांना, ती स्वतःला त्या नायिकेच्या स्वरूपांत बघायला लागली आणि स्वतःशींच सुखावून जाऊन, जास्तच तल्लीन झाली.

आंघोळीनंतर गुलबक्षीच्या रंगाचें सुळसुळीत नऊवारी पातळ नेसून तिनें पांढरा शुभ्र ब्लाऊझ घातला, व ती आरशांत बघायला लागली. कुंकू लावतां लावतां मग तिनें डोक्याचा अंबाडा सोडला, व केसांना पाठीवर रुळायला लावलें. समुद्राच्या पाण्याच्या लहरींप्रमाणें हलणारे ते पाठीवरचे केस पाहून मग तिला फार बरें वाटलें.

नंतर थोडावेळ पलंगावर बसून ती वर्तमानपत्रांतील बातम्या चाळायला लागली. पण त्यांत रस न वाटल्यामुळें ती उठली, आणि मानेच्या मागच्या बाजूस हाताच्या पंजाची आढी घालून तिनें आळस दिला, व कांहीं विचार करून ती पलीकडच्या मास्तरांच्या बिऱ्हाडांत गेली. मास्तरीणबाई आंतल्या खोलींत स्वयंपाक करीत होत्या, आणि मास्तर बाहेरच्या खोलींतील कॉटवर पडून पेपर वाचीत होते.

तिला आंत आलेली पाहून मास्तर किंचित् सावरून बसले आणि तिच्याकडे पाहून हंसले. त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवीत ती मोठ्यांद म्हणाली, " येऊं का हो आंत ? "

आंत स्टोव्हच्या आवाजामुळें मास्तरीणबाईंना नीट ऐकूं गेलें नाहीं. त्या म्हणाल्या, " कोण आहे ? "

एवढ्या वेळांत ती मास्तरांच्या अंगावरून पुढें जाऊन मधल्या दरवाजांत उभी राहिली होती आणि दोन्हीं हातांनीं दरवाज्यावरच्या कोयंड्याशीं खेळत होती. अंगाला मजेदार हेलकावे देत, नि हंसत ती म्हणाली, " आहे एक पाहुणी ! चहा मिळेल का म्हणून बघायला आली आहे."

यावर मास्तर हंसले आणि तिच्या अंगोपांगाकडे जास्तच निरखून बघायला लागले. त्यांच्या दृष्टीची दखल न घेतल्यासारखें करून ती आंत गेली व पाट्याला टेकून ऐसपैस बसली.

मास्तरीणबाई काळ्या आणि थोड्या फार कुरूप तर होत्याच पण शरीरानेंहि किडकिडीत होत्या. सुमतीपेक्षां तीन-चार वर्षांनींच त्या वडील असतील पण त्यांच्या देहावरचें सारें तारुण्य नि उन्माद धुवून गेला होता. पाणी वाहून गेलेल्या नदीच्या पात्राप्रमाणें कळाहीन दिसणाऱ्या मास्तरीण-बाईकडे पाहून सुमतीला स्वतःच्या निरोगी पुष्टतेचा नेहमीं प्रत्यय येई व

मनांतल्या मनांत बरें वाटे आणि त्यामुळेंच तिला मास्तरीणबाईकडे जाणें नेहमीं आवडे.

मास्तरीणबाईंनीं स्टोव्हवर चहाचें आधण ठेवलेलें पाहून ती मनमोकळे-पणानें—बाहेर ऐकूं जाईल अशा स्वरांत म्हणाली, " आतां चहा नको बाई ! सकाळपासून तीनदां झालाय् ! "

तिचें बोलणें ऐकून बाहेर मास्तर म्हणाले. " कर ग, चहा कर ! त्यांच्यामुळें आम्हालाहि मिळेल थोडासा. " आणि थोडा वेळ जाऊं देऊन व मोठ्यांदां हंसून ते पुढें म्हणाले, " नाहीं तरी मी सांगितला असता, तर कांहीं चहा केला नसतासच ! "

यावर मग ती मोठ्यांदां आंतूनच हंसली व म्हणाली,

" असं आहे होय ! माझ्यामुळें चहा मिळत असेल तर मग करा बाई थोडासा ! "

या प्रश्नोत्तरांवर मास्तरीणबाई कांहींच बोलल्या नाहींत. त्यांनीं संथपणें भांड्यांत साखर टाकली, व आधण ठेवलें. दुखऱ्या व रोगट शरीरयष्टीची मध्यमवयीन स्त्री नाहीं तरी आसपासच्या थट्टाविनोदांत कितीसा रस घेऊं शकणार !

थोडा वेळ जाऊं देऊन मग सुमती म्हणाली, " तुमच्या कपबशा व स्टेनलेसच्या थाळ्या आज दुपारीं लागतील आम्हांला ! "

चहाचें भांडें उतरवीत, मास्तरीणबाई नीरसपणें म्हणाल्या,

" आज दुपारीं कांहीं ' प्रोग्रॅम ' दिसतोय् ? "

" होय ना ! " ती मोठ्यांदां म्हणाली, " विष्णुभावजींचं लग्न ठरतंय् ! मुलगी आज दुपारीं येणार आहे. "

" होय का ? काय शिकलीय् मुलगी ? "

" एस्. एम्. सी. झालीय् गेल्या वर्षी. शिवाय हिंदीच्या परीक्षा ! "

" दिसायला कशी काय आहे ? "

" बरी आहे. " मान उडवून ती म्हणाली.

" बरीच का शेवटीं ? " चहाचा कप तिच्यापुढें ठेवीत मास्तरीणबाई म्हणाल्या.

" अहो, बरी आहे ! चांगल्या मुली सगळ्यांनींच कुठून आणायच्या ? आणि शिवाय ज्याचं माणूस त्याला आवडलं म्हणजे झालं ! "

" होऽतेंहि खरंच ! " मास्तरीणबाई हंसून म्हणाल्या, " शिवाय तुमच्या घरांत दुसऱ्या कुणाचंच तेज पडणार नाहीं." आणि पण थोडा वेळ जाऊं देऊन त्या पुढें म्हणाल्या, " आमच्या नात्यांतली एक मुलगी आहे. इंटर पास आहे. खर्चहि केला असता. पण तुम्हांला ती पसंत पडणार नाहीं, म्हणून मी सांगून आलें नाहीं."

मास्तरीणबाईंनीं केलेली स्तुति, मग तिच्या अंगप्रत्यंगात कालवली गेली, व ती मनस्वी सुखावली.

मास्तरांनीं बाहेरून सारें ऐकलेंच होतें. तरी त्यांनीं बायकोला विचारलें, " कुणाबद्दल म्हणतें आहेस ? "

" आमच्या नानाकाकांची तारी हो ! विष्णूला सांगून जाण्याबद्दल म्हणत होतें मीं."

" छेऽ ! तारी नसती शोभली तिथं. एक भाऊ मोठा झाला, म्हणजे दुसरे भाऊहि कर्तबगार निघतात. तसेंच घरांत एकदां सुंदर मुली करण्याची रीत पडली कीं, मग सर्वसाधारण मुलगी तिथं खपणं कठीण पडतं." असें म्हणून ते मोठ्यांदां हंसले. मास्तरांचें हें बोलणें ऐकून गुलाबपाण्याचा शिडकाव झाल्यासारखें तिला वाटलें. ती कांहींच बोलली नाहीं. मध्यम-वयीन स्त्रिया सुखावल्या कीं पदरानें वारा घेऊन तोंडानें श्वास घ्यायला लागतात. त्याप्रमाणेंच मग तिनें केलें.

स्वतःच्या सौंदर्याच्या त्या मनोरम साक्षात्कारांत मग ती उठली आणि बिऱ्हाडांत परत आली. तिला मनस्वी गंमत वाटत होती, कांहीं तरी गुण-गुणावें, मोठ्यांदां हसावें, किंवा बोलावें, अशी इच्छा होत होती. आपण कुणी तरी सुंदर राजकन्या आहोंत आणि आसपासचे सारे लोक आपल्या सौंदर्यावर लुब्ध असणारे आणि आपणांस मागणी घालण्यासाठीं टपलेले राजपुत्र आहेत, असा भास तिला झाला. त्या भासांत,— त्या स्वप्नांत, जणूं गुलाब-पुष्पाच्या शय्येवरून चालावें, तशी ती मग स्वतःच्या घरांत पोहोंचली.

बाहेरच्या खोलींत पोपटाचा पिंजरा टांगला होता. हिरवा हिरवा, तांबड्या चोंचीचा सुंदर दिसणारा पोपट ! तो पिंजऱ्यांत नाचत होता, आणि त्यामुळें साऱ्या खोलीभर सतारीच्या नाजुक बोलांप्रमाणें आवाज निनादत होते.

त्याच्याकडे पाहून ती थांबली, आणि स्वतःचे लालचुटुक ओठ पिंजऱ्या-जवळ नेऊन नि किंचित् वाकून म्हणाली, " पोपट, राघू—" आणि नंतर हंसून पुढें म्हणाली, " थांब हं ! तुला खाऊ देतें." कोपऱ्यांतल्या टोपलींत दोन पिवळेजर्द पेरू होते, त्यांतला एक हातांत घेऊन ती पिंजऱ्यावळ गेली, आणि तिनें तो पेरू पोपटासमोर धरला. पोपटानें चोंच मारायचा आविर्भाव करतांच, तिनें झटकन पेरू मागें घेतला, आणि चोंच पिंजऱ्याच्या तारांवर आदळली. त्यावर ती हंसली—मोठ्यांदां हंसली व टाळ्या वाजवीत म्हणाली, " कशी फजिती झाली ! " पण नंतर पुन्हां तिनें पेरू पोपटाजवळ नेला. या वेळीं मात्र तिनें पेरू मागें घेतला नाहीं, आणि मग पोपटाची ती लांबचलांब चोंच त्या मऊ लुसलुशीत पक्व फळाच्या अंगांत एकदम घुसली आणि त्यांतून गर गळायला लागला, त्याकडे बघून मग ती एकदम शांत झाली.

थोडा वेळ जाऊं देऊन मग ती पुन्हां पिंजऱ्याजवळ गेली व पिंजरा खालीं काढीत म्हणाली, " आपण आतां आंघोळ करूं हं " आणि पिंजरा मोरीवर नेला, आणि बादलींतील गार गार पाणी पोपटाच्या अंगावर ओतलें व लाडिकपणानें म्हणाली, " भुडुश्या !" यावर पोपटानें आपले पंख भिजून जोरांत फडकावले, तेव्हां तिला आणखीनच हंसू आलें, व तिनें पाण्याची चूळ तोंडांत घेऊन, त्याच्या कंठावर उडवली तेव्हां मग पोपटानें एकदम चित्कार केला. पुढें मग तिनें उलथनें हातांत घेतलें व ती पोपटाचा पिंजरा ओणव्यानें घासायला लागली. इतक्यांत विष्णु आंत आला पण पिंजरा घासण्याचें काम तिनें तसेंच सुरू ठेवलें. पिंजरा घासतांना आपल्या शरीराचा पार्श्वभाग ' आंबा पिकतो—रस गळतो ' हें पद गाऊन झिम्मा खेळणाऱ्या मुलींच्या अंगाप्रमाणें डौलदार रीतीनें झुलत आहे, हें तिला अंगाप्रमाणें कळत होतें, पण तिनें ती क्रिया तशीच पुढें चालू ठेवली.

दुपारीं जेवणं झाल्यानंतर वामनराव नि विष्णु बाहेरच्या कॉटवर

लवंडले नि ती फराळाची तयारी करण्यांत गढून गेली. चार-साडेचारला वाजतां तिनें मग स्वच्छ तोंड धुतलें आणि ठेवणींतलें नवें पातळ परिधान केलें. मग थोड्याच वेळांत घारपुऱ्यांची मंडळी आलीच. मुलगी अशी सडसडीत अंगाची नि हंसतमुख होती आणि तिच्याबरोबर वडील, दोन भाऊ आणि आई होती. मजल्यावरील साऱ्या खोल्यांच्या दरवाज्यांत नि खिडक्यांत बायका उभ्या होत्या आणि त्या घारपुऱ्यांच्या मुलीचें निरीक्षण करीत होत्या.

मंडळी आलेली बघतांच तिला मग एकदम उत्साह आला आणि तरातरा पुढें जाऊन ती मोठ्यांदां म्हणाली, " या ! " तेवढ्या वेळांत तिनें चोरट्या नजरेनें आसपासच्या बायकांकडे बघून नि हंसून घेतलेंच !

घारपुऱ्यांची मंडळी चांगली दोन अडीच तास बसली. हास्यविनोद, खाणींपिणीं झालीं. आणि लग्नाचें नक्की ठरलें. त्या सगळ्या वातावरणांत ती मात्र एखाद्या सम्राज्ञीप्रमाणें वागत होती. विष्णुभावजींची थट्टा करून नव्या नवरीचें नाना दृष्टिकोनांतून निरीक्षण करीत होती.

शेवटीं दिवेलागणी झाली आणि घारपुऱ्यांची मंडळी जायला निघाली. त्यांना पोहोंचविण्यासाठीं मग ती जिन्यापर्यंत गेली आणि तिथेंच मोठ्यांदां बोलत नि हंसत उभी राहिली. ती मंडळी गेल्यानंतर तिनें घराघरांतून उभ्या राहिलेल्या बायकांकडे बघून हास्य केलें व मास्तरीणबाईच्या बिऱ्हाडांत जाऊन म्हटलें, " बघितलीत ना, विष्णूची बायको ? "

मास्तरीणबाई संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागण्याच्या विचारांत होत्या. त्या म्हणाल्या, " बरी आहे ! मला आतां वाईट वाटतें, कीं हिच्यापेक्षां आमची तारी कितीतरी सरस ठरली असती."

" मी तेंच म्हणतें ? भाऊजींना मी म्हटलेंसुद्धां, कीं ' काय पण बायको निवडलीत ! ' "

" आणि शिवाय तुमच्या घरांत तर ती शोभायचीच नाहीं." मास्तरीणबाई म्हणाल्या व स्वयंपाकाला लागल्या.

या उद्गारानें जणुं तिला स्वतःच्या रूपाची पावती मिळाली व उत्साहित होऊन ती बाहेर पडली. नंतर बराच वेळ ती मजल्यावरच्या बिऱ्हाडांतून

हिंडत होती आणि आसपासच्या बायकांजवळ विष्णूच्या बायकोच्या रूपाची चिकित्सा करीत होती. नळावर पाणी भरतांना, अंथरुणें घालतांना, ती त्याच विषयावर बोलत, नि विचार करीत होती.

शेवटीं रात्रीचे साडेनऊ दहा वाजले आणि आसपासच्या बिऱ्हाडांतलें चैतन्य हळूहळू विझत गेलें. मग ती आंतल्या खोलींत जाऊन अंथरुणावर पडली. वामनराव खुर्चीत बसून डायरीमध्यें त्या दिवसाचा हिशेब लिहीत होते. त्यांचें तिच्याकडे लक्षहि नव्हतें. पडून रहाण्याचाहि मग तिला कंटाळा आला आणि उकडत असल्यामुळें अंगांतला ब्लाउझ काढून टाकून, नुसत्याच बॉडीनें ती खिडकीजवळ उभी राहिली. खिडकीजवळच्या मोठ्या आरशांत उठून दिसणारा स्वतःचा देह बघून मग ती जास्तच सुखावली आणि पाठीवरच्या पदरानें वारा घ्यायला लागली.

इतक्यांत वामनरावांचें हिशेब लिहिणें संपलेंच आणि त्यांनीं तिच्याकडे पाहिलें. उघड्या भरदार पाठीची तिची मांसल आकृति बघून त्यांच्या नसानसांतून रसिकपणाचीं कारंजीं उडालीं व त्यांनीं तिचा हात धरून तिला पलंगावर घेतलें.

त्यांच्याजवळ ऐसपैस निजत मग ती म्हणाली, " आज दिवसभर अगदीं गर्दीत गेला." आणि नंतर कुशीवर होत, ती पुटपुटली,

" कशी काय वाटली विष्णूची बायको ? "

हलक्या मधुर आवाजांत वामनराव म्हणाले, " बरी वाटली. तुला ? "

" मला नाहीं बाई आवडली. डोळे घारे, नि किती बारीक आहेत ! आणि शिवाय किडकिडीत तरी किती आहे ! "

" होय ना ! " ते हंसले व दिवा मालवीत पुढें म्हणाले, " साऱ्यांनाच कुठें सुंदर बायका मिळणार ? हा एक ' चान्स ' आहे." आणि मग एखाद्या गोजीरवाण्या गुबगुबीत पांढऱ्याशुभ्र सशाला थोपटावें, तसे ते तिला थोपटूं लागले.

थोपटतां थोपटतां, बराच वेळ गेला. हळूहळू त्या दोघांनाहि मजेदार, सुखकर अशी गुंगी आली, आणि मग तिला सारा दिवसभर व्याकुळ करणारा तिच्यांतील उन्माद एकदम विझून गेला.

* * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
शा. क्र. ..९४५६३ नों. दि. ३०।३।६४
वि. ९१-९१ ....................

# मोटार

: १ :

घराच्या पायऱ्यांवरून सायकल चढवतां चढवतां नेहमींप्रमाणें बापूनीं समोरच्या घराकडे पाहिलें. नानाचा दवाखाना आज बंद होता. नेहमीं या वेळीं समोरच्या दवाखान्यांत रोग्यांची वर्दळ उडालेली पहाण्याची बापूंना आज कित्येक वर्षांची सवय होती; त्यामुळें दवाखान्याचीं बंद दारें बघून त्यांना मनस्वी आश्चर्य वाटलें. तें आश्चर्य तसेंच मनांत घोळवीत त्यांनीं जिन्याखालच्या बोळकंडींत सायकल ठेवून तिला कुलूप लावलें, आणि मळकट काळ्या रंगाची चामड्याची वकिली पिशवी घेऊन ते जिना चढून वर गेले. वर बाहेरच्या खोलींत सारा अंधार होता. आतल्या स्वयंपाकघरांत दिवा लावला होता, आणि उमाची अस्पष्ट चाहूल ऐकूं येत होती. पण बाहेरच्या बैठकीच्या खोलींत अजूनहि संध्याकाळचा उदास अंधकार भरून राहिला होता. त्या अंधारानें मग त्यांचें मन जास्तच निरुत्साही झालें, आणि थोडा वेळ ते तसेच आरामखुर्चीवर बसले. पण असेच नुसते बसून किती वेळ रहाणार ? मग ते उठले, आणि त्यांनीं दिवा लावला.

अंधाराचा उजेड झाला, आणि बैठकीच्या खोलींतील कळाहीन, जुन्यापान्या वस्तू एकदम प्रकाशांत आल्या. वार्निश निघालेलें मोठें काळें नक्षीदार टेबल, जमिनीवर अंथरलेला ठिकठिकाणीं भोकें पडलेला क्वचित् कोठें शाईचा डाग असलेला गालिचा, टेबलाच्या कोपऱ्यावरील शेल्फमधील जुनींपानीं, पुठ्ठा उडालेलीं वकिलीचीं पुस्तकें, इत्यादि साऱ्या गोष्टी त्यांना एकदम दिसल्या, व त्यांचें सर्वांग शहारल्यासारखें झालें. त्यांनीं मग अंगांतला लांब काळा कोट नि टोपी खुंटीवर ठेवली, नि ते तसेच

खिडकीशीं उभे राहिले. घरांत भरून राहिलेला अंधार नि स्तब्धता स्वतः-पुढें नाक खाजवीत आहे, असें त्यांना उगीचच वाटलें, व त्यांची विमनस्कता शतपटीनें वाढली. खिडकींत उभ्या उभ्या ते समोरच्या रस्त्यावरील नानाच्या दवाखान्याकडे बघत होते. दवाखाना आज बंद होता, पण वर नानाच्या बिऱ्हाडांत निऑन लाईटचा मजेशीर सुखदायक प्रकाश पडला होता आणि चैत्रगौरीसारखी सजलेली, डोक्यांत गजरा घातलेली, गोरीपान, आडव्या अंगाची नानाची बायको इकडेतिकडे हिंडतांना दिसत होती.

त्या दृश्याकडे बघत, ते बराच वेळ कदाचित् उभे राहिले असते, पण इतक्यांत पाठीमागून चाहूल लागली, म्हणून त्यांनीं वळून बघितलें. स्वयंपाकघराच्या आणि बैठकीच्या खोलीच्या मधल्या दरवाजांत उमा उभी होती.

शान्त जड स्वरांत तिनें विचारलें, " केव्हां आलांत ? मी स्वयंपाकघरांतच होतें.

" आतांच आलों. आणि सहज खिडकींत उभा होतों. " त्यांनीं उत्तर दिलें, आणि उमाकडे बघितलें. घरांतील फर्निचरप्रमाणेंच ती त्यांना कळाहीन वाटली.

" थोडं इथेंच बसायचं ! मी चहा करून आणतें " ती म्हणाली, व आंत गेली.

दिवसभरांतील कोर्टांतील धावपळीमुळें खरें म्हणजे ते फार थकून गेले होते. स्वस्थ आरामखुर्चींत पडणें त्यांना आवडलें असतें, पण त्यांचें मन आज बेचैन होतें. त्या बेचैनींतच मग ते खोलींत उगीचच भिरीभिरी हिंडले. पगडी नि उपरणें घातलेला, नि किंचित् करडा नि उग्र दिसणारा त्यांच्या वडिलांचा फोटो हॉलमध्यें टांगलेला होता, त्याकडे मग ते बराच वेळ पहात उभे राहिले. त्या गांवांतील सर्वांत मोठी वकिलीची प्रॅक्टीस त्या वेळीं वडिलांची होती ! सारें वैभव नि मानसन्मान त्यांच्या पायांशीं त्या वेळीं लोळत होतें. फोटोंतील वडिलांचा चेहरा त्या वैभवाच्या बेहोषीनें रंगल्यासारखा त्यांना वाटला व ते खिन्न उदासपणें हंसले. वडिलांच्या शेजारींच डाव्या हाताला बापूंचा व उमेचा लग्नांतला फोटो होता. चोवीस-पंचवीस वर्षांपूर्वींची ती गोष्ट होती ! पण अजूनहि त्यांना ते चार दिवस

वाजलेले गाजलले लग्न, जेवणाच्या पंगती, रुसणींफुगणीं, वरात, नि रास-नहाणी सारें सारें आठवलें, व कसेंसेंच वाटलें. मग ते भिंतीपासून बाजूस सरले, नि रस्त्याजवळच्या खिडकीशेजारीं आरामखुर्चींत सुन्न बसून राहिले.

इतक्यांत चहा आलाच. चहा पिऊन कप खालीं ठेवीत त्यांनीं खिडकीच्या गजाला धरून बाहेर बघत उभ्या असलेल्या उमेला विचारलें, "काय बघते आहेस बाहेर!"

"कुठें! कांहीं नाहीं. उगाच रस्त्याकडे बघत आहे झालं!" ती म्हणाली, आणि मागें येऊन टेबलावरचा अडकित्ता नि सुपारी तिनें त्यांच्या हातांत दिली.

सुपारी कातरतां कातरतां मग तीं दोघेंहि रस्त्याकडे उगीचच बघत उभीं राहिलीं. संध्याकाळचे सात वाजून गेले होते, आणि आडबाजूला असलेल्या त्या रस्त्याची रहदारी मंद गतीनें वितळत चालली होती. डाव्या बाजूला समोर संसारोपयोगी चिल्लर जिनसांचें छोटें दुकान होतें, त्याचें गिऱ्हाईक संपलें होतें, आणि दुकानाच्या अर्ध्या अधिक फळ्या लागल्या होत्या. शेजारच्या देवळांतील संध्याकाळच्या आरती धुपारतीचा आवाज रस्त्यावरच्या शांततेमुळें लांबून कसासास वाटत होता. रस्त्याकडे बराच वेळ बघितल्यानंतर बापूंची अस्वस्थता जास्तच वाढली, आणि समोरच्या बाजूच्या नानाच्या बंद दवाखान्याकडे नजर टाकून त्यांनीं अगदीं सहज विचारलें, "आज दवाखाना बंद कसा?"

उमा अजूनहि बाहेर बघत होती, आणि कसल्या तरी नादांत होती. तिनें ऐकलें नसावेंसें वाटून पुन्हां त्यांनीं विचारलें, "काय ग? आज नानाचा दवाखाना बंद कसा?" आणि थोडा वेळ थांबून स्वतःशींच बोलल्यासारखें करीत ते म्हणाले, "नाहींतर यावेळीं त्याच्या दवाखान्यांत किती गर्दी उडालेली असायची!"

उमा खिडकींतून आंत आली, व समोरच्या टेबलावर अवघडल्यासारखी बसली, आणि हंसत हंसत म्हणाली,

"म्हणजे, तुम्हांला माहीतच नाहीं जसं कांहीं!"

"कशाबद्दल म्हणते आहेस तूं? मला कांहींच माहीत नाहीं."

" भावजींचा दवाखाना आज कां बंद आहे, असें तुम्हांला वाटतें?" त्यावर ते कांहीं बोलत नाहींत, असें पाहून ती पुढें म्हणाली, " आज ते मुंबईला गेले आहेत—मोटार आणायला!"

कांहीं तरी जड पदार्थ छातीवर पडावा, आणि वृत्ती पेंगळून जाव्यात तशा आविर्भावांत बापू मग आरामखुर्चींत मागें टेकले व म्हणाले, " मोटार आणायला?"

" होय ना! किती तरी दिवस त्यांचं मोटार घ्यायची घ्यायची असं चाललं होतं. शेवटीं पंधरावीस दिवसांपूर्वीच वाटतं त्यांनीं ऑर्डर दिली, नि आज सकाळींच ते मुंबईला गेले आहेत—मोटार आणायला!"

यावर बापू कांहींच बोलले नाहींत. आरामखुर्चींत डोळे मिटून ते स्वस्थ—सुन्न पडले होते, आणि मनःचक्षूपुढें ज्या निळ्या काळ्या, चकचकीत, करड्या रंगाच्या, लहानमोठ्या आकाराच्या हजारों मोटारी धांवत होत्या, त्यांचा आवाज ऐकत होते.

पण उमा बोलतच होती, " कालच दुर्गानं मला तें सांगितलं! तिला मात्र मोठा आनंद झालाय!"

तरीहि ते कांहीं बोलले नाहींत. त्यांच्या मनांतील कित्येक मोटारी आतां भयंकर जोरानें धांवत होत्या, आणि त्यांपैकीं कित्येकांमधून स्टार्ट होण्याच्या वेळच्या विचित्र गुरगुरल्यासारखाच आवाज ऐकूं येत होता.

एवढ्या वेळांत उमानें चहाचा कप आंत नेऊन ठेवला होता, व ती बाहेर आली होती. टेबलावरील एका जुन्या मासिकाचा अंक उगीचच चाळल्यासारखें करीत ती म्हणाली, " बाकी दुर्गीला आनंद होणें अगदीं साहजिकच आहे. मोटार—स्वतःची मोटार—ठेवावयाची म्हणजे कांहीं चेष्टा नाहीं" इतकें बोलून ती थांबली, व मंद हास्य करीत म्हणाली, " आपल्या घराण्यांत कांहीं कुणी मोटार ठेवली नसेल!"

" बाबांनीं बगी ठेवली होती! त्यांची प्रॅक्टीस जोरांत होती तेव्हां त्यांनीं मुद्दाम नव्या बांधणीची दोन घोड्यांची बगी विकत घेतली होती."

" आपलं लग्न झालं तेव्हा बगी होतीच कीं!" उमा म्हणाली, भारावल्यासारखें करून थोडा वेळ थांबली, व पुढें म्हणाली, " बाकी

मोटारीचा रुबाब कांहीं वेगळाच असतो ! ...भावजींनीं मोटार ठेवली याचाच मला फार मोठा आनंद वाटतो."

बापूंनीं बसल्याबसल्या तिच्या डोळ्याशीं डोळा भिडविला, व तिच्या अंतरंगांतील विचार समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तिचा चेहरा उतरून गेला आहे व ती कमालीची अस्वस्थ झाली आहे, असे त्यांना उगीच्चच वाटलें.

कांहीं तरी बोलायचे म्हणून ते पुढे म्हणाले, "अग त्यांत कांहीं नाहीं एवढंस ! हल्लीं ! प्रत्येक डॉक्टरजवळ मोटार असतेच." असें बोलून ते स्वतःच मोठ्यांदां हंसले, व फेऱ्या घालायला लागले.

पण हास्याचा आवेग ओसरला, आणि त्यांची त्यांनाच स्वतःच्या उद्गारांतील भेसूरता जाणवली. आपण उगीचच वेड्यासारखे हंसत होतों, असें वाटून ते जरा सौम्यपणानें म्हणाले,

"बाकी, तूं म्हणते आहेस तें खरेंच आहे. नानानें मोटार ठेवणें खरो-खरच त्याला 'क्रेडिटेबल' आहे."

"आणि साऱ्या पंधरा वर्षांत ! आपलें लग्न झालें तेव्हां ते कुठं मेडिकल कॉलेजांत नुकतेच गेले होते ! पंधरा वर्षांत त्यांनीं प्रॅक्टिसचा इतका जम बसविला, दुर्गाला दागिन्यांनीं इतकी सजविली, घर सुधारलं, नि आतां मोटार घेतली !"

यावर बापूंना कुठें तरी जखम झाल्यासारखें वाटलें व त्यांनीं उमाकडे बघितले. तीहि अंतर्यामांतून जखमीच आहे, हें ओळखून ते पुढें म्हणाले, "तसं म्हटलं, तर त्यांत विशेष कांहीं नाहीं. प्रॅक्टीसला सुरुवात केली, व त्यानें 'एक्स रे'च मशीन घेतलें, आणि त्याची बरकत व्हायला सुरुवात झाली."

"ती कशी काय ?"

"एक्स रे चें एक फॅड निघालं आहे ना हल्लीं ! पडसं नि खोकला झाला तरी माणूस 'एक्स् रे' काढून घेतो, आणि डॉक्टरला सरळ पंचवीस रुपये टकवतो. आहे कीं नाहीं मजा ?"

"कांहींहि म्हटलं तरी भाऊजींच्या अंगांत कांहींतरी गुण असणारच. त्याशिवाय कोण कोणाला पैसे देईल."

"ते खरं आहे. पण मी या डॉक्टरी धंद्याची मजा सांगितली. सरकारी नोकरांना रजेसाठीं खोटीं सर्टिफिकीटें देऊनच त्याला महिन्याकांठीं शे-दीडशें रुपयांची प्राप्ती सहज होत असेल."

"तुम्ही काय म्हणाल तें खरं!" उमा म्हणाली, व आंत जाऊन स्वयंपाकाला लागली.

बापू मग बाहेरच्या खोलींत आरामखुर्चीवर बराच वेळ तसेच बसून राहिले. मग कांहीं वेळानें ते उठले, नि खिडकींत उभे राहिले. नानाच्या घरांतील दिव्यांचा लखलखाट नि त्याच्या बायकोची—दुर्गेची—हालचाल उगीचच बघत राहिले. नंतर त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक, पण त्यांनीं कोट घातला आणि उमेला ओरडून म्हटलें, "मी जरा बाहेर जाऊन येतों ग!"

आंतूनच तिनें विचारलें. "आतां या वेळीं! कुठं जातां?"

"आगटे वकिलांकडे जाऊन येतों. एक पक्षकार तिथें यायचा आहे."

असें म्हणून ते बाहेर पडले. समोर नानाच्या घराच्या दरवाज्यांत त्याचा सात-आठ वर्षांचा मुलगा उभा होता, तो त्यांच्याकडे पाहून हंसला, म्हणून थांबून त्याच्याशीं बोलणें भाग पडलें.

नाटकी पद्धतीनें हंसत ते म्हणाले, "काय रे बाप कधीं येणार तुझा?"

तो मुलगा म्हणाला, "उद्यां सकाळीं!"

"आतां काय मजा आहे ना! मोटार येणार! आम्हांला बसवणार कीं नाहीं?" असें म्हणून ते स्वतःच मोठ्यांदा हंसले व उत्तर न ऐकतांच पुढें गेले.

ते मग बराच वेळ नुसतेच चालत राहिले. एका गोष्टीचें त्यांना फार आश्चर्य वाटलें! इतकीं वर्षें ते रस्त्यानें चालत होते, पण जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींबद्दल एकदांहि चुकूनसुद्धां त्यांच्या मनांत कधीं विचार डोकावला नव्हता. पण आज रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या मोटारींकडे ते अभावित-पणेंच निरखून बघत होते. तऱ्हेतऱ्हेच्या, निरनिराळ्या आकारांच्या, नानाविध चमकदार रंगांच्या मोटारी! पारव्या रंगाची ऐसपैस मोटार, काळ्या रंगाची आटोपशीर अंगाची मोटार, लाल चुटुक – एखाद्या

चिमुरडीसारखी दिसणारी छोटी मोटार ! निरनिराळ्या घाटणीच्या नि रंगाच्या सुंदर स्त्रियांप्रमाणें रस्त्यानें जाणाऱ्या मोटारी आज त्यांना भासत होत्या. चालतां चालतां, नानाच्या मोटारीचें एक चित्र त्यांच्या नजरेपुढें साकार झालें. त्याची मोटार कशी असेल ! खूप मोठी असेल का बारीक ? चारपांच माणसें सामावून नेणारी ऐटबाज पॅटर्नची असेल कीं —?... त्यांना वाटलें, त्याची मोटार मंद किरमिजी रंगाची आहे...त्याच्या हातांत चक्र आहे, आणि शेजारीं दुर्गा बसली आहे, नि मागें मुलांची किलबिल सुरू आहे !

त्या वातावरणांत तरंगतां तरंगतां ते आगटे वकिलांच्या घरापाशीं आले. आंत जावें कीं नाहीं याचा विचार करीत ते बराच वेळ बाहेरच उभे राहिले. आंत जावेसें वाटेचना ! आगटे वकील त्यांच्यासारखेच 'पडेल' वकील होते. प्रॅक्टिस चालवून प्रपंचाची गोळाबेरीज करतां करतां, त्यांचे पंचप्राण गोळा होत होते; नि त्यामुळेंच ते नेहमीं कावलेले—वैतागलेले असत. आंत जाऊन तेंच तेंच रडगाणें ऐकण्याची बापूंना अगदीं किसळ आली व ते तसेच पुढें निघाले.

पण पुढें कुठें जाणार ? त्यांना गर्दीच्या—विद्युद्दीपांनीं प्रकाशित झालेल्या रस्त्यांची एकप्रकारें भीति वाटत होती; म्हणूनच ते अंधाऱ्या रस्त्यांतून ठेचा खात चालले होते. चालतां चालतां ते एका मोकळ्या जागेपाशीं आले आणि तेथेंच कट्ट्यावर टेकले. पण मनःशान्ति लाभेना ! सारें आयुष्य आपणापुढें तोंडें वेडींवाकडीं करीत हंसत असल्यासारखें त्यांना वाटलें. त्यांचे वडील नाणावलेले वकील होते. आपली वकिलीची गादी पुढें चालविण्यासाठीं त्यांनीं मुद्दाम बापूंना वकिलीकडे घातले होतें. बापू शाळा-कॉलेजांत हुशार होते..... लेखक होते, ...वक्ते होते ! ते वकिली चांगली करतील अशी वाडिलांची खात्री होती. त्या वेळीं त्यांच्या मानानें नाना कुठल्या कुठें होता. धड ना हुषारी, ना वक्तृत्व, ना लेखन ! कांहींतरी शिकवावें म्हणून त्याला डॉक्टर केला. पण आज ! इतर कित्येक वकिलांप्रमाणें बापूंची वकिली भुईसपाट झाली होती, आणि तिकडे नानाच्या दवाखान्यांत रोग्याची सारखी वर्दळ वाढत होती, ...वकिली सोडून मास्तरकी करावी कीं काय या विचारांत बापू होते ! आणि नानू स्वतःची

मोटार आणायला मुंबईस गेला होता ! उद्यांउद्यांच सकाळीं त्याची नवी कोरी मोटार घरापुढें ऐटीनें उभी राहणार होती ! किरमिजी रंगाची मोटार...त्याच्या भाग्याची–वैभवाची ध्वजा असलेली ती मोटार. ती उद्यां सकाळीं येणार होती.

तें चित्र मग त्यांचें त्यांनाच टोचलें, व ते घरीं चालूं लागले. घरापाशीं आल्यानंतर समोरच्या नानाच्या घरांतील निऑन लाईटचा प्रकाश त्यांच्या दृष्टीला खुपला, व ते स्वतःच्या अंधाऱ्या घरांत शिरले. जिना चढतांना राहून राहून त्यांना समोरासमोरच्या दोन्ही घरांतील फरक जाणवत होता. वडिलांनीं समोरचें घर नानाला दिलें होतें–ती वास्तू आज वैभवाच्या झगझगाटांत होती. राहतें मोठें घर बापूंच्या वाट्याला आलें होतें. तें मात्र उदासवाण्या काळोखानें भरून गेलें होतें. तो काळोख दिवसानुदिवस जणूं वाढतच होता. तो कधींहि संपणारा नव्हता.

घरांत आल्यानंतर उमानें विचारलें, " जेवायचं आहे ना ? "

कोट काढतां काढतां ते म्हणाले, " नाहीं, आगटे वकिलांकडे आज खाणं झालं आहे. "

ते जेवणार नाहींत याची उमेला जणूं खात्रीच होती. पान वाढून घेत ती म्हणाली, " आगट्यांकडे आला होता का पक्षकार ? "

" होय ना ! त्यामुळेंच तर इतका वेळ लागला." बापू म्हणाले, व खोलींत गेले.

थोड्याच वेळानें उमाचें जेवण झालें, नि झाकापाक करुन ती बाहेर आली. अंथरुणें घालतांना ती म्हणाली, " तुम्ही गेल्यावर दुर्गा आली होती ! "

सुपारी कातरीत ते म्हणाले, " ती कशाला ? "

" उद्यां सकाळीं भाऊजी अकरा-साडेअकरा वाजेपर्यंत मोटार घेऊन मुंबईहून येतील, असं सांगायला आली होती. "

" असं का ? वा...आनंद आहे " बापू म्हणाले, व त्यांनीं झोंपण्याची तयारी केली.

अंथरुणावर उशा ठेवीत उमा म्हणाली, " खरंच आनंद आहे ! आपल्या घराण्यांत कुणी मोटार ठेवूं शकलें नाहीं–भावजीच ती ठेवूं शकले

याचं किती बरं वाटतं, नाहीं ? " असें म्हणून तिनें दिवा मालवला, व अंथरुणावर अंग टाकलें.

अंधाराकडे डोळे फाडून बघत बापू म्हणाले, " आणखी काय म्हणत होती, दुर्गा ! "

" हेंच, मोटारचंच सारखं चाललं होतं. म्हणे मुंबईहून तार आली आहे."

" कशाबद्दल ? "

" मोटारबद्दलच ! दुसरं कशाबद्दल ? " असें म्हणून ती कुशीवर वळली व म्हणाली, " गर्द हिरव्या रंगाची आहे म्हणे मोटार ! "

यावर बापू कांहींच बोलले नाहींत. थोडा वेळ जाऊ देऊन ती पुढें म्हणाली, " अगदीं नवीन मॉडेल आहे म्हणे ! चारपांच माणसं बसतील अशी टुमदार आहे."

जांभई देऊन बापू म्हणाले, " वाऽ छान ! आनंद आहे " आणि नंतर म्हणाले, " झोंपा आतां ! सकाळीं लवकर उठायच आहे."

परस्परांकडे पाठी करून मग ती दोघेंहि झोंपली. बापू जागेच होते, आणि त्यांच्या डोळ्यासमोर हिरव्या रंगाची टुमदार मोटार दिसत होती. उमाच्या शरीराचीहि चाळवाचाळव सारी रात्र चालली होती. मग ती झोंपली होती, कीं जागी होती कुणास ठाऊक !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यानंतर दोघांचींहि तोंडें मनस्वी उतरलीं होतीं, आणि दोन-तीन दिवसांचा ताप येऊन गेल्याप्रमाणें शरीरें आंबून गेलीं होतीं. पहिला चहा अगदीं निमूटपणें झाला. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें—बोलण्याची इच्छा नव्हती. आंघोळी झाल्या, नि दुसरा चहा झाला. चहा घेतां घेतां उमा म्हणाली, " साडेआठ वाजले. भावजी यायला अजून तीन तास तरी आहेत नाहीं का ? "

" होय ना ! " बापू म्हणाले, व त्यांनीं समोरच्या घराकडे चोरून बघितलें.

नंतर पुन्हां तीं दोघें स्तब्ध बसलीं. मिनिटांमागून मिनिटें जणूं जळत चालली होतीं, आणि त्यांच्या चितेकडे बापू टक लावून बघत बसले होते-अशींच पंधरावीस मिनिटें गेलीं, आणि नंतर त्यांनीं शरीराला आळोखे.

पिळोखे दिले. मग थोडा वेळ सुस्त बसून, एखादी गोष्ट नव्यानें आठवावी तसा चेहरा करून ते म्हणाले, " खरंच ! एक सांगायचं विसरलोंच. सगळाच घोटाळा झाला."

" काय झालं ? " उमेनें विचारलें.

" काल रात्रीं आंगठ्याकडे तो एक पक्षकार आला होता ना ! त्याची जागा बघायला आजच आम्हांला सासवडला जायला पाहिजे."

यावर उमा कांहींच बोलली नाहीं. नुसतीच खालीं मान घालून ऐकत उभी राहिली.

थोडा वेळ जाऊं देऊन बापूच पुढें म्हणाले, " मी खूप सांगून बघितलं पण उपयोग झाला नाहीं. खुद्द कोर्टच आज सासवडला येणार आहे. मला आज सकाळीं जायलाच पाहिजे."

" पण भाऊजींना वाईट वाटेल ! नवी मोटार घेऊन ते तुमच्या पाया पडायला येणार..."

" होय ना ! पण काय करायचं ? " बापू म्हणाले व झपाट्यानें उठून कपडे घालायला लागले.

कोट घालून नि वकिली बॅग हातांत घेऊन ते म्हणाले, " आणि हें बघ, तूं तरी इथं थांबून काय करणार ? तूं जा माहेरीं, आजचा दिवस. संध्याकाळीं मी न्यायला येईन."

हें बोलत असतांना ते जिन्याच्या चौकटींत आले होते. खालच्या पाय-रीवर पाय ठेवून ते पुढें म्हणाले, " नानाला वाईट वाटेल, पण इलाज नाहीं. संध्याकाळीं मी आलों कीं आपण दोघें तिकडे जाऊन त्याचं अभिनंदन करूं."

इतकें बोलल्यानंतर त्यांचें त्यांनाच शरमल्यासारखें वाटलें, व ते झपाट्यानें पायऱ्या उतरून खालीं आले. समोरच्या घराच्या खिडकींत दुर्गा तलम गर्भरेशमी लुगडें नेसून नि डोक्यांत पांढऱ्या शुभ्र फुलांची वेणी घालून उभी होती आणि लांब दूरवर नवीन मोटार दिसते का तें पहात होती. तिचें आपणांकडे लक्ष जाईल व ती कांहीं विचारील, या भीतीनें बापूंचें अंग मनस्वी शहारलें व चोरट्या पावलांनीं ते पलीकडच्या रस्त्याला लागले.

★ ★ ★

२८८१८
का. वा.
१५८०
२।७।५९

## : १० : निळें प्रेमपत्र

दुपारची झोंप झाल्यावर बाबासाहेबांनीं कांहीं वेळ इकडे तिकडे केलें आणि चहा झाल्यानंतर कपडे करून ते कोपऱ्यावरच्या बंगल्यांतील ब्रीजच्या अड्यांत खेळण्यासाठीं म्हणून बाहेर पडले.

दिवाणखान्याचें दार लावून घेत त्यांनीं सुनेला ओरडून सांगितलें, "मंदाकिनी, मी क्लबांत जाऊन येतों ग !"

घरांत खालच्या बाजूला कोणींच नव्हतें. बाबासाहेबांची बायको चहापाणी करून पुराणाला गेली होती आणि धाकटा मुलगा कॉलेजच्या जिमखान्यावर गेला होता. वरच्या दिवाणखान्यांत मंदाकिनी पलंगावर अस्ताव्यस्त पडून एक इंग्रजी मासिक चाळत होती आणि मधूनच एखादें पदहि गुणगुणत होती.

पहिल्या हांकेला कांहींच उत्तर न मिळाल्यामुळें बाबासाहेबांनीं परत मोठ्यांदां हांक मारली तेव्हां ती झटकन् उठली व केंसाच्या बटा सांवरीत जिन्यावरून खालीं येत म्हणाली, "काय बाबा ?"

"अग, मी जरा क्लबांत जाऊन येतों घरांत कोणी नाहीं म्हणून तुला मुद्दाम सांगितलं"

गाण्याची एखादी लकेर सोडावी त्याप्रमाणें किंचित् किनऱ्या आवाजांत ती म्हणाली, "बरं !" आणि एखादी गोष्ट आठवल्याप्रमाणें करून तिनें विचारलें, "पोस्टमन आला होता ?"

तिच्याकडे पहात बाबासाहेबांनीं सांगितलें, "नव्हता बुवा" आणि पुढें किंचित् हंसून म्हटलें, "आज प्रभाकराचें पत्र यायचा वार दिसतोय" इतकें बोलून ते स्वतःशींच खो खो हंसले व पुढें चालायला लागले.

चालतांना मात्र त्यांना मंदाकिनीचें दरवाज्याच्या कडांना दोन्हीं हात ठेऊन उभें असलेलें आणि मधूनच केसांच्या अवखळ बटा सावरणारें रूप आठवत होतें आणि गंमत वाटत होती. अलिकडे कित्येक दिवस त्यांना स्वतःच्या मुलाबद्दल, त्याच्या देखण्या बायकोबद्दल व त्यांच्या नव्या संसाराबद्दल जें औत्सुक्य वाटत होतें, तें आज खूपच वाढलें होतें. त्यांना वाटलें कीं, 'या नव्या पोरांची काय मौज असते! त्यांना चांगल्या बायका मिळतात, त्या देखण्या असतात आणि फॅशनेबलहि असतात. त्या सुशिक्षित असल्यामुळें बरोबरीनेंहि वागतात.' चालतां चालतां त्यांना असेंहि वाटलें कीं, या नव्या मुलींच्या शृंगाराला कांहीं निराळीच चव असेल. आपल्या जुन्या आबाळलेल्या अशिक्षित बायकांपेक्षां या नवीन मुली त्यांच्या रंगदार संसारांत कितीतरी मादकता आणीत असतील! अलीकडे कांहीं दिवस त्यांच्या डोक्यांत हे विचार होतेच; परंतु आज ते जास्तच प्रकर्षानें त्यांना जाणवत होते. चालतां चालतां मुलाच्या ताज्या संसाराच्या तुलनेनें स्वतःच्या जुन्या संसारांतील वैषम्य मग जास्तच त्यांना जाणवलें व आयुष्यांतील एक फार मोठी मौज आपणांस मिळाली नाहीं या विचारानें ते व्यथित झाले.

आठदहा पावलें ते तसेच पुढें गेले आणि त्यांना समोरच्या बाजूनें येणारा दुपारच्या डाकेचा पोस्टमन दिसला. बाबासाहेबांना बघून तो थांबला आणि म्हणाला, "डाक इथंच घेतां कां बंगल्यांत टाकूं?"

"दे कीं इथंच" ते म्हणाले आणि स्वतःशींच पुटपुटले, 'बघूं तरी काय काय पत्रं आहेत तीं.' पोस्टमननें मग दोनतीन पत्रांचा एक जुडगा त्यांच्या हातांत दिला आणि तो पुढें गेला. बाबासाहेब रस्त्याच्या कडेलाच उभे राहून पत्रें चाळायला लागले. त्यांतलें एक वेदांतविषयक पाक्षिक होतें. दुसरें एका सार्वजनिक संस्थेचें कसल्यातरी सभेचें निमंत्रण होतें. तिसरें पोस्टकार्ड सासरीं असलेल्या थोरल्या मुलीची खुशाली कळवत होतें. चौथें मात्र एक ऐटबाज आणि गोंडस आकाराचें निळें पाकिट होतें आणि त्यावर मंदाकिनीचा पत्ता इंग्रजींत लिहिलेला होता. बाहेरगांवीं बदलून गेलेल्या व दर पंधरा दिवसांनीं बायकोला भेटायला येणाऱ्या प्रभाकराचें तें प्रेमपत्र होतें हें उघड होतें.

पत्रें खिशांत घालून बाबासाहेब ब्रीजच्या अड्ड्यावर गेले, पण तिथें फक्त चारच लोक होते आणि त्यांचा डाव नुकताच सुरू झाला होता. आकाशांत मळभ आलें होतें व तो कसल्यातरी सणाचा दिवस असल्यामुळें आणखी कोणी येण्याची शक्यताहि नव्हती.

थोडा वेळ त्यांनीं मग नुसताच डाव बघितला. पण त्यांत मन रमेना! त्यांत त्यांना रस वाटेचना. मग ते तिथेंच आरामखुर्चीवर लेटले आणि पांचदहा मिनिटें तसेच पडून राहिले. पण तरीहि वेळ जाईना म्हणून मग एकदम आठवल्यासारखें करून त्यांनीं खिशांत हात घातला, टपाल बाहेर काढलें व जांभया देत वेदान्त विषयक पाक्षिक ते चाळत बसले.

पांचदहा मिनिटें तशीच गेलीं. त्यांनीं पाक्षिक दुसरीकडे ठेवलें आणि मुलाकडून सुनेला आलेलें तें पाकिट हातांत घेऊन त्याकडे उगाचच पहात बसले.

तें निळें पाकिट मोठें झोकदार दिसत होतें आणि आकाशांत नक्षत्रें चमकावींत तशीं प्रभाकराचीं, वळणदार इंग्रजी अक्षरें त्यावर शोभत होतीं. एखादें तलम उंची वस्त्र हात लावून चाचपावें तसें त्यांनीं मग अगदीं हलक्या नाजुक हातांनीं तें पाकिट चांचपलें व सुकुमार कळीचा वास घ्यावा त्याप्रमाणें तें सुंदर नि मनोहर पाकीट नाकाशीं धरलें. आश्चर्याची गोष्ट होती; कारण त्या लिफाफ्याला खरोखरच मादक व मधुर असा वास येत होता. केवड्याच्या पिवळ्या धमक पात्याला यावा तसा! तरुण स्त्रीच्या आसमंतात भासावा तसा! त्या गंधानें त्यांचें मस्तक एकदम वेडें झालें; केवड्याच्या पानासारखा उग्र गंध मग त्यांच्या सर्व अंगांत भिनला आणि त्यांनीं खूप जोरानें—खूप हांवरेपणानें—त्या पाकिटाचा वास घेतला व इकडे तिकडे एकदम चपापून बघितलें.

खोलींत सारें कसें शांत होतें, त्या चौघांचा डाव रंगांत आला होता आणि त्यांच्याकडे कुणाचेंच लक्ष नव्हतें.

त्यांनीं मग पुन्हां एकदां त्या लिफाफ्यावरून हात फिरवला व त्यांना एकदम इच्छा झाली कीं, त्या पाकिटाची गांठ अगदीं हलक्या हातानें सोडावी आणि आंतल्या मजकुरांत चोरट्या नजरेनें डोकावून बघावें.

स्वतःच्या मनांत ही अशिष्ट संस्कृतीहीन कल्पना उत्पन्न झाल्याबद्दल त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं कांहींशा भीतीनें आसपास पुन्हां एकदां बघितलें. त्यांच्याकडे खरोखरच कुणाचें लक्ष नव्हतें ! कोणालाच त्यांच्या मनांतील 'पापी' विचारांचा पत्ता नव्हता ! तें तलम नी निळसर पत्र त्यांच्या पुढ्यांत मांडीवर पडलें होतें. आणि डोळे किलकिले करून त्यांची वासना जागृत करीत होतें. हलक्या हातानें पाकिटाची निरगांठ सोडण्याचेंच तेवढें बाकी उरलें होते आणि मग आंत दडलेली चंदेरी दुनिया त्यांना गवसणार होती. क्षणभर मग त्यांचा वृद्धक्षीण हात त्या मादक सुगंधी पाकिटावर थरथरला आणि तो चपापून मागें घेतला. तें पाकिट फोडायचें असेल तरी इथें फोडणें बरें नव्हे असें त्यांनीं ठरविलें व ते हलक्या पावलांनीं कांहीं आवाज न करतां तेथून बाहेर सटकले.

ते घरांत शिरले तेव्हां दिवे लागले होते. आणि बाहेरच्या दिवाण-खान्यांत त्यांची बायको फरशीवर बसून कांहीं काम करीत होती व मंदाकिनी आराम खुर्चीवर बसून वाचत होती. कोट काढून ठेवतांना त्यांनीं चोरट्या नजरेनें मंदाकिनीकडे बघितलें तेव्हां ती फार अस्वस्थ असल्याचें त्यांच्या एकदम लक्षांत आलें. ती वाचण्याचें ढोंग करीत आहे परंतु तिची मनस्वी निराशा झालेली आहे हें त्यांच्या अधु, वयस्कर डोळ्यांनीं तेव्हांच ताडलें आणि कांहींच न बोलतां ते राऊंड टेबलापाशीं बसून पेपर वाचा-यला लागले.

पांच-दहा मिनिटें तशींच गेलीं व मग त्यांच्या बायकोनें त्यांना एकदम विचारले, "आज संध्याकाळीं पोस्टमननें सूनबाईचं एखादं पत्र आणून दिलं का ?"

वाचतां वाचतां एकदम ते चमकले व सावरून बसले आणि क्षणार्धांत त्यांनीं सूनबाईकडे व स्वतःच्या वयस्कर बायकोकडे टवकारून पाहिलें. त्यांना क्षणभर भास झाला, कीं त्या दोघीहि त्यांच्याकडे विशिष्ट नजरेनें रोखून बघत आहेत—एखाद्या गुन्हेगाराचा झाडा घ्यावा तसा—नुसत्या नजरेनेंच त्यांचा घेत आहेत.

त्या दोघींची नजर चुकवून ते सहज बोलावें तसें म्हणाले, "नाहीं बुवा ! कुणाचं यायचं होतं ?"

यावर मंदाकिनी कांहीं बोलली नाहीं पण त्यांची बायकोच आक्रसताळी-पणानें म्हणाली, " कुणाचं यायचं होतं म्हणजे काय ? प्रभाकराचं पत्र यायचा आजचा दिवस नाहीं का ? "

ते मुद्दामच मोठ्यानें हंसले आणि मंदाकिनीकडे बघून म्हणाले, "नसेल आलं झालं. अगदीं दर आठवड्याला पत्र पाठवलंच पाहिजे असं थोडंच आहे ?" आणि मग ते पुन्हां एकदां हंसले. त्यांचें गमतीचें बोलणें त्यांच्या बायकोला कळणें शक्यच नव्हतें. सारा जन्म त्यांच्याबरोबर काढून तिला कधीं कांहीं कळलेंच नाहीं. परंतु मंदाकिनी तरी हंसेल अशी त्यांची कल्पना होती. पण तीहि हंसली नाहीं. त्यामुळें रात्रीच्या शांत वेळचें स्वत:चें हंसणें त्यांचें त्यांनाच भुतासारखें वाटलें आणि ते एकदम गप्प बसले.

रात्रीचीं जेवणें झाल्यावर मंदाकिनी तिच्या खोलींत झोंपावयास गेली आणि बाबासाहेब नुसतेच कॉटवर पडले. ती वेळ पत्र वाचण्यास उत्तम होती. कारण त्यांची बायकोहि स्वयंपाकघरांत देवाजवळ कांहीं तरी म्हणत बसली होती.

मग ते हलक्या पावलांनीं उठले व खुंटीवरील कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवलेलें तें निळसर मुलायम पाकिट घेऊन व त्याला उशीवर ठेवून कांहीं वेळ नुसतेच त्याच्याकडे पहात बसले. मग त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक पण अंथरुणावर पडलेल्या एखाद्या तरुण स्त्रीला जवळ घेऊन हलक्या–अगदीं हलक्या हातानें थोपटावें तसें ते पांचदहा मिनिटें त्याला थोपटत राहिले. त्यानंतर त्यांनीं तें पाकिट उचलून हातांत धरलें आणि एखादी गांठ सोडावी तसें तें निळें पाकीट फोडावयास लागले. त्यांनीं तें थोडेसें कुरतडलेंहि. पण इतक्यांत त्यांना बायकोची चाहूल लागली. आणि एखादी भयंकर गोष्ट लपवावी त्याप्रमाणें त्यांनीं झटकन् तें पाकिट दोन गुबगुबीत उशांच्यामध्यें लपविलें व धडधडत्या छातीनें एकदां मागें वळून पाहिलें. आणि चिडखोरपणानें म्हणाले, " काय ग ? "

ते चिडले आहेत हेंहि त्यांच्या पत्नीला कळलें नाहीं–जन्मभर त्या बिचारीला कांहीं कळलेंच नाहीं–ती म्हातारपणानें कापऱ्या झालेल्या आवाजांत म्हणाली, " औषध घेतलंत का ? रात्र कोण झाली आहे " व नंतर हॉलमधल्या मोठ्या दिव्याकडे बघून ती पुटपुटली, " आणि दिवाहि

कोण ढणढणा जळतोय? मग तिनें दिवा मालवला व एकदम अंधार केला. बाबासाहेबांना औषध दिलें व म्हटलें, " निजावं आतां. "

निळ्या पाकिटाविषयींची उत्सुकता अगदीं शिगेला पोहोंचली होती. स्वतःच्या बायकोच्या मूर्खपणाविषयींची खंत मनस्वी वाढली होती. एकदम रागानें ओरडून ते म्हणाले, " दिवा कशाला मालवलास तूं?......मला झोंप येत नाहीं."

" त्या दिव्यानंच नसेल येत मेली झोंप " स्वतःच्या पलंगावर पडल्या पडल्या ती म्हणाली, " स्वस्थ पडून रहा, फार तर राम राम म्हणा, लागेल झोंप थोड्या वेळांत. "

त्या मूर्ख बाईशीं बोलण्यांत अर्थच नव्हता! त्यामुळें ते स्वस्थ पडून राहिले. ती पुढें स्वतःच्या पलंगावरून कांहीं ना कांहीं बोलतच राहिली. कुणाच्या तरी डोहाळजेवणाबद्दल आणि मंगळागौरीबद्दल व बऱ्याच वर्षांपूर्वी कुठल्या तरी लग्नांत झालेल्या अपमानाबद्दल, ती बोलतच राहिली. तें बोलणें त्यांना ऐकूं येत होतें पण कळत नव्हतें. निळ्या तलम आवरणाआड लपलेलें तें प्रेमपत्र त्यांना सारखें अस्वस्थ करीत होतें. त्या पत्राच्या पार्श्वभूमीवर त्यांना प्रभाकर दिसत होता, मंदाकिनी दिसत होती आणि टेलिव्हिजनवरून बघावें त्याप्रमाणें त्यांचा शृंगार अगदीं स्पष्ट दिसत होता. त्या उन्मत्त शृंगाराच्या नुसत्या काल्पनिक दर्शनानेंहि ते भ्रांतचित्त झाले.

उशाखालचें तें पत्र त्यांना स्त्रीच्या वक्षस्थळाप्रमाणें सारखें टोचत होतें आणि त्यांतील मजकुराबद्दल उत्सुकता वाढत चालली होती. त्यांना वाटत होतें ' हीं तरुण पतिपत्नी एकमेकांना पत्रांतून काय लिहीत असतील? काय संबोधत असतील? त्या पत्रांमधून कोणत्या प्रसंगांचीं रसभरीत वर्णनें असतील? त्यांतील शब्दरूप शृंगार अगदीं निःशंक असेल कां? तोहि आपण बाहेरच्या जगांत वावरतांना विचारविकारांपासून उच्चार नि आचार लपवून ठेवतों त्याप्रमाणें चोरटा असेल?

अंथरुणावर पडल्या पडल्या त्यांनीं मग त्या प्रेम-पत्रांच्या स्वतःच्या मनांतील कल्पनांची उजळणी करण्यास सुरुवात केली. आणि त्यांच्या लक्षांत आलें, कीं इतकें सर्व आयुष्य वाहून गेलें पण अद्याप त्यांनीं खरें

खरें–अगदीं वास्तव जगांतलें प्रेमपत्र अजूनहि बघितलेंच नव्हतें. त्यांनीं कधीं कुणाला प्रेमपत्र पाठवलेंच नव्हतें नी त्यांनाहि कुणी तसलें पत्र पाठवण्याचा संभव नव्हता.

क्षणार्धांत त्यांच्या डोळ्यापुढून एकदम सारें आयुष्य सरकून गेलें आणि त्यांतील कुरुपपणा त्यांना खुपला. पलिकडच्या कॉटवर त्यांची पत्नी निजली होती, तिच्याबरोबर त्यांनीं नाहीं म्हटलें तरी २५–३० वर्षें संसार केला होता, परंतु तो संसार आगगाडी वेळापत्रकाप्रमाणें अगदींच रुखरुखीत नी गद्य होता.

विचारांच्या आवेगामुळें त्यांना आज झोंप येणें शक्यच नव्हतें. त्यांना एकदां वाटलें, कीं दिवा लावावा आणि पत्र वाचून टाकावें. परंतु बायको उठेल या भीतिनें ते अंधारांत तसेच पडून राहिले. कादंबऱ्यांतून, लघु-कथांतून त्यांनीं अविवाहित तरुण-तरुणींनीं एकमेकांना पाठविलेल्या अनेक प्रेमपत्रांचे तर्जुमे बघितले होते नि त्या त्या वेळीं त्यांना ते आवडलेहि होते. परंतु त्यांच्या व्यवहारी, अनुभवी व पोक्त दृष्टीला आज वाटलें कीं, अविवाहित अवस्थेंतील तीं पत्रें प्रेमपत्रेंच नव्हत. त्यांत विवाहितांमधील तो निशंःकपणा नी मनमोकळेपणा असणें शक्यच नाहीं.

तें निळें पत्र हातांत घेऊन त्यांना वाटलें कीं विवाहीत नि तरुण स्त्री-पुरुषांनीं एकमेकांना लिहिलेल्या पत्रांत खरोखर मौज असेल ! त्यांत परस्परांच्या शरीरांची–नग्न विवस्त्र–शरीरांचीं नक्कीच वर्णनें असतील ! परस्परांनीं उपभोगलेल्या कांहीं वेचक प्रसंगांचें वर्णन लज्जदार भाषेंत नक्कीच केलें असेल ! ते प्रसंग चार भिंतींच्या आड रात्रीच्या अंधारांत वा निऑन लाईटच्या मादक निळसर प्रकाशांत दुलईखालीं किंवा विवस्त्र अवस्थेंत भोगले जात असतील नी बाह्य जगाला जे नेहमीं अज्ञातच राहिलेले असतील, ते प्रसंग त्या पत्रांतून नक्कीच साकारलेले असतील. हातांतलें तें पत्र वाचलेंच पाहिजे असा मोह त्यांना झाला परंतु सारी रात्र ते तसेच पडून राहिले.

हळूहळू रात्र सरत गेली नि पहांट झाली. बाबासाहेब जड डोळ्यांनीं नी दुखऱ्या अंगानें उठले. चूळ भरून मोठा दिवा त्यांनीं लावला व ज्ञानेश्वरी मोठें पुस्तक हातांत घेऊन त्यांत त्यांनीं तें निळें पाकीट लपवून ठेवलें. नंतर

कांहीं वेळ तसाच जाऊं देऊन त्यांनीं चाळिशी लावली व उदबत्ती लावून नेहमींप्रमाणें एकदोन ओंव्या मोठ्यानें वाचल्या आणि शेवटीं वातावरण अगदीं शांत झाल्यासारखें वाटलें तेव्हां त्यांनीं हलक्या नाजुक हातांनीं त्या पाकिटांतून पत्र काढून वाचण्यास सुरुवात केली.

त्यांना कल्पना होती त्यापेक्षांहि त्या पत्रांत बरेंच कांहीं जास्त होतें. त्यांनीं वाचलेलें तें पाहिलें प्रेमपत्र खरोखरच सुंदर नि लज्जतदार होतें. त्यांत प्रभाकरानें मंदाकिनीला प्राणप्रिये वगैरे विशेषणांनीं संबोधलें नव्हतें. तर नुस्तेच, ' हलकटे, मंद्या,.. गध्या....गाढवा असें म्हटलें होतें व नंतर गेल्या आठवड्यांत त्यानें ज्या दिवशीं तिला सोडलें त्या रात्रीच्या दोघां-मधील शृंगाराचें आणि विषयसेवनाचें मनमोकळें आणि निःशंकपणानें वर्णन केलें होतें. खोलींत केलेला तो सारा शृंगार—नग्न शृंगार—दोन तरुण नी निरोगी माणसांनीं केलेली ती क्रीडा त्यानें अगदीं कोणताहि आडपडदा न ठेवतां साकार केली होती.

बाबासाहेब वाचत होते आणि त्या विषयरसाच्या वर्णनांत आकंठ बुडून गेले होते. ते वाचत वाचत पुढें चालले आणि अनेक प्रसंगांची मौज लुटत शेवटच्या परिच्छेदापर्यंत आले.

त्यांत प्रभाकरानें लिहिलें होतें " हें पत्र शुक्रवारीं तुझ्या हातांत पडेल. त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे शनिवारीं दुपारीं येथून निघून रात्रीं तेथें येत आहे. दोन-तीन दिवसाची रजा अकल्पितपणें मिळाल्यानंतर तिचा पुरेपूर उपयोग करून घ्यावयास नको कां ? "

पुढें त्यानें त्या दिवशीं रात्रीं भोगावयाच्या प्रसंगांचें दिलखुलास वर्णन केलें होतें. आणि लिहिलें होतें, " शनिवारीं रात्रींचा हा कार्यक्रम तुला मान्य व्हावा. तो मान्य आहे असें पत्र तुला मला पाठवायला सवड नाहीं तरी मी रात्रीं ज्यावेळीं बंगल्यांत पाऊल टाकीन व तुझें दर्शन होईल त्यावेळीं तूं डोक्यांत पिवळ्या गुलाबाचें फूल घालावेंस व या नोट पेपर-माख्याच निळ्या रंगाचा ब्लाऊज घालावास. ही मान्यतादर्शक खूणच समज. ही खूण असली कीं किल्ला सर झाल्यासारखा मला वाटेल. "

पत्र संपलें आणि बाबासाहेबांनीं इकडे तिकडे बघितलें. आतां स्वच्छ उजाडलें होतें आणि घरांत चहाची गडबड सुरू झाली होती. ते नुसतेच

बसलेले पाहून आंतून मंदाकिनीनें चहाचा ट्रे आणला व ती कांहीं तरी म्हणाली.

पण तिचें बोलणें त्यांच्या लक्षांत आलेंच नाहीं. त्यांच्या पुढ्यांत पांचवारी पातळ नेसलेली मंदाकिनी उभी होती. परंतु खरें सांगायचें म्हणजे त्या तलम अंगाच्या निळ्या पत्रांत शब्दरूप झालेली मंदाकिनीच त्यांना दिसत होती. ते कांहींच न बोलतां चहा प्यायले.

शनिवारचा तो दिवस मग तसाच जड पावलांनीं सरकत गेला. हळूंहळूं जेवणें झालीं. दुपारचा चहा झाला आणि संध्याकाळचे सात वाजले. बाबासाहेब अस्वस्थ होऊन दिवाणखान्यांत फेऱ्या घालीत होते. त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणालाच प्रभाकर त्या दिवशीं येणार असल्याचें माहीत नव्हतें व तेहि कोणाला सांगूं शकत नव्हते.

हळूंहळूं रात्र झाली आणि गाडीची वेळ व्हायला आली. त्यांनीं मंदाकिनीकडे पाहिलें. ती स्वस्थच होती. तिच्या अंगांत निळा ब्लाऊजहि नव्हता, डोक्यांत पिवळ्या गुलाबाचीं फुलेंहि नव्हतीं. त्यांना वाटलें—फार वाटलें—कीं एकदम ओरडावें व तिला गुलाबाचें फूल डोक्यांत घालण्यास सांगावें. पण ते तसें सांगूं शकत नव्हते. गप्प रहाणें त्यांना भागच होतें.

थोड्याच वेळांत नऊ वाजले नि दारांत टॅक्सी उभी राहिली. उत्तम सुटांतील प्रभाकर सूटकेस घेऊन खालीं उतरला व घरांत आला. पहिल्यांदा त्याला मंदा दिसली आणि त्याची एकदम निराशा झाली. तिच्या डोक्यांत फूल नव्हतें.....तिचा ब्लाऊजहि निळा नव्हता !

त्याची निराश मुद्रा पाहून बाबासाहेबांना मौज वाटली व त्यांनीं त्याला विचारलें " हें रे काय ? आज एकदम ? गेल्याच आठवड्यांत तूं गेलास ! एखादं पत्र तरी पाठवायचं होतंस ! "

त्यानें आश्चर्यानें मंदाकिनीकडे बघत विचारलें, " माझें पत्र मिळालें नाहीं ? काल दुपारींच तें मिळायला हवं होतं. "

कोणीच कांहीं बोललें नाहीं तेव्हां मग बॅग खालीं ठेवून तो खुर्चीवर बसला. त्यानें उंची सूट घातला होता. परंतु त्या निळ्या पत्रांत चित्रित झालेलें—आणि जन्मदात्या पित्यालाहि इतके दिवस अगम्य राहिलेलें त्याचें रूपच बाबासाहेबांना दिसत होतें.

◎ ◎ ◎

## : ११ : घाटपांडे

रविवारची सारी सकाळ गांवभर हिंडून घालविली, आणि जरा उशीराच घरीं परत आलों. आंघोळीला जाण्याच्या अगोदर सहज म्हणून बायकोला विचारलें, " कुणी आलं होतं का ? "

" कोणीहि नाहीं ! कोणी यायचं होत का ? " तिनें विचारलें व ती परत स्वयंपाकाला लागली.

" यायचं नव्हतं कुणीच. आपलं सहज विचारलं." मी बाथरूममध्यें जात जात म्हणालों.

बाथरूममध्यें पाण्याचा मोठा नळ सोडला, आणि नंतर आठवलें कीं, साबण संपला आहे, साबण आणण्यासाठीं मग मी पुन्हां स्वयंपाकघरांत आलों.

नव्या साबणवडीचें टरफल काढून त्याचा पहिला सुवास घेत असतांना ती किंचित् हंसत म्हणाली, " खरंच. मी विसरूनच गेलें होतें. एक जण आला होता."

आश्चर्य वाटून मीं विचारलें, " कोण आला होता ? "

यावर तिच्या चेहऱ्यावर मिस्किलपणाचें हंसू एकदम फुटलें आणि बालिश आवाजांत ती म्हणाली, " तुम्हीच ओळखा ना ! "

मला खरें म्हणजे असलीं कोडीं सोडविण्याचा कंटाळा आहे, पण तिची हौस भागविण्यासाठीं मी एक–दोन मित्रांचीं नांवें घेतलीं; व तिनें उहूं ऽ केलें.

मग मी किंचित् त्रासून म्हटलें, " नाहीं ओळखत बुवा ! "

" अहो आज सकाळीं घाटपांडे आले होते."

" मी हंसत हंसत म्हटलें, " अरे वा ! घाटपांडे आला होता का ? जवळ जवळ गेल्या महिन्यांत कांहीं तो आला नव्हता."

घाटपांड्यांची आठवण होऊन तिलाहि खूपसें हंसूं आलें. मिस्किलपणानें ती म्हणाली, "माझ्या लक्षांतच राहिलें नाहीं बरं का! मघाशीं तुम्हीं विचारलंत, तेव्हांच मी सांगायला पाहिजे होतं."

"असं होतं कधीं कधीं" मी हंसत हंसत म्हटलें व एक-दोन क्षण तिच्याकडे बघितलें. मग मलाहि गंमत करण्याची लहर आली व मी म्हटलें,

"अग, तुझं बरोबरच होतं! घाटपांडे कांहीं माझ्याकडे आला नव्हता. तो तुझ्याकडे आला होता. तूं मला हें सांगितलंस हेंच विशेष!"

यावर तिनें एकदम स्वयंपाक थांबवला आणि आपल्या टपोऱ्या लांबटसर डोळ्यांनीं माझ्याकडे रोखून बघत कुलककोपानें म्हणावें, तसं ती म्हणाली, "चावटपणा पुरे झाला बरं का! शोभतात का असलीं बोलणीं?"

मी मुद्दामच खिजविण्यासाठीं म्हटलें, "शोभोत किंवा न शोभोत! तो तुझ्याकडे आला होता ही 'फॅक्ट' आहे; तुझ्या रागावण्यांत कांहीं अर्थ नाहीं." आणि नंतर एकदम मी आंघोळीलाच पळालों. त्यापुढें तिची थट्टा करायला मला धीरच झाला नाहीं.

नंतर मग मी आंघोळ करण्यांत गुंतलों. एका बाजूनें मी अंगाला साबण लावत होतों आणि ऊन पाणी घेत होतों, पण मन घाटपांड्यांची आठवण काढून हंसतच होतें.

आंघोळ झाल्यावर मी बाहेर आलों आणि केंस विंचरतां विंचरतां तिला विचारलें, "घाटपांडे काय विचारीत होता?"

"उगीच आलों होतों म्हणाले!"

"तरी पण! कांहीं काम नांवाला तरी सांगितलं असेलच कीं त्यानें!"

"सांगितलें ना! ते म्हणाले 'मी लायब्ररी काढली आहे. घरपोंच पुस्तकें आणून देऊं! वर्गणीदार व्हा' म्हणत होते."

"असं का! हें त्याचं एक नवीनच फॅड दिसतंय्. मागें उदबत्त्यांचे पुडे आणि साबण विकून झालेच!" मी हंसत म्हटलें, व पुढें विचारलें, "आणखी काय म्हणत होता?"

"आणखी कांहीं नाहीं."

"किती वेळ बसला होता?"

" इश्य ! तुम्हीं उलट तपासणी काय करीत आहांत ? एखाद्या संशयी नवऱ्यासारखी ? "

" उलट तपासणी नाहीं. खरंच विचारतों आहे. किती वेळ बसला होता ? "

" बसले होते साधारण पंधरा मिनिटें. "

" त्याला चहा दिलास ? "

" इश्य ! मी कसा देईन चहा ? तुम्हीं घरांत नसतांना ! "

" वा ? त्यांत काय झालें ? नाहींतरी तो तुझ्याचकडे आला होता. त्याला ' ट्रीट ' करणें तुझं कर्तव्य होतं. "

" तुम्हीं वाहवलात बरं का फार ? जेवायला बसा बरं. आज तुमच्या आवडीची भाजी केली आहे ती. "

" वाऽ मग मजाच झाली. " मी हंसत हंसत म्हणालों, व चोळणा अडकवून जेवायला बसलों.

जेवण सावकाश रेंगाळतच चाललें होतें. भात संपवून पोळीपर्यंत यायलाच चांगलीं आठदहा मिनिटें लागलीं. माझ्याकडे बघत ती सहज म्हणाली, " जेवण जात नाहीं का ? "

खरं म्हणजे सकाळीं माझें दोनचार ठिकाणीं चरणें झालें होतें. चहाहि मी बराच ढोसला होता, त्यामुळें पोट कसें डब्ब झालें होतें—जेवणाची इच्छाच नव्हती.

तरीहि मी थट्टा करीत म्हटलेंच, " जेवण जातच नाहीं. अन्नावर वांच्छाच नाहीं. "

ती हंसली व म्हणाली, " अगबाई ! मग एखादं औषधबिषध तरी घ्यावं ? वेळींच सावधगिरी ठेवलेली बरी. "

तिची थट्टा पुढें चालवीत मीं म्हटलें, " औषधाचें पुढें बघूं ! पण आतां ही पोळी जात नाहीं तिचें काय करायचें हा प्रश्न आहे. "

" तो प्रश्न तुमचा तुम्हींच सोडवायचा आहे. "

" होय ना ? " मी गंभीर चेहरा करीत म्हटलं, " काय करावं बरं ! नाहींतर असं करतों ! या पोळीचे घास करतों ! आणि हा काऊचा नि हा चिऊचा असं करून खाऊन टाकतों. "

ती कांहींच बोलली नाहीं. नुसतीच हंसली.

मग मी पोळीचे भराभर घास केले आणि पहिला घास उचलून म्हटलें, “ हा तुझा घास ! ” आणि तोंडांत घालून म्हटलें, “ वा ! काय गोड लागतो आहे ! ”

हंसत हंसत ती म्हणाली, “ लागतो आहे ना ! मग झालं तर ! ”

नंतर दुसरा घास उचलून मी म्हटलें, “ हा कुणाचा घास ? ”

ती म्हणाली, “ कुणाचा घास ? ! ”

थट्टा करीत मी म्हटलें. “ घाटपांड्यांचा घास ! ” आणि तोंडांत घालून म्हटलें “ छेऽ ! हा लेकाचा नाहीं इतका चांगला लागत ! अगदींच खारट-तुरट लागतो आहे. ”

यावर मात्र ती गंभीर झाली, आणि म्हणाली, “ थट्टा करायला तुम्हांला कांहीं लागतच नाहीं. गरीब माणसाची कशाला करावी इतकी थट्टा ! ”

तिच्या गंभीरपणानें मला माझ्या थट्टेला किंचित् आवर घालणें भाग पडलें आणि मी स्वस्थ जेवूं लागलों.

जेवण झालें आणि हात धुऊन मी बाहेरच्या खोलींत सिगरेट ओढीत बसलों. सिगरेट संपली, तरीहि झोप येईना ! म्हणून मग मी पुन्हां आंत गेलों.

ती जेवायला बसली होती, म्हणून तिला सोबतीसाठीं मी तिथेंच पाटावर बसलों आणि सहज म्हणून विचारलें, “ घाटपांडेची नि तुझी ओळख होऊन सहा-सात महिने झाले असतील नाहीं ? ”

“ अजून तुमच्या डोक्यांतला घाटपांडे सुटत नाहीं ! आश्चर्य आहे बाई ! ”

“ अग, सहज आठवण झाली म्हणून विचारलें ! ”

“ अहो सहा महिने कशाला ? चांगलं वर्ष झालं.”

“ असं का ? काय भर्रकन् दिवस जातात तरी.”

“ अहो गेल्या वर्षी मे महिन्यांतच नाहीं का मी हिंदी क्लासला जायला लागलें.” तिनें आठवण करीत उत्तर दिलें, “ मी परिचय क्लासला गेलें, तेव्हां तेहि तिथं होते.”

" तिथंच तुमचा परिचय झाला म्हणा कीं ?"

" तसं म्हणा ! त्याच्या आदल्या वर्षी ते परिचय नापास झाले; पण पुन्हां आपले क्लासला येतच होते. त्यांच्याकडे बघून आम्हा साऱ्यांना आश्चर्य वाटायचं !"

" काय आश्चर्य वाटायचं !"

" असं वाटायचं कीं इतक्या वयाचा हा माणूस क्लासला कशाला येतो."

" अग त्यांत कसलं आश्चर्य आहे ? हल्लीं हिंदी क्लासला जायला पुरुषांना मजाच वाटते. खूप बायका तिथं येतात !" मी हंसत खिदळत म्हटलें.

" पण त्यांची मुलींत आणि बायकांत टिंगल तरी किती व्हायची ! आमच्या बॅचमध्यें सारे तीनचारच पुरुष होते. ते बिचारे कांहीं बोलायचे नाहींत. पण घाटपांड्यांचं सारंच विलक्षण !"

" का ? काय विलक्षण !"

" विलक्षण नाहीं तर काय ?" खरकटीं भांडीं उचलीत ती म्हणाली,

" आधीं पोशाख काय बिचाऱ्याचा ! खाकी चड्डी नि अर्ध्या बाह्यांचा मळकट शर्ट ! डोक्याचें केंस, नि दाढी पांढरी झालेली ! वर्गांत ते आले, कीं भूत आल्यासारखं वाटायचं, आणि साऱ्या बायका फिदीफिदी हंसायच्या !"

" बायकाच त्या ! त्यांना काय होतय् हंसायला ?"

" पोशाख हा असा आणि वागणूक चमत्कारिक !" ओल्या फडक्यानें फरशी पुशीत ती म्हणाली, " वर्गांत सारखा आपला समोर बसायचा आणि माझ्याकडे सारखी टक लावून बघायचा !"

ती आठवण होऊन तिच्या अंगावर शहारे आले आणि ती क्षणमात्र गप्प बसली. नंतर भांड्यांची आवराआवर करून तिनें स्वयंपाकघराला कडी घातली आणि आम्हीं बाहेरच्या खोलींत आलों.

मी आरामखुर्चीत बसलों व ती समोरच्या कॉटवर पडून म्हणाली, " तो असा टक लावून बघायला लागल्यावर पहिल्यांदां फार संताप आला,

आणि भीतीहि वाटली. पण इतर मुलींनीं सांगितलं कीं, त्यांत भिण्याजोगं कांहीं नाहीं. बायकांकडे बघायचा त्याला असा नादच आहे. ”

“ असतो असा नाद बऱ्याच जणांना ! ” मीं हंसत हंसत म्हटलें.

“ असतो असा नाद बऱ्याच जणांना ! ” तोंडें वेडावून दाखवून नक्कल करीत ती म्हणाली, “ अहो पण हें चांगलं का ? पण मुली म्हणायच्या असाच आहे तो ! दर वेळेला ! म्हणे क्लासमधल्या एखाद्या बाईला असाच तो टिपून काढतो, आणि बघत बसतो. मला असा तेव्हां राग आला होता कीं वाटलें होतें फाड्फाड् बोलावं त्याला ! नि चारचौघांत चांगली शोभा करावी. ”

“ मग कां केली नाहींस ? कदाचित् तुलाच तें सारं आवडत असेल !”

“ तुम्ही बोला कसं वाटेल तें ? पण खरें सांगायचें म्हणजे त्यांच्या गरीबीची कींव आली मला. बिचाऱ्याला आधींच नोकरी नव्हती. कांहीं तरी तोहमत अंगावर येऊन कामावरून कमी झाला होता म्हणे ? ”

“ तोहमत अंगावर येऊन ? ” मीं विचारलें.

“ अहो तोहमत कसली ? भंपकराव नि अर्धवट माणूस तो ! कामावर असतांना कांहीं चुका केल्या आणि मद्रासी साहेब कांहीं तरी बोलला वाटतें त्याला. मग हाहि त्याला उलटून बोलला ! म्हणाला, ‘ मराठा माणूस कधीं स्वाभिमान गमावणार नाहीं. ’ ” ती हंसत म्हणाली.

मीहि हसलों आणि म्हणालों, “ मग मराठ्याला नोकरी गमवावी लागली असंच ना ? ”

“ होय ना ! त्याला ह्याची काय पर्वा होती म्हणा ! ना बायको, ना पोर ! एकटा जीव नि सदाशिव ? ”

“ बायको नव्हती ? ”

पलंगावरून उठून बसत ती म्हणाली, “ अहो अर्धवट माणूस तो ! त्याला कोण बायको देणार ? ”

“ अर्धवटाला बायका नाहीं का मिळत ? ”

“ तुमच्यासारख्या एखाद्या अर्धवटाला मिळेल होऽ ! पण सगळ्याच अर्धवटांना नाहीं मिळत. ” ती माना वेळावून पुढें म्हणाली, “ आणि शिवाय तुम्हीं हे असे ! तुम्हांला ह्याचा रागच येत नाहीं. ”

" मी काय केलं बुवा ! "

" मी क्यॅय क्येल बुवा ? " वेडावून दाखवीत ती म्हणाली, " घाटपांडे पहिल्यांदां आपल्याकडे आला तेव्हां मी तुम्हांला सांगितलं होतं कीं त्याची नजर वाईट आहे...तो सारखा बायकांशीं बोलतो. पण तुम्ही आपलं तें सारं हंसण्यावारी नेलंत ! "

यावर मी पुन्हां हंसलों.

" हंसू कसं येतं कुणास ठाऊक ! स्वतःच्या बायकोकडे दुसरा माणूस वाईट नजरेनें बघतो आहे...आणि बायको स्वतः तें सांगते आहे, पण नवरा ते हंसण्यावारी नेत आहे. चांगला देखावा आहे. "

तिला आणखी चिडविण्यासाठीं मी म्हटलें, " आपण बुवा या बाबतींत ' सोशल ' आहोंत. "

थोडा वेळ मग तसाच गेला. ती पलंगावर पडली होती आणि मी आराम खुर्चीत बसलों. बोलायला दुसरा विषय नसल्यामुळें मग पुन्हां मी घाटपांडेचा विषय चघळायला लागलों.

पलंगावर तिला अस्ताव्यस्त पडलेली पाहून मी विचारलें, " आतां जर घाटपांडे आला तर काय होईल ? "

" मी उठून बसेन ? "

" पण मी तुला उठू देणारच नाहीं. सांगेन तशीच निजून रहा म्हणून ! काय लेकाच्याला टक लावून बघायचें असेल तें बघूं दे. "

" इश्श ! कांहींतरीच काय बोलायचं ! "

" कांहींतरीच कशानं ? नाहींतरी तो घरीं आला कीं तुझ्याकडे आधाशासारखा बघत असतोच ! माझ्याशीं बोलतो आणि तुझ्याकडे पहातो आणि तें सुद्धां नीट नाहीं. चोरटेपणानें बघतो आणि स्वतःच लाजतो, एखाद्या बाईसारखा ! "

" आणि असं लाजून बोलायला लागला कीं, त्याची थुंकी जास्तच उडते. शी ऽ ! वहिनी वहिनी करून तोंड जवळ आणून बोलायला लागला कीं, इतकी किळस येते कीं, चांगल्या दोन भडकवाव्याशा वाटतात. "

" मग कां भडकावीत नाहींस ? "

" कशा भडकावणार ? एक तर कींव येते आणि दुसरें तुम्हीं सोशल आहांत ! "

" कींव येते म्हणे ? प्रत्येक हॉटेलच्या भोंवतीं नेहमीं दोनचार भिकारी घुटमळत असतात. इतर लोकांना खात असलेले बघतात आणि गरम भजांचा नुसता वास येतांच त्यांना बरं वाटतं. घाटपांडेचें बायकांकडे पहाणें तसेंच आहे." असें म्हणून मी मोठ्यांदा हंसलों व म्हणालों, " मला असल्या लोकांचा राग येत नाहीं. दे मस्ट बी गिव्हन ए चान्स ! "

यावर ती हंसली व म्हणाली, कांहींतरीच तुमचें बोलणें ! "

" कांहींतरीच कशानं ! वुई मस्ट बी सोशल ! स्त्रियांविषयींच्या मेडिइव्हल कल्पना सोडल्याच पाहिजेत ! नुसत्या बघण्यानें काय होणार ? "

माझें व्याख्यान तिला कळलें कीं नाहीं, कुणास ठाऊक पण तें कळल्या-सारखं दाखवून ती खुदकन् हंसली आणि आणखीनच अस्ताव्यस्त पसरली.

तिच्या हंसण्यावर मीहि हंसलों आणि कांहीं तरी मजेदार बोलणार होतों.

इतक्यांत—इतक्यांत दारावरची घंटा बाहेरून कुणीतरी वाजविली.

ऐसपैस लोळत, आळसटलेल्या स्वरांत ती म्हणाली, " कोण आलं आहे ? "

खुर्चीवरून उठत मी म्हटलें, " घाटपांडे असेल ! दुसरें कोण असणार ! आणि दरवाजाकडे जातांना मधें वांकून डोळे मिचकावीत म्हटलें,

" तूं तशीच निजून रहा ! लेट अस ह्रू सम फन् ! "

" शी ऽ असं कसं चालेल ? "

" चालायचं काय त्यांत ! ही इज आफ्टरऑल घाटपांडे ! " मी हंसलों व दरवाजाची कडी काढली.

कडी काढून दार किलकिलें केलें, नि बाहेर बघितलें,

आणि....आणि मला एकदम धक्का बसला. बाहेर घाटपांडे नव्हताच ! शरद नाडकर्णी नांवाचा आमच्या कचेरींतील एक डॅंडी होता ! माझ्या-पेक्षांहि उंच, खूपच देखणा, रुबाबदार आणि फॅशनेबल पोषाख केलेला !

दार किलकिलें करून मी अर्धवट बाहेर आलों आणि म्हटलें, ' काय हो ? '

तोंडांतली सिगरेट पेटवीत त्यानें बेफिकिरीच्या स्वरांत उत्तर दिलें, " कांहीं नाहीं ! सहजच ! "

" थांबा हं " असें म्हणून मी आंत आलों, आणि अवास्तव पडलेल्या तिच्या अंगावर खेकसून म्हटलें, " आंत जा ! नाडकर्णी आले आहेत. "

तिला प्रथम कळलंच नाहीं, तेव्हां पुन्हां तिच्या दंडाला धरून मी धसकन् उठविलें, आणि म्हटलें " बाहेर नाडकर्णी आले आहेत, आंत जा ! "

" अगबाई ! " ती एकदम उठून विस्मयानें म्हणाली व आंत पळाली. ती आंत गेली, पण उकडत असल्यामुळें तिनें काढलेला ब्लाऊज कॉटच्या कठड्यावर तसाच लोंबत होता. मी तो ब्लाऊज प्रथम नीट कपाटांत ठेवला, आणि दार उघडलें. दार उघडतांना मला अर्थातच बरें वाटलें. नाडकर्णींची बायकांबद्दलची दृष्टी चांगली नाहीं, याची मला जाणीव होती. दार पूर्णपणें उघडून मी त्यांना म्हटलें, " या ना ! "

त्यावर तो बूट वाजवीत आंत आला, आणि बेफिकीरीनें स्वतःला आरामखुर्चीत लोटून देत म्हणाला, " करमत नव्हतें, म्हणून आलों ! " आणि नंतर स्वतःशींच हंसला व म्हणाला, " मिसेस्‌ना जरा त्रास द्या बुवा ! चहा मिळाला तर बरें होईल ! "

" वा ! न मिळायला काय झालं ? थांबा हं आंत सांगून येतों. "

असें म्हणून आंत जाण्यासाठीं मधला जाळीचा पडदा सरकावला !

पण मला आंत जावेंच लागलें नाहीं; कारण पडद्याच्या आंतच ती उभी होती, आणि बाहेरच्या खोलीकडे टक लावून पहात होती.

◎ ◎ ◎

## : १२ : खोटा रुपया

ऑफिस सुटायला अर्धापाऊण तास अवकाश होता. मीं काम बाजूला सारलें नि खिशांतून डायरी काढून नेहमींप्रमाणें घरचा जमाखर्च लिहूं लागलों. खर्च लिहिला नि पाकिटांत राहिलेला खुर्दा मीं एक प्रकारच्या धसक्यानेंच मोजून पाहिला. सारे साडेबारा आणे होते पाकिटांत! आज सत्तावीस तारीख होती नि खिशांत अवघा साडेबारा आण्यांचा खुर्दा.

कांहीतरी चाळा म्हणून मी एका कागदावर रेघोट्या ओढीत बसलों. चार दिवसाला साडेबारा आणे, तर एका दिवसाला किती? हें त्रैराशिक मीं कितीतरी वेळां सोडविलें. कागदाच्या दोन कोपऱ्यांत २७ तारीख हीं अक्षरें लिहिलीं व दुसऱ्या कोपऱ्यांत १२॥ आणे हीं अक्षरें कोरून लिहिलीं. नंतर काय वाटलें कुणास ठाऊक, पण मीं कागदावर उगीचच रेघोट्यांच्या अक्षरांनीं लिहिलें, " चार दिवस व्रतस्थ राहणें. हॉटेल बंद, सिगारेट नाहीं. भाजीपाला, मुलांचीं खेळणीं, रिबिनीं, आंकडे...नो, नो, त्रिवार नाहीं! इतक्यांत ऑफिस सुटलें व मी घरीं निघालों.

घरी येतों तों बायको सैपाकघरांत पाटावर धान्य घेऊन गंभीर चेहऱ्यानें निवडींत बसली होती. तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकून मी बाहेरच्या खोलींत आलों; हॅट काढून ठेवली व पॅंट काढून चोळणा अडकविला. आणि हातांत सकाळचें वर्तमानपत्र घेऊन परत सैपाकघरांत आलों.

आकाशांत मळभ आलें होतें नि अंधार भासत होता. दिवा लावावा असें वाटलें नि मीं बटन दाबलें, पण दिव्याच्या टाळक्यांत कांहीं प्रकाश पडला नाहीं! मीं मग बेभान झालों. मग पुन्हां जोरानें मीं बटन मिटलें व पुन्हा उघडलें. दोनदां मिटलें नि पुन्हा उघडलें. पण रामा–शिवा–गोविंदा! दिवा आपला तसाच.

एवढा वेळपर्यंत तिनें चुलींवरून चहा उतरविला होता आणि पितळेच्या गाळण्यांत बसलेला मळ डोक्यांतील आंकड्यांच्या टोकानें काढण्याचें महत्कार्य तिनें सुरू केलें होतें.

दिव्यासाठीं चाललेल्या माझ्या धडपडीकडे बघून तिला कींव आली असावी. कारण, एखादी वाईट बातमी सांगावी तसा चेहरा करून ती म्हणाली, " दिवा लागायचा नाहीं. बल्ब गेला आहे ! "

तिचे शब्द माझ्या काळजांत कट्यारीसारखे घुसले. बेभान होऊन मी ओरडलों, " बल्ब गेला ! कसा गेला ? तूंच खेळली असशील त्याच्याशीं दुपारीं ! "

संसारांत सत्तावीस तारखेला मी फार रागावलेला असतों हें तिला माहीत आहे. एक वेळ माझा सासरा किंवा तिचा सासरा ' गेला ' असतां तरी मला इतकें दुःख झालें नसतें; पण बल्ब गेल्यामुळें मी बेभान होणें साहाजिक आहे एवढें मानवी स्वभावाचें ज्ञान तिला खात्रीनें होतें. त्यामुळें तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

थोडा वेळ थांबून, तिनें चहा गाळून, कप माझ्यापुढें ठेवला व भीत-भीत, अगदीं हलक्या आवाजांत ती म्हणाली, " बल्ब मात्र आज आणायला पाहिजे. "

माझा संताप यावर अनावर झाला. मीं वेडावून दाखवीत म्हटलें, " आणायला पाहिज्ये आऽऽज ! कांहीं शरम वाटत नाहीं ? सत्तावीस तारीख नि म्हणे बल्ब आणा ! " इतकें बोलून मीं एका घोटांत चहा संपविला नि खुर्चीवर माझा देह झोकून देऊन वर्तमानपत्र वाचूं लागलों. मनाच्या अशा निराश व हताश अवस्थेंत मुंबई विधिमंडळांत आमदारांनीं केलेलीं भाषणें वाचण्याचा माझा फार दिवसांचा नियम आहे.

दहापंधरा मिनिटांतच मग माझें चढलेलें डोकें साफ उतरलें व मी वास्तवाच्या दृष्टीनें जगाकडे पाहूं लागलों. मीं मग तिच्याकडे वळून म्हटलें, " बल्ब आणायला पैसे कुठं आहेत ? मजजवळ तर साडेबारा आणेच आहेत सारे ! " आणि थोडा वेळ थांबून हताशपणानें मीं म्हटलें, " डालडा तूप संपलं असतं, तर वाण्याकडून उधार आणलं असतं; पण बल्ब कोण उधार देणार ? इतकें बोलत असतांनाच मीं सिगरेट पेटाविली

व आत्मविश्वासानें म्हटलें, " चार दिवसच राहिले आहेत सारे ! ते काय काढूं तसेंच. अंधारांत बसूं, नाहींतर चारदोन पैशांच्या मेणबत्त्या जाळूं !"

भाजीला पीठ लावतांलावतां ती म्हणाली, " पण हें शोभेल का आपणांला ? चार दिवस दिव्याशिवाय काढायचे ? शेजारीपाजारी काय म्हणतील ? "

सिगरेटचा मनसोक्त झुरका घेऊन मीं म्हटलें, " हं, लोकांना हंसायला काय लागतं ? आपण आपलं बघितलं पाहिजे ! "

माझ्या या बोलण्याला तिनें काडीइतकीहि किंमत दिली नाहीं. ती शांतपणें खोलींत आली व तिनें आपली ट्रंक उघडली. बराच वेळ इकडे-तिकडे शोधल्यानंतर ट्रंकेच्या तळांत एका बारक्याशा कापडी पिशवींत ठेवलेला एक रुपया घेऊन ती मजजवळ आली व म्हणाली, " नाहींतर असं करावं हा खोटा रुपया मजजवळ बरेच दिवस पडून आहे. हा कुठंतरी चालवून पाहावा; पण बल्ब मात्र आणावाच आज ! "

खोटा असला तरी सबंध एक रुपया सत्तावीस तारखेस माझ्या घरांत असावा ही गोष्ट माझ्या दृष्टीनें भाग्याची होती. मी हंसतहंसत म्हटलं, " बघूं, बघूं ! खोटा रुपया काय, सहज चालवितां येईल. " इतकें बोलून मी थांबलों. तरुणपणीं कॉलेजांत असतांना मी किंचित् लेखक होतों, त्या रम्य काळाची मला आठवण होऊन, " खोटा रुपया न चालायला काय झालं ? अग, जगांत सारीं खोटीं नाणींच नाहीं का चालत ? " अशी कोटि मग मीं ठेवून दिली आणि कोट घालायला उठलों. कोट घालण्याच्या गडबडींत हातांतील रुपया फरशीवर पडला व अगदीं बद्द आवाज झाला. तो आवाज ऐकून मात्र मी चांगलाच हादरलों. मनांत म्हटलें, ' लेकाचा खोटा आहे कीं ! कसा चालेल देव जाणे ! '

बाहेर पडलों नि रस्ता आक्रमूं लागलों. बाह्यतः मी शांतपणें चाललों होतों खरा; पण माझें मन खिशांतील खोट्या रुपयासाठीं जागा शोधण्यांत गर्क होतें. ' शू मार्ट ' च्या, उपहारगृहांच्या आणि रेशन दुकानांच्या पाट्या माझ्याकडे बघून मला खुणवीत होत्या. मी चाललोंच होतों; पण रुपयासाठीं मला एकहि लायक ' स्थळ ' भेटत नव्हतें.

शेवटीं कांहीं विचार करून, कोपऱ्यावरच्या इराण्याच्या हॉटेलांत शिरलों नि अगदीं बाजूच्या खुर्चीवर बसून चहाची ' ऑर्डर ' दिली. वरकरणीं मी पुढ्यांतील लोकसत्तेच्या शब्दकोड्याशीं मुकाबला करीत होतों; पण डोळ्यांच्या कोपऱ्यांतून गल्ल्यावर उभ्या राहिलेल्या इराण्याकडे चोरटी नजर टाकीत होतों. गुन्हेगारांच्या कथा लिहिणारे तेथें नव्हते म्हणून बरें, नाहींतर माझ्या चोरट्या हालचाली पाहून, त्यांनीं ' धनंजय ' किंवा छोटू यांसारखी आणखी एखादी व्यक्तिरेखा नक्की रेखाटली असती !

तो इराणी नेहमीं जसा दिसायचा तसाच आजहि दिसत होता. त्याचे डोळे नेहमींप्रमाणेंच अर्धवट मिटलेले होते आणि बिस्किटांच्या, केक्स्च्या व चॉकोलेटस्च्या बरण्यांमध्यें तो एखाद्या विरक्तासारखा शोभत होता. त्याच्यापुढेंच रॉकेल तेलाची बारकी चिमणी सिगरेट–शोकीनांच्या उपयोगासाठीं देह झिजवीत उभी होती; तिच्यामुळें त्याच्या मूर्तीला बौद्ध भिक्षूचें गांभीर्य प्राप्त झाल होतें.

चहा पिऊन झाला. मीं सिगरेट पेटविली आणि इराण्याला बळी देण्याचा निश्चय करून मी उठलों. चालत चालत मी कौंटरपर्यंत गेलों तरी तो तसाच अर्धनिद्रिस्त अवस्थेंत उभा होता. जवळ जाऊन खिशांत हात घातला मात्र, इतक्यांत मागून मेघगर्जनेसारखा पुकारा झाला, " एक इसम–दीड आणा . . दीड आणा."

त्या पुकाऱ्यासरशीं इराण्यामध्यें एकदम धुगधुगी निर्माण झाली व मेनकेच्या पदरवानें तपोभंग झालेल्या विश्वामित्रासारखा मग तो एकदम चाळवाचाळवा करूं लागला. कळ दाबतांच जपानी बाहुलीनें डोळे उघडावे तसे एकदम त्याचे मिटलेले डोळे उघडले आणि चेहऱ्यावर जीवनाची लकेर चमकूं लागली.

खिशांतून मीं पाकीट काढलें; पण माझी छाती धडधडत होती व पाय कांपत होते. त्या इराण्याकडे मीं क्षणमात्र टक लावून पाहिलें. जागृत झालेल्या ज्वालामुखीसारखा मला तो भयंकर वाटला. मला नकळतच मग मीं खोट्या रुपयाऐवजीं दोन आण्याचें नाणें कौंटरवर फेकलें. ते दोन आणे त्यानें टेबलांतील अल्युमिनियमच्या वाटींत टाकलें व एखाद्या यंत्रा-

प्रमाणें मला दोन पैसे परत दिले. स्वतःचीच मग मला चीड आली व एक प्रकारच्या तिरीमिरींतच ते दोन पैसे जोरानें त्याच्यापुढें सरकावीत मी ओरडलों, " एक बर्कले."

पण तो परिणामरहित होता ! पहिल्या इतक्याच शांतपणें त्यानें ' बर्कले ' काढून दिली. त्याच्या पुढ्यांत तेवत असलेल्या बत्तीवर सिगरेट शिलगावतांना मी पाहिलें, तर त्याच्यांतील जीवन पुन्हा निद्रिस्त झालें होतें.

जोरजोरानें झुरके मारीत मी बाहेर पडलों. वेळ थोडा राहिला होता. अर्ध्यापाऊण तासांत दिव्यासकट मला घरीं परतणें भाग होतें. ' आता घाबरायचं नाहीं ! ' असा मीं निश्चय केला आणि कांहीं विचार करून ' बस ' मध्यें शिरलों.

आंत बऱ्याच जागा रिकाम्या होत्या. मी शेवटच्या बाकांवर बसलों असतों तरी चालण्याजोगें होतें; मी तसा बसणारहि होतों. इतक्यांत अगदीं पुढच्या बाकांवर रंगीबेरंगी गोल साड्या नेसलेल्या व सारख्या किलबिल करणाऱ्या दोन कॉलेजकन्या मला दिसल्या, त्यांच्या मागच्या बाजूचीच जागा मीं मग पटकावली. मी संसारी प्रौढ वयाचा माणूस आहे खरा; पण तरुण मुलींच्या सहवासाचा मोह अजून मला टाळतां येत नाहीं. त्यांतून कॉलेजांतल्या मुली पुढेंमागें असल्या म्हणजे मला नेहमींच अमृतांजन लावल्यासारखें गारगार वाटतें. जागेवर बसल्यानंतर कंडक्टर थोड्याच वेळांत चिमटा वाजवीत माझ्याकडे येतांना दिसला.

तो अगदीं जवळ आल्यानंतर मी त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहिलें. चाळिशी उलटून गेलेला, पाठीला किंचित् बाक आलेला व पुढच्या दोन दातांत मोठी फट असलेला तो एक तरुण जीव होता. रफू केलेल्या खाकी कपड्यांमुळें आणि हनुवटीवर उगवलेल्या पांढऱ्या केसांमुळें मला त्याच्याविषयीं एकदम विश्वास वाटला. मग मीं खिशांतला रुपया बेफिकिरीनें त्याच्या हातांत ठेवला, स्टॉपचें नांव सांगितलें आणि विचारमग्न गंभीर चेहरा करून बसलों.

त्यानें रुपया घेतला नि प्रथम त्याकडे नुसतें न्याहाळलें. त्याच्या मनांत कांहीं शंका उत्पन्न झाली असावी. कारण त्यानें तो रुपया चष्म्याच्या अगदीं जवळ नेला व क्षणभर त्याकडे टक लावून पाहिलें.

एवढा वेळपर्यंत पुढच्या बाकांवरील किलबिलाट करणाऱ्या मुली, शेजारच्या बाकांवरील गोविंद-विडा चघळत बसणारे गुजराती शेठजी इत्यादिकांचें लक्ष माझ्याकडे वेधलें होतें. त्या साऱ्यांकडे पाहून मला स्वतःला आरोपीच्या पिंजऱ्यांत उभें असल्यासारखें वाटलें व सर्वांगाला दरदरून घाम सुटला.

इतक्या वेळांत कंडक्टरच्या चेहऱ्यावरच्या शिरा ताठल्या होत्या. त्यानें किंचित् मोठ्या आवाजांत म्हटलें, "साहेब, रुपया खोटा आहे."

या शब्दांनीं वातावरणांत एकदम हाहाःकार माजला. मीं उगीचच खोटें आश्चर्य दर्शवीत म्हटलें, "काय खोटा? बघूं, बघूं!"

पण तो मला तसा सोडायला तयार नव्हता. तो तार स्वरांत म्हणाला, "काय बघतां काय राव? वा...वा! आव तर खूप आणला आहे कीं!" आणि मग त्यानें माझ्या अंगावर रुपया भिरकावला; आणि पुढें आसपासच्या लोकांकडे बघत, शनिवारवाड्यापुढें व्याख्यान द्यावें तशा आवाजात तो ओरडला, "चांगले जंटलमेन दिसत आहेत कीं! असें लोकच नेहमीं धोका देतात."

यावर गुजराती शेठजीनें उभें राहून, बसच्या तावदानावरून गोविंद-विडा पच्कन् थुंकला आणि माझ्याकडे बघत तो सामाजिक नीतिमत्तेबद्दल कांहीं बोलला. एवढ्यानेंच थांबलें नाहीं. कारण, पुढच्या बाकावरील कॉलेजांतल्या मुली माझ्याकडे बघून दांत विचकून फिदीफिदी हंसल्या व एकमेकींच्या कानांशीं लागून कांहीं कुजबुजल्या. त्या बहुधा 'बसमधील लोक' किंवा 'खोटा रुपया' यांसारखी एखादी गुजगोष्ट वा लघुनिबंध कॉलेजच्या त्रैमासिकांत लिहिण्याचा विचार पक्का करीत असाव्यात!

हें सगळें पाहून मला मेल्याहून मेलें झालें. क्षणभर असें वाटलें कीं, त्या शेठजीला गचांडीला धरून खालीं फेंकून द्यावें व सारीं कॉलेजें बंद करून टाकून फिदीफिदी हंसणाऱ्या कॉलेजकन्यकांचे सेंट्रल बिल्डिंगमध्यें ठाणबंद असलेल्या कारकुनांशीं सरसकट विवाह लावून द्यावेत! पण मीं तसें केलें नाहीं. हताश, दुःखी अवस्थेंत मी उठलों व झोकांड्या खातखात खालीं उतरलों.

रस्त्यावर आल्यानंतर एक प्रकारच्या निराशावादानें मला इतकें ग्रासलें होतें, कीं रुपया चालविण्याचा विचार पार सोडून देऊन मी परत घराकडे निघालों. चारदोन पावलें मीं चाललों असेन, इतक्यांत कोणीतरी माझ्या-मागें—माझ्या अगदीं जवळ येत आहे असा मला भास झाला.

मी चमकून मागें वळून पाहिलें; तर एक दहाबारा वर्षांची विटका परकरपोलकें नेसलेली मुलगी, धापा टाकीत माझ्यामागें येत होती. मीं तिच्याकडे निरखून पाहिलें. तिचा चेहरा बालविधवेसारखा भकास दिसत होता व शैशवाच्या खाणाखुणा त्यावरून केव्हांच पार पुसून गेल्या होत्या. तिच्या हातांत एक ताटली होती व ताटलींत कांहीं वड्या होत्या. त्यावरून जवळ येण्याचा तिचा उद्देश मीं सहज ताडला.

ती म्हणाली, " खोबऱ्याची वडी...आलेपाकच्या वड्या ! हव्या आहेत का ? "

तिच्याकडे लक्ष न दिल्यासारखें करून मी पुढें चालूं लागलों; पण डोळ्यांच्या कोपऱ्यांतून मी तिला न्याहाळीतच होतों. वाघानें हरणीच्या लुसलुशीत मांसाकडे पाहावें तसा मी तिच्या साध्याभोळ्या आकृतीकडे बघत होतों.

ती जास्तच जवळ येऊन म्हणाली, " घ्या ना ! एखादी तरी घ्याच ! " आणि मी ऐकत नाहीं असें पाहून अजीजीनें म्हणाली, " तेवढी गरिबाला मदत ! "

माझें मन या वेळपर्यंत पक्कें झालें होतें. मी थांबलों व बेफिकिरीच्या आवाजांत म्हटलें, " एका वडीची काय किंमत ? "

तत्परतेनें तिनें उत्तर दिलें, " खोबऱ्याची बर्फी—वडी एक आणा. "

मीं घोगऱ्या आवाजांत विचारलें, " पण रुपयाची मोड आहे का ? " हें विचारतांना माझी छाती जोरानें धडधडत होती नि माझा आवाज मला भीतिप्रद वाटत होता.

त्या मुलीच्या चेहऱ्यावर आशेचीं किरणें क्षणमात्र चमकलीं. तिनें पोलक्याच्या खिशांतून खुर्दा काढला व तिथेंच रस्त्यावरील दिव्याखालीं ती

मोजूं लागली. त्यांत कांहीं काळ्याकुट्ट, गुळगुळीत आणेल्या होत्या, एक दोन पैशांचें नाणें होतें, एक-दोन चवल्याहि दिसत होत्या. तिनें ते पैसे पुन्हा पुन्हा मोजले. साडे तेरा आणे होते ते ! साऱ्या दिवसभराची त्य लहान जिवाची ती कमाई होती.

" साडे तेरा आणेच आहेत का ? " मी घोगऱ्या आवाजांत विचारलें नंतर कांहीं विचार करून पुन्हा म्हटलें, " नाहींतर असं कर. मला दो वड्या दे नि हा रुपया घे. "

तिनें तो रुपया घेतला व मला दोन वड्या आणि तेरा आणे परत दिले आणि भोळसटपणानें विचारलें, " तुम्हांला अजून एक आणा द्यायल पाहिजे ना ? मग ? एक वडी घेतां ? "

मी बेपर्वाईनें ओरडलों, " नको, नको. " आणि नंतर तोंडावर नाटक स्नेहभाव दाखवीत, आपुलकीच्या आवाजांत म्हटलें, " असूं दे. तु एक आणा बक्षीस. त्याचा खाऊ घेऊन खा ! " इतकें बोलून नि खाली मान घालून झपाट्यानें चालूं लागलों.

पण मीं शेंपन्नास पावलें चाललों नसेन तोंच माझ्या डोक्यांत भावनांचें तुफान माजलें. खिशांतून मीं सिगरेट काढली व जोराचा झुरका मारला तरी ती मुलगी माझ्या डोळ्यांपुढून हालेना ! रात्रीच्या काळोखांत एखाद्या अश्राप, अपंग स्त्रीची अब्रू घ्यावी, नंतर तिचा गळा दाबून खून करावा आणि तिचा मुडदा रस्त्याच्या कडेला ठेवून लगबगीनें, घाईनें तेथून पळून यावें, तसें मला वाटूं लागलें !

रुपया खोटा आहे हें कळल्यावर ती मुलगी काय करील ? या रुपयानें ती काय करणार असावी ? रेशन आणणार असावी का ? का क्षयरोग दुखणाईत आईचें औषधपाणी या रुपयानें होणार असेल ?...का...? का

हाच ' का...?....का ? ' चा आवाज माझ्या मस्तकांत मग जोरानें उठला. या प्रश्नचिन्हानें जणुं वास्तवरूप धारण केलें आणि तें माझ्या मस्तकांत हातोडे ठोकूं लागलें. मला वाटलें, जोरानें ओरडावें नि माणसें जमा करावीं, स्वतःच्या थडाथड मुस्कुटांत मारून घ्याव्या आणि मीं केलेलें तें दुष्कृत्य लोकांना ओरडून जाहीर करावें....